रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २९५ । पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

आईस क्यूब फॅक्टरी
भाड्याने देणे आहे
-मुख्य वैशिष्ट्ये-
- पूर्णतः कार्यान्वित आईस क्यूब प्लांट
- शुद्ध पाण्यासाठी RO सिस्टीम कार्यरत
- ३ फेज इंडस्ट्रियल इलेक्ट्रिकल कनेक्शन
- हक्काचा आणि मुबलक पाणी पुरवठा (Water Source)
- तयार माल साठवण्यासाठी १ टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज
- प्रस्थापित डिस्ट्रिब्युशन नेटवर्क (वितरण व्यवस्था)




संपर्क: 98509 80530 / 75078 01905

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६
किंमत ४ ₹

B.com Computer
रिसेप्शनिस्ट महिला पाहिजे. अनुभवाची अट नाही. वेटर/रुमबॉय व महिला पाहिजेत. अर्जासह भेटा.
साई-इन रिसॉर्ट चोंढी, अलिबाग-रेवस रोड अलिबाग

# नागलोली धरणाचा बोजवारा

- दोन वर्षे काम ठप्प, पंचक्रोशीत उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई
- कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात?

**गणेश प्रभाळे**

। दिघी ।

श्रीवर्धन तालुक्यातील नागलोली येथील साठवण तलाव प्रकल्प हा शासनाच्या नियोजनशून्यतेचा आणि निष्क्रियतेचा जिवंत नमुना ठरला असून, उद्घाटनानंतर तब्बल दोन वर्षे उलटूनही प्रकल्प ठप्पच आहे. कोट्यवधी रुपये खर्चूनही पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या पदरी एक थेंब पाणी पडलेले नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

२०११ मध्ये मंजुरी, २०१२ मध्ये कामादेश आणि मार्च २०२३ मध्ये मोठ्या गाजावाजात उद्घाटन एवढ्या टप्प्यांनंतरही प्रत्यक्षात प्रकल्प अर्धवट अवस्थेत पडून आहे. सुमारे ६.३७ कोटींच्या या योजनेत २९० मीटर लांबीचे व २७.२० मीटर उंचीचे धरण उभारून १०५ हेक्टर क्षेत्राला •➤ पान २ वर

**माती भराव गेला वाहून; दोन वर्षांत एक थेंबही नाही**



**2010** तांत्रिक मान्यता (रु.५.६४ कोटी)
**2011** प्रशासकीय मान्यता (रु.६.३७ कोटी)
**2012** भाग्यश्री कन्स्ट्रक्शनला कामादेश
**2020** वनजमीन मान्यता.
**2023** भूमीपूजन, पण पावसात भराव वाहून गेला.
**2024** पासून काम ठप्प

"धरण होणार म्हणून, आम्ही ग्रामस्थ आनंदी आहोत. मात्र, प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. कोट्यवधी रुपये खर्च करुनही एक थेंब पाणी पदरी पडलेले नाही. शासनाने तात्काळ लक्ष देऊ निधी उपलब्ध करून धरणाचे काम सुरु करणे आवश्यक आहे."
– जयेश जाधव, ग्रामस्थ

"नागलोली साठवण तलावासाठी आम्ही सुधारित प्रकल्प शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे व सध्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. शासनाकडून निधी मंजूर झाल्यानंतर तात्काळ काम सुरू करण्यात येईल."
– मंगेश साठे, उपअभियंता, जलसंधारण विभाग

## १३ कोटींची पाणीपुरवठा योजना कोलमडली

- तळा नगरपंचायत प्रशासन निष्क्रिय
- ॲड. निलेश रातवडकर यांचा गंभीर आरोप

। तळा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत तळा नगरपंचायतीसाठी मंजूर करण्यात आलेली तब्बल १३ कोटी ७० लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नियोजित कालावधी उलटूनही कामाला गती न आल्याने तळा नगरपंचायत प्रशासन निष्क्रिय असून, ठेकेदाराला जावयाप्रमाणे वागणूक दिली जात आहे, असा आरोप भाजपचे तळा तालुकाध्यक्ष ॲड. निलेश रातवडकर यांनी केला आहे.

या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेचे भूमीपूजन दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. त्यानंतर मार्च २०२४ मध्ये संबंधित ठेकेदार कंपनीला काम सुरू करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले होते. या प्रकल्पाचा काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा निश्चित करण्यात आला होता. मात्र, आता तब्बल २४ महिने उलटूनही काम अपूर्ण अवस्थेत असून, प्रकल्पाला अपेक्षित गती मिळालेली नाही, अशी टीका रातवडकर यांनी केली आहे.

तळा शहरातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन ही योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेंतर्गत नवीन जलस्रोत विकसित करणे, शहरभर नवीन पाईपलाईन टाकणे तसेच पाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणे, अशा विविध कामांचा •➤ पान २ वर

## वेधक

### डिजिटल अटकेची धमकी देत लूट

**पनवेल :** दहशतवादी विरोधी पथकाचे अधिकारी असल्याची थाप मारून डिजिटल अटकेची भीती दाखवत एका व्यापाऱ्याला तब्बल १ कोटी ५४ लाख ९८ हजाराला लुटले. याप्रकरणी चार व्यक्तींविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी हे स्टील मार्केटमधील व्यावसायिक असून, सध्या निवृत्तीचे जीवन जगत आहेत. त्यांच्या •➤ पान २ वर

### आणखी एका आरोपीला अटक

**पनवेल :** बनावट जन्म-मृत्यू प्रमाणपत्र नोंदणीप्रकरणी सोमवारी आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली. पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायतीच्या नावाखाली तब्बल २६६० जन्म-मृत्यू दाखल्यांचा घोटाळा रायगड जिल्ह्यात उघड झाला होता. यवतमाळ, जळगाव आणि नांदेड आदी ठिकाणीदेखील हजारोंच्या संख्येने बनावट जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी •➤ पान २ वर

### कार फोडून १३ लाखांचा ऐवज लंपास

**पनवेल :** रत्नागिरीहून मुंबईच्या दिशेने प्रवासात असलेल्या एका कुटुंबाची कार हॉटेलबाहेर पार्क केलेली असताना, चोरट्यांनी वाहनाची काच फोडून त्यातील १३ लाख ७३ हजारांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली. घाटकोपर येथील रहिवासी योगेश रमेश शिंदे (४१) हे कुटुंबासह गाडीने रत्नागिरीहून मुंबईला •➤ पान २ वर

## सुकेळी खिंडीत बसला भीषण अपघात

**दोन ठार, २२ जखमी**



। नागोठणे । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावर वारंवार अपघातांसाठी कुप्रसिद्ध ठरलेल्या सुकेळी खिंडीत पुन्हा एकदा भीषण बस अपघात घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागोठणे हद्दीतील खैरवाडी गावाजवळील तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने खासगी बस उलटून दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर २२ प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना शुक्रवारी पहाटे अडीचच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमपी १३ झेडपी ४५४५ क्रमांकाची खासगी बस पनवेलहून महाडच्या दिशेने जात असताना अतिवेग आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने चालकाचा ताबा सुटला. सुकेळी खिंडीतील खैरवाडी प्रवेशद्वारासमोरील धोकादायक वळणावर बस पलटी होऊन हा अपघात घडला.

या अपघातात नाईम निजाम शेख (३३) आणि पनवेल येथील नीलम वैभव विभुते (४०) यांचा जागीच मृत्यू झाला. तर बसमधील अन्य २२ प्रवासी जखमी झाले असून, काहींची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, वाहतूक पोलीस तसेच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने बचावकार्य सुरू केले. जखमींना प्रथम नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार देण्यात आले, त्यानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले.

दरम्यान, अपघातामुळे काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी तत्परता दाखवत वाहतूक सुरळीत केली. या ठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना, सूचना फलक, रस्त्याची सुधारणा यांसारख्या उपायांची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार राजेश मारकंडे करीत आहेत.

## 'जय भवानी, जय शिवाजी'ने गड दुमदुमला

**शिवपुण्यतिथीनिमित्त किल्ले रायगडावर शिवभक्तांची अलोट गर्दी**



। महाड । प्रतिनिधी ।

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त रायगड किल्ल्यावर शिवभक्तांची अभूतपूर्व गर्दी उसळली पाहायला मिळाली. दि. २ एप्रिल रोजी तिथीनुसार आणि ३ एप्रिल रोजी तारखेनुसार शिवपुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही दिवशी गडावर भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

पहाटेपासूनच राज्यासह देश-विदेशातून आलेल्या हजारो शिवभक्तांनी गड चढत आपल्या आराध्य दैवताला अभिवादन केले. ''जय भवानी, जय शिवाजी''च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. शिवरायांच्या समाधीस्थळी शासकीय आदरांजली अर्पण करण्यात आली, तसेच मान्यवर आणि शिवप्रेमींनी फुलांच्या आरासीतून महाराजांना मानवंदना दिली.

शिवपुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित महोत्सवात विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गडावर देशभक्तीपर गीते, शिवरायांच्या पराक्रमाच्या गाथा आणि प्रेरणादायी सादरीकरणांमुळे वातावरण भारावून गेले होते. शिवभक्तांनी समाधीस्थळी नतमस्तक होत शिवरायांच्या कार्याचा जागर केला.

शिवभक्तांच्या सोयीसाठी श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ यांच्याकडून निवास, •➤ पान २ वर

## हेमंत भोपींना वरदहस्त कोणाचा?

**२५ वर्षांपासून एकाच जागी ठिय्या**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्हा रुग्णालयात तब्बल २५ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या हेमंत हरिश्चंद्र भोपी यांच्या सेवाकालाबाबत आता गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. १९९९ साली शिपाई म्हणून रुजू झालेले भोपी आजही त्याच ठिकाणी कार्यरत असून, इतक्या दीर्घ काळात त्यांची बदली किंवा विभागीय फेरबदल न झाल्याने ''भोपींना नेमका वरदहस्त कोणाचा?'' हा सवाल जोर धरू लागला आहे.



शासकीय सेवेत ठराविक कालावधीनंतर बदली प्रक्रिया राबवली जाते, जेणेकरून पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत संतुलन राखले जाईल. मात्र, भोपी यांच्या बाबतीत तब्बल २५ वर्षांचा कालावधी उलटूनही एकाच ठिकाणी ठिय्या कायम असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. ही बाब केवळ अपवादात्मक नसून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्हनिर्माणकरणारी ठरत आहे.

विशेष म्हणजे, गेल्या दहा वर्षांपासून हॉस्पिटल रजिस्ट्रेशन आणि एमटीपी रजिस्ट्रेशनसारख्या महत्त्वाच्या टेबलवर ते सातत्याने कार्यरत असल्याची तक्रार आहे. आर्थिक व्यवहाराशी संबंधित काम एकाच व्यक्तीकडे इतक्या दीर्घकाळ राहणे ही बाब कामाबाबत संशय निर्माण करणारी असल्याचे बोलले जात आहे. ''एकाच ठिकाणी, एकाच टेबलवर इतकी वर्षे कसे?'' असा प्रश्न उपस्थित केला •➤ पान २ वर

## दीड कोटींचा मुद्देमाल मालकांना सुपूर्द

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या पनवेल विभागांतर्गत येणाऱ्या पनवेल शहर, पनवेल तालुका आणि खांदेश्वर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध गुन्ह्यांत जप्त केलेला एकूण १ कोटी ५७ लाख ६४ हजार ५७० रुपये किमतीचा मुद्देमाल शुक्रवारी मूळ मालकांना परत करण्यात आला. पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आयोजित या कार्यक्रमामुळे आपली चोरीला गेलेली मालमत्ता पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.



यामध्ये ८९ लाख रुपये किमतीची २३ चारचाकी वाहने, ७ लाख २५ हजार रुपये किमतीचे ४२ मोबाईल फोन, ५९ लाख ५५ हजार ५७० रुपये किमतीचे ५८० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १ लाख ८४ हजार २०० रुपये किमतीच्या ८ दुचाकी वाहनांचा समावेश आहे.

आपली हक्काची मालमत्ता परत मिळाल्याबद्दल नागरिकांनी पोलिसांच्या कार्यतत्परतेचे कौतुक करत त्यांचे आभार मानले. ही यशस्वी कामगिरी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते आणि पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, वपोनि गजानन घाडगे आणि खांदेश्वरच्या वपोनि स्मिता ढाकणे यांनी आपल्या पथकासह महत्त्वाची भूमिका बजावली.

### कामोठ्यात वायूगळती

। पनवेल । प्रतिनिधी ।

कामोठे सेक्टर ३४ परिसरात सुरू असलेल्या जलवाहिनीच्या खोदकामादरम्यान गॅस वाहिनीला धक्का लागून वायूगळती झाली. या घटनेत कोणतीही जीवित वा वित्तहानी झाली नाही, मात्र, काही वेळ परिसरात भीतीचे वातावरण होते. मात्र, अग्निशमन दल, पोलीस आणि गॅस कंपनीच्या आपत्कालीन पथकाने तत्परतेने परिस्थिती नियंत्रणात आणली. कामोठे पोलीस ठाण्याचे वपोनि विमल बिडवे आणि पथकाने नागरिकांना घटनास्थळापासून सुरक्षित अंतरावर नेले.

**कोळी बांधव आर्थिक संकटात | मासळी उत्पादन घटल्याने फटका**

## एक महिनाआधीच बोटी किनारी

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढलेले डिझेलचे दर, समुद्रातील प्रदूषण, बदलते हवामान आणि अनधिकृत मासेमारी यांचा दुहेरी-तिहेरी फटका बसत असल्याने मुरुड परिसरातील कोळी बांधवांवर आर्थिक संकट ओढवले आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, नेहमीच्या वेळेपेक्षा तब्बल एक महिना आधीच अनेक मच्छिमारांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर ओढून ठेवल्या आहेत.



गेल्या आठ ते दहा वर्षांपासून कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार सतत अडचणींचा सामना करत आहेत. पावसाळ्यातील अनियमित पाऊस, वादळी वारे, तसेच समुद्रातील वाढते रासायनिक प्रदूषण यामुळे मासेमारीवर मोठा परिणाम झाला आहे. कारखान्यांमधून सोडले जाणारे विषारी द्रव्य समुद्रात मिसळल्याने मासळी उत्पादन घटले असून, याचा थेट फटका पारंपरिक मच्छिमारांना बसत आहे.

यातच सध्याच्या आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलचे दर प्रचंड वाढले आहेत. •➤ पान २ वर

सस्नेह निमंत्रण
रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२
✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नांव
कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग
(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील पतसंस्था)
मुख्य कार्यालय :- कमळ भवन, शिवाजी चौक, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१. दूरध्वनी क्र. : ०२१४१-२२६७१६/२२७८६६



३४ वा वर्धापन दिन
कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दि. ४ एप्रिल २०२६ रोजी संस्थेच्या अलिबाग येथील मुख्यालयात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे.
तरी यानिमित्त संस्थेच्या सर्व ग्राहकांना तिर्थ-प्रसादाचे आग्रहाचे निमंत्रण
तिर्थ-प्रसादाची वेळ : सकाळी १०.०० ते ७.००
कमळ परिवार

# थीम पार्कची मोडतोड, लॉनवर काँक्रिटचा थर

## पेण नगरपालिकेचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात

**। पेण । प्रतिनिधी ।**

शहरातील म्हाडा वसाहतीतील थीम पार्कमध्ये उघडपणे सुरू असलेल्या मोडतोडीच्या प्रकारामुळे आणि वादग्रस्त कामांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. काही महिन्यांपूर्वीच उभारण्यात आलेले विद्युतदिवे हेतुपुरस्सर तोडण्यात आल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे हिरवेगार लॉन काढून त्यावर थेट काँक्रिटीकरण केल्याने पेण नगरपालिका प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

थीम पार्कमध्ये लाईटचे काम पूर्ण होऊन तीन महिनेही उलटले नसताना अनेक विद्युतदिवे तोडलेल्या अवस्थेत दिसत आहेत. विशेष म्हणजे, पार्कमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असूनही ही मोडतोड होत असल्याने ''हे सर्व जाणूनबुजूनच सुरू आहे का?'' असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत. नगरपालिकेच्या मालकीच्या वस्तूंची उघडपणे तोडफोड होत असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याची टीका होत आहे.



पेणमधील हा थीम पार्क सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकलेला असल्याचे बोलले जाते. मूळ आराखड्यानुसार काम झाले नसल्याचे आरोप असून, करण्यात आलेल्या कामांमध्येही अनियमितता असल्याची चर्चा आहे. शहरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे एकमेव ठिकाण असलेल्या या पार्कमध्ये प्रशासनाच्या काळात गरज नसताना विविध कामे हाती घेण्यात आल्याचा आरोप आहे.

विशेषतः हिरव्या गवताच्या लॉनवर थेट सिमेंट काँक्रेट टाकण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. ज्या ठिकाणी लहान मुले खेळत होती, ज्येष्ठ नागरिक फिरत होते, त्या जागेचेच स्वरूप बदलण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर झाडांच्या भोवतीही काँक्रिटीकरण करण्यात आल्याने पर्यावरणाबाबतची बेफिकिरी उघड झाली आहे. या सर्व प्रकारामुळे ''नेमकं कोणासाठी आणि कशासाठी हे काम सुरू आहे?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे. ठेकेदारांना लाभ मिळवून देण्यासाठीच ही कामे केली जात आहेत का? अधिकारी वर्ग आणि ठेकेदार यांच्यातील साटेलोटे तर नाही ना? अशा शंका नागरिक मांडत आहेत.

दरम्यान, नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत या मुद्द्यावर जोरदार चर्चा रंगली. गटनेते अनिरुद्ध पाटील यांनी बांधकाम विभागाच्या कामकाजावर कडक शब्दांत टीका करत अभियंत्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. तर नगरसेवक भूषण कडू यांनीही गेल्या काही दिवसांपासून शहरातील बाग-बगिच्यांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला आहे.

सभेदरम्यान काही नगरसेवकांनी या मुद्द्यावरून वाद घालत विरोधी बाजू दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला. त्यामुळे अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न तर नाही ना? असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. एकूणच, थीम पार्कमधील मोडतोड, अनावश्यक काँक्रिटीकरण आणि प्रशासनाची भूमिका यामुळे पेण नगरपालिकेचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

# ज्योत्स्ना पारटेंच्या मृत्यूचे गूढ वाढले

## वडिलांकडून घातपाताचा संशय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील एका विवाहितेच्या मृत्यूने गूढ स्वरूप धारण केले असून, तिच्या वडिलांनी सासरच्या मंडळींवर गंभीर आरोप केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ज्योत्स्ना पारटे (३५) यांच्या मृत्यूबाबत आत्महत्येची नोंद झाली असली तरी हा प्रकार संशयास्पद असल्याचा दावा त्यांच्या कुटुंबियांनी केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत तालुक्यातील भूतिवली येथील सुहास काशीनाथ पवार यांची मुलगी ज्योत्स्ना यांचा विवाह २०१३ मध्ये खालापूर तालुक्यातील खरसुंडी येथील संतोष रामदास पारटे यांच्यासोबत झाला होता. विवाहानंतर २०१५ आणि २०१७ मध्ये त्यांना दोन मुली झाल्या. मात्र, मुलगा नसल्याच्या कारणावरून सासरच्या मंडळींकडून ज्योत्स्ना यांना सातत्याने त्रास दिला जात असल्याचा आरोप त्यांच्या वडिलांनी केला आहे.

ज्योत्स्ना यांचा पतीही त्यांना मानसिक त्रास देत असल्याचे सांगण्यात आले असून, या त्रासाला कंटाळून त्या काही काळ खरसुंडी येथे एकट्याच राहत होत्या. दरम्यान, १ एप्रिल २०२६ रोजी रात्री त्यांनी आत्महत्या केल्याची नोंद पोलिसांकडे आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली. त्यांना खोपोली येथील मोहिते रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

मात्र, मृतदेहाची पाहणी करताना कोणत्याही प्रकारच्या जखमेच्या खुणा आढळून न आल्याने तसेच गळफास घेतल्याचे स्पष्ट चिन्ह दिसून न आल्याने कुटुंबियांनी संशय व्यक्त केला आहे.

# चौलमध्ये सुक्या चाऱ्याची भीषण टंचाई

## पशुपालक अडचणीत; दूध उत्पादन घटले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्याला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि पर्यटन व्यवसायामुळे ओळख असली तरी येथील अनेक कुटुंबांचे प्रमुख उत्पन्न स्रोत शेती आणि पशुपालन आहे. मात्र, मागील काही दिवसांपासून सुक्या चाऱ्याच्या भीषण टंचाईमुळे पशुपालकांवर मोठे संकट ओढवले आहे.

सतत बदलणारे वातावरण, अवकाळी पाऊस आणि अनियमित हवामानामुळे चाऱ्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. परिणामी, सध्या सुक्या चाऱ्याची तीव्र कमतरता जाणवत असून, पशुपालक चिंताग्रस्त झाले आहेत.

पुरेसा व पौष्टिक चारा उपलब्ध नसल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत असून, त्याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर होताना दिसत आहे. दुधाचे प्रमाण लक्षणीयरित्या घटले असून, पशुपालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एकीकडे दुधाला मिळणारा दर आणि दुसरीकडे वाढता खर्च यांचा ताळमेळ बसवणे कठीण बनले आहे. या परिस्थितीत शासनाने तातडीने सुक्या चाऱ्याच्या उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पशुपालकांकडून केली जात आहे. अन्यथा येणाऱ्या काळात पशुपालन व्यवसाय मोठ्या संकटात सापडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# खरातचे फोन कनेक्शन

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

भोंदूबाबा अशोक खरात विरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भोंदू खरातला कुणाचे सर्वाधिक फोन कॉल झाले, कोणत्या नेत्याशी तो किती वेळ बोलला, त्याने कोणत्या नेत्याला कितीदा फोन केले, दोघांमध्ये कितीवेळा बोलणे झाले याची इत्यंभूत माहिती अंजली दमानिया यांनी बाहेर आणली. त्यांनी कॉल डिटेल रेकॉर्ड जाहीर केला आहे. रूपाली चाकणकर यांनी एकूण १७७ कॉल खरातला केले आहेत. यामध्ये दोघांमध्ये ३३ हजार ७२७ सेकंदाचे संभाषण झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सर्वात जास्त संभाषण २१ मिनिटांचे आहेत. या १७ कॉल्समध्ये १० इनकमिंग, ७ आऊटगोईंग कॉल्स झाले आहेत. चंद्रकांत पाटील आणि सुनील तटकरे यांचे प्रत्येकी आठ कॉल आहेत.

# दळी जमिनीतून रस्त्याला वनविभागाची आठकाठी

## आदिवासी कार्यकर्त्यांचा आत्मदहनाचा इशारा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माथेरानचे डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्यांमध्ये जाण्यासाठी दळी जमिनीतून रस्ता करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून हा १३ किलोमीटर लांबीचा रस्ता बनविण्यास परवानगी दिली आहे. मात्र, वन विभाग त्या जमिनीतून रस्ता करण्यास परवानगी देत नाही आणि त्यामुळे आदिवासी कार्यकर्ते आत्मदहन करणार आहेत. जैतू पारधी आणि गणेश पारधी हे आत्मदहन करणार असून, या रस्त्यासाठी हे कार्यकर्ते गेली अनेक वर्षे पाठपुरावा करीत आहेत.



तालुक्यातील माथेरान चे डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्या वन जमिनीवर वसल्या आहेत. तब्बल २०० वर्षे जुन्या असलेल्या या आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता शासन तयार करीत आहेत. त्यातील संबंधित १२ आदिवासी वाड्या ह्या माथेरान डोंगर पट्ट्यात पिढ्यान् पिढ्या ब्रिटिश काळापासून वसलेल्या असून, स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे होऊनसुद्धा रस्त्यापासून वंचित आहोत. आदिवासी लोकांना रस्त्याअभावी वेळेवर उपचार न मिळाल्याने वाटेतच मृत्यू झाले आहेत. कर्जत-कल्याण राज्य मार्ग ७६ ते जुम्मापट्टी हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर आहे. हा रस्ता तीन ग्रामपंचायतींमधून जात असून, रस्त्याच्या कामाला किरवलीपासून सुरुवात झालेली आहे. वन विभागाने या रस्त्यातील काही भागाला अद्याप परवानगी दिलेली नाही. माणगावतर्फे वरेडी ग्रामपंचायतीमधील रस्त्यासाठी वन विभागाकडून परवानगी देण्यात आलेली नाही. कायद्यात बसत असूनसुद्धा वनविभाग कार्यालयाकडून जाणीवपूर्वक मंजुरी मिळत नसल्यामुळे आदिवासी समाज नाराज आहे.

या रस्त्यासाठी गेली २० वर्षे प्रयत्न करणारे आदिवासी सामाजिक कार्यकर्ते जैतु पारधी आणि गणेश पारधी यांनी अनेकवेळा उपोषणे आणि रास्ता रोको अशी आंदोलने केली आहेत. मात्र, शासन स्तरावर सहकार्य मिळत नसल्याने अखेर हे दोन्ही आदिवासी कार्यकर्ते २१ एप्रिल रोजी वनविभाग कार्यालय, कर्जत येथे आत्मदहन करणार असल्याचे जाहीर करून तसे पत्रही देण्यात आले. या पत्राची दखल घेऊन लवकरात लवकर कारवाई नाही झाली तर आत्मदहनाशिवाय कोणताही पर्याय नाही, असा ठाम निर्धार आदिवासी कार्यकर्त्यांनी केला आहे.

# प्रकाशन सोहळा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लेखक प्रशांत डिंगणकर यांच्या 'मनबाधा' या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन सोमवार, ६ एप्रिल रोजी होणार आहे. साहित्यिक प्रवीण दवणे यांच्या हस्ते 'मनबाधा'चे प्रकाशन होणार असून, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार या सोहळ्याचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. रवींद्र नाट्य मंदिर लघु नाट्यगृहात (पु.ल. देशपांडे कला अकादमी) दुपारी ३.३० वाजता हा प्रकाशन सोहळा होणार असून, ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोकर आणि साहित्यिक डॉ. महेश केळुसकर यावेळी उपस्थित राहणार आहेत. मनबाधा हा हळव्या मनातील हलकल्लोळाचा वेध घेणारा ललित लेखसंग्रह असून, या प्रकाशन सोहळ्याला रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्वामीराज प्रकाशनचे रजनीश राणे आणि प्राची व सई डिंगणकर यांनी केले आहे.

पान १ वरून

## नागलोली धरणाचा बोजवारा

सिंचनाचा लाभ देण्याचे स्वप्न दाखविण्यात आले होते. मात्र, आज त्याठिकाणी विकासाऐवजी निष्क्रियतेचेच चित्र दिसत आहे. उद्घाटनानंतर २०२३-२४ मध्ये सुरू झालेले कॅनॉल व दगडी बांधकाम पावसाच्या पहिल्याच फटक्यात वाहून गेले. यामुळे कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे आधीच खर्च केलेला निधी पाण्यात गेला असून, आता प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुन्हा कोट्यवधी रुपयांची मागणी पुढे आली आहे.

उन्हाळ्यात नागलोलीसह कासारकोंड, नवीवाडी, बोर्ला, वावे धनगरमलाई इत्यादी गावांतील शेतकरी आणि नागरिक अक्षरशः पाण्यासाठी हवालदिल होतात. टँकरने पाणी आणण्याची वेळ आली येते. शेती कोरडी पडली, उत्पन्न घसरले, कर्जबाजारीपणा वाढला, तरीही प्रशासन ढिम्म असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. महिलांना तासन्तास पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागत असून, लहान मुलांनाही पाणी भरण्याच्या कामात ओढले जात आहे. 'उद्घाटन झाले, पण पाणी नाही' अशी संतप्त भावना पंचक्रोशीत उमटत आहे. विशेष म्हणजे, भूसंपादन व अन्य प्रक्रिया पूर्ण असतानाही निधीअभावी काम थांबले आहे. जलसंधारण महामंडळ व संबंधित विभागांकडून केवळ कागदी हालचाली होत असल्याचा आरोप असून, कंत्राटदाराने अर्धवट काम सोडल्याने परिस्थिती अधिकच बिघडली आहे. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे.

## 'जय भवानी, जय शिवाजी'ने गड दुमदुमला

पिण्याचे पाणी व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत गर्दीचे सुरळीत नियोजन केले.

दरम्यान, अनेक शिवभक्तांनी पदयात्रा करत गड गाठला, तर काहींनी वाहनांनी प्रवास करून उपस्थिती लावली. रायगड हा केवळ ऐतिहासिक किल्ला नसून, शिवरायांच्या कार्याची साक्ष देणारे प्रेरणास्थान असल्याने या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. याच गडावर शिवरायांनी अखेरचा श्वास घेतला असल्याने शिवपुण्यतिथीला येथे अभिवादन करण्याला शिवभक्त विशेष महत्त्व देतात. एकूणच, २ एप्रिल (तिथीनुसार) आणि ३ एप्रिल (तारखेनुसार) पार पडलेला शिवपुण्यतिथी सोहळा रायगडावर अत्यंत भावनिक, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## १३ कोटींची पाणीपुरवठा योजना कोलमडली

समावेश होता. या माध्यमातून तळा शहरातील नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्याचा शासनाचा उद्देश होता. मात्र, प्रत्यक्षात या कामांची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे नागरिकांना अजूनही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, तळा शहरातील कुंभार आळी येथील बापूजी देवस्थान यात्रा उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात भाविक आणि ग्रामस्थ येथे दाखल होत असतात. या कालावधीत नगरपंचायतीकडून सुरळीत पाणीपुरवठा करण्यात अपयश येत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, कामात ढिलाई, योग्य नियोजनाचा अभाव आणि ठेकेदारांवर प्रभावी नियंत्रण नसणे या कारणांमुळे ही योजना कोलमडली आहे. एवढा मोठा निधी मंजूर होऊनही काम अपेक्षित वेगाने पूर्ण होत नसल्याने निधीचा योग्य वापर झाला आहे का, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

## हेमंत भोपींना वरदहस्त कोणाचा?

जात आहे. गेल्या २५ वर्षांपासून ते नियोजन विभागाशी संबंधित कामांमध्ये सक्रिय असल्याचे सांगितले जाते. या विभागात दीर्घकाळ एकाच व्यक्तीचा प्रभाव राहिल्याने विविध स्तरांवर चर्चा रंगू लागली आहे. दीर्घकाळ एकाच जागी कार्यरत राहिल्यामुळे कामकाजात पारदर्शकतेचा अभाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भोपींना इतकी वर्षे एकाच ठिकाणी टिकून राहणे शक्य कसे झाले? यामागे कोणाचे पाठबळ आहे? प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष का केले गेले? असे अनेक प्रश्न आता उघडपणे विचारले जात आहेत. इतक्या वर्षांत बदली न होणे, प्रशासनाकडून कोणतीही ठोस हालचाल न दिसणे, यामुळे या प्रकरणाची चर्चा अधिकच रंगत चालली आहे. जिल्हा रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणावर स्पष्ट भूमिका घेणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. नियमांनुसार बदली प्रक्रिया का राबवली गेली नाही? यामागे नेमके कारण काय? याची माहिती समोर येणे गरजेचे आहे.

एकूणच, हेमंत भोपी यांचा २५ वर्षांचा एकाच ठिकाणी असलेल्या कार्यकाळाबाबत आता चर्चा रंगत असून, यामागील वास्तव काय आहे, याचा शोध घेण्याची मागणी होत आहे. प्रशासन या प्रश्नांना उत्तर देणार का? आवश्यक ती पावले उचलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एक महिनाआधीच बोटी किनारी

त्यामुळे मासेमारीसाठी समुद्रात जाणेच परवडेनासे झाले आहे. खर्च वाढत असताना उत्पन्न मात्र घटत चालल्याने कोळी बांधव अक्षरशः दुष्काळी परिस्थितीला सामोरे जात आहेत. मच्छिमारांसाठी वर्षभरात साधारण सहा हंगाम महत्त्वाचे मानले जातात. त्यापैकी पावसाळ्यानंतरचा गणपतीचा हंगाम हा सर्वात मोठा आणि उत्पन्न देणारा काळ असतो. कारण, पावसाळ्यातील तीन महिन्यांच्या बंद काळात माशांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर होते. मात्र, अलीकडे या बंद काळातही एलईडी लाईटच्या सहाय्याने होणारी अनधिकृत मासेमारी वाढली आहे. त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांना मुख्य हंगामात अपेक्षित प्रमाणात मासळी मिळत नाही. पुढील उर्वरित हंगामांमध्येही बदलत्या हवामानामुळे मासेमारी अनिश्चित झाली आहे. त्यामुळे कोळी बांधवांना कसाबसा उदरनिर्वाह करावा लागत आहे. मुरुड येथे अद्याप सुसज्ज मासेमारी जेट्टीची सुविधा नसल्याने बोटी वाळूत उभ्या कराव्या लागतात. यामुळे बोटींचे नुकसान, अपघात आणि दुरुस्तीचा खर्च वाढतो. तातडीच्या दुरुस्तीच्या सुविधांचा अभाव असल्याने किनाऱ्यावर बोटी ओढल्यानंतरच त्यांची दुरुस्ती करावी लागते.

दरम्यान, समुद्रात जाणे शक्य नसल्याने काही कोळी बांधव किनाऱ्यावर 'रापण' पद्धतीने मासेमारी करत आहेत. यात आठ ते दहा जण मिळून जाळे टाकून किनाऱ्यावर मासे ओढले जातात. मात्र, या पद्धतीतून मिळणारे उत्पन्न अत्यल्प असून, त्यावर कुटुंबाची गुजराण करणे कठीण झाले आहे. काही जण तर मजुरीकडे वळले असून, महिलाही रोजगारासाठी बाहेर पडत आहेत. एकूणच, वाढता खर्च, घटते उत्पन्न, प्रदूषण, अनधिकृत मासेमारी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे कोळी बांधवांचे जीवन विस्कळीत झाले आहे. या परिस्थितीस जबाबदार कोण?, असा सवाल आता मुरुडमधील मच्छिमार उघडपणे विचारत आहेत.

## डिजिटल अटकेची धमकी देत लूट

मोबाइलवर आलेल्या फोनवरून समोरील व्यक्तीने स्वतःची ओळख दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी म्हणून करून दिली. दहशतवादी संघटनेशी तुमचे आर्थिक व्यवहार आले असून, तुमच्या खात्यातून संघटनेच्या खात्यात पैसे वर्ग नाल्याचे सांगितले. तर तुम्हाला डिजिटल अटक करावी लागणार, अशी भीती दाखवत ऑनलाइन पद्धतीने पैसे लुटण्यात आले.

## कार फोडून १३ लाखांचा ऐवज लंपास

परतत होते. शिंदे कुटुंबीय कल्ले गाव येथील गो ग्रीन हॉटेलमध्ये जेवण्यासाठी थांबले. शिंदे यांनी गाडी हॉटेलच्या पार्किंगमध्ये उभी केली. याच कालावधीत चोरट्याने शिंदे यांच्या गाडीची काच फोडून गाडीत ठेवलेल्या पर्समधील दहा तोळ्यांचे मंगळसूत्र, आठ तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या आणि चार तोळ्यांची सोन्याची पाटली, तसेच ५० हजारांची रोख रक्कम आणि कागदपत्रे चोरून नेली. जेवण झाल्यानंतर शिंदे कुटुंबीय दीड तासांनंतर परतले असता, त्यांना गाडीच्या डाव्या बाजूची पाठीमागील काच फुटलेली दिसली. त्यांच्या तक्रारीनंतर पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा नोंदवला.

## आणखी एका आरोपीला अटक

केल्याचे उघड झाले होते. याप्रकरणी दोन आरोपींना यापूर्वीच गजाआड करण्यात आले. पनवेल तालुका पोलिसांनी संशयित आरोपींना यवतमाळ पोलिसांच्या ताब्यात दिले. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. वलप ग्रामपंचायतीच्या नावाचा वापर या गुन्ह्यात कसा झाला, याचा शोध पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणातील तिन्ही संशयितांना पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यापैकी दोघांची रवानगी न्यायालयीन कोठडीत, तर २२ वर्षीय संशयित आरोपीला पोलीस कोठडी सुनावण्यात आली. एका दाखल्यासाठी ५ ते १० हजार रुपये घेऊन हे संशयित जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी करत होते. सीआरएस पोर्टलवरून जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची नोंदणी केली जाते. या पोर्टलमधील काही त्रुटींचा फायदा या सायबर गुन्हेगारांनी घेतला.

# कोप्रोलीत तिसऱ्या मुंबईविरोधात एल्गार

## ग्रामस्थांनी काळे पिवळे मार्किंगचे पट्टे जाळले

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जमीन, घर आणि गाव वाचवा, एमएमआरडीए हटवा, जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची अशी घोषणाबाजी करीत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी कोप्रोली येथील ग्रामस्थांनी तिसऱ्या मुंबईविरोधात गुरुवारी (२) पुन्हा एकदा एल्गार केला आहे. संतप्त ग्रामस्थांनी एमएमआरडीएने कोप्रोली गावच्या वेशीवर काळे पिवळे चौकटीत मार्किंगला केलेले रंगाचे पट्टे पुन्हा एकदा पेट्रोल ओतून पेटवून देत शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

एमएमआरडीएने कोप्रोली गावच्या वेशीवर काळे २ एप्रिल रोजी पिवळे चौकटीत मार्किंगला केले होते. गुरुवारी संतप्त झालेल्या कोप्रोली ग्रामस्थ व सर्व पक्षांचे प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येत या मार्किंगला काळे फासून निषेध केला. उपस्थितांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा तीव्र निषेध करीत या मार्कींगवर टायर जाळून सरकार आणि एमएमआरडीएला इशारा दिला आहे. ''जमीन, घर आणि गाव वाचवा एमएमआरडीए हटवा'', ''जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची'' असे नारे देत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी जोरदार एल्गार केला आहे.



यावेळी एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी सरकारने तिसऱ्या मुंबईसाठी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या शासन निर्णयाची माहिती दिली. सरकारचे धोरण फसवे आणि शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याला बळी पडू नये. शेतकऱ्यांनी संघटीत राहून संघर्ष केला नाही तर भविष्यात आपली मूळ गावठाणाबाहेरील घरेही बेकायदेशीर ठरतील. सरकारने या सर्व घरांना सनद (प्रॉपर्टी कार्ड) देऊन सुरक्षित करावे तसेच मूळ गावठाणाबाहेर ५०० मीटरपर्यंत गावठाण क्षेत्र जाहीर करावे. एमएमआरडीएने गावोगावी अशा प्रकारचे मार्किंग करून हद्दी निश्चित करत बेकायदेशीरपणे सर्वेक्षण सुरू केलं आहे. त्याला सर्वत्र विरोध होत आहे.

याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, एड. पर्जन्य म्हात्रे, विपुल म्हात्रे, शशिकांत पाटील, प्रवीण म्हात्रे, अमेय पितळे, दिलीप म्हात्रे, हितेश म्हात्रे, अमृत म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, ओमकार गावंड, हर्षद पाटील, ओंकार म्हात्रे, सौरव पाटील, नमोद म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# अनुकंप प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात येणाऱ्या एकत्रित गट-क संवर्गातील सामायिक अनुकंपा प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रतीक्षा यादी (विवरणपत्र-अ) व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावरील गट ड संवर्गाची अनुकंपा प्रतीक्षा सूचीतील नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांची यादी विवरणपत्र व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात व जिल्हा संकेतस्थळ यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीतील नाव व क्रमांकाबाबत उमेदवारांची कोणतीही हरकत असल्यास, उमेदवारांनी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्यामार्फत आपले हरकत अर्ज दि.१५ एप्रिलपर्यंत या कार्यालयाकडे सादर करावेत. दि.१५ एप्रिलनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी कळविले आहे.

# फार्मर आयडीसाठी किसान क्रांती संघटना आग्रही

## शेतकऱ्यांच्यावतीने तहसीलदारांना निवेदन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना फार्मर आयडी नसल्यामुळे अनेक सरकारी योजनांचा लाभ घेता येत नाही. तसेच शेतकऱ्यांना कुठेही योजनेसाठी अर्जही करता येत नाही. किसान क्रांती संघटना कर्जत तालुका कमिटीच्यावतीने शेतकऱ्यांच्या समस्येबाबत कर्जत तालुका तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

भारत सरकारने फार्मर आयडी शेतकऱ्यांना अनिवार्य केल्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाही, त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तसेच काही शेतकऱ्यांची केवायसी होत नाही. अनेकदा केवायसी कराव्या लागत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये नाराजीचे स्वरूप पाहायला मिळत आहेत. सर्वच शेतकऱ्यांकडे स्मार्ट मोबाइल असतो, असे नाही. स्मार्टफोन नसल्यामुळे ऑनलाइन ई-पीक पाहणी करता येत नाही. कारण, ही ई-पीक पाहणी शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतामध्ये उभे राहून करायचे असते, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना या ई-पीक पाहणीसाठी पण अडचणी निर्माण होत आहेत. त्यामध्ये कधी सर्वर



डाऊन असणे, काही ठिकाणी नेटवर्क नसतो, अशा अनेक समस्यां शेतकऱ्यांना उद्भवत आहेत.

शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अशा अनेक समस्या लक्षात घेऊन शासन स्तरावर तात्काळ समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी किसान क्रांती संघटना महाराष्ट्र तसेच रायगड जिल्हा कमिटी आणि कर्जत तालुका कमिटी यांच्या माध्यमातून कर्जत तहसीलदारांना तालुकाध्यक्ष शरद तवळे यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. या निवेदनानुसार, तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी अद्याप मिळाला नाही किंवा केवायसीअभावी लाभार्थी वंचित असेल, या सर्व कामांसाठी एक विशेष शिबीर आयोजित केले जाईल, असे आश्वासन देण्यात आले. तसेच शेतकरी यांच्या तक्रारांची घटनास्थळी जाऊन पंचनामे तसेच संपूर्ण अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यासाठी पत्रकदेखील मंडल अधिकारी स्तरावर देण्यात येईल, असे आश्वासन शेतकरी आणि किसान क्रांती संघटनेला तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिले.

दरम्यान, यावेळी पोशीर येथील पीडित शेतकरी परशुराम हाबळे यांना आपल्या शेतजमिनीमध्ये जाण्यासाठी रस्ता मिळावा यासाठी किसान क्रांती संघटना यांना तक्रार अर्जानुसार यांना न्याय मिळवून देण्याचे काम कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी करावे, यासाठीही अर्ज देण्यात आला.

## निवडक



### भिवगडावर स्वच्छता मोहीम

**कर्जत :** ऐतिहासिक वारसा जतन करणे आणि गड-किल्ल्यांचे पावित्र्य राखणे या उद्देशाने राजा शिवछत्रपती परिवार अंतर्गत रायगड विभागाच्या वतीने कर्जत तालुक्यातील किल्ले भिवगडावर रविवारी (दि.२९) मार्च रोजी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड परिवाराची ही ९१ वी विभागीय मोहीम यशस्वीपणे पार पडली असून, यामध्ये दुर्गप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होत श्रमदान केले. मोहिमेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. राष्ट्रगीताच्या गायनाने आणि त्यानंतर परिवार ध्येयमंत्र, छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणामंत्र व शिवगर्जना देऊन संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. या वातावरणाने उपस्थित मोहीम वीरांमध्ये नवा उत्साह आणि राष्ट्रभक्तीची भावना संचारली असल्याचे चित्र पाहावयास मिळत होते. वदप, गौरकामत गावाच्या हद्दीत असलेला हा ऐतिहासिक भिवगड किल्ला निसर्गप्रेमी आणि ट्रेकर्ससाठी आकर्षणाचे केंद्र आहे. या मोहिमेअंतर्गत गडावरील प्राचीन पाण्याच्या टाक्यांमधील साचलेला गाळ स्वच्छ करण्यात आल्या. संपूर्ण गडावर विखुरलेला कचरा गोळा करून किल्ला प्लास्टिकमुक्त करण्यात आला.




### महिला संघटनेचे तहसिलदारांना निवेदन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील जनतेला गॅस सिलिंडरची टंचाई भासत आहे. याची योग्य ती दखल घेऊन गॅस सिलिंडरची उपलब्धता वाढवून सिलेंडर बुकींग नंतर त्वरीत वितरीत करण्यासाठी सहकार्य करावे अशा स्वरूपाचे निवेदन अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या शिष्टमंडळाच्या वतीने उरणचे तहसिलदार डॉ. उध्दव कदम यांना गुरुवारी (दि.२)रोजी देण्यात आले. युद्धजन्य परिस्थितीत केंद्र व राज्य सरकार गॅस सिलेंडरचा तुटवडा नसल्याचे प्रसार माध्यमातून सतत जाहीर करीत आहे. मात्र, प्रत्यक्ष गॅस सिलेंडरसाठी गावात, शहरात लांबच लांब रांगा दिसत असल्याच्या बातम्या वृत्त पत्रातून प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे जनतेला दिलासा देण्यासाठी पूर्वी २१ दिवसानंतर सिलेंडरची बुकिंग घेऊन २ ते ५ दिवसात सिलेंडर उपलब्ध करून द्यावा असे निवेदन देण्यात आले. तालुक्यातील सर्व गॅस पुरवठा एजन्सीचे चालक हे ग्राहकांना सहकार्य करून सिलेंडरची पुरवठा साखळी नियमित सुरु ठेवतील, अशा मागणीचे निवेदन तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांना निवासी नायब तहसिलदारांच्या उपस्थितीत अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या हेमलता पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.



### 'रायगड किल्ला पाहून मी धन्य झाले'

**चिरनेर :** रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रत्यक्षात जगणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, तसेच काँग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक बुधवारी (दि.१) एप्रिल रोजी रायगड किल्ल्यावर शिवरायांच्या चरणी नतमस्तक झाल्या. यावेळी रायगड किल्ला आणि शिवरायांची महती फक्त ऐकून असलेल्या रागिणी नायक रायगड किल्ला 'याचि देही याचि डोळा' पाहून भारावून गेल्या. 'शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. असा राजा जगात झाला नाही आणि होणारही नाही. जेथे शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. तोच हा रायगड किल्ला' असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष घरत यांनी राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक यांना सांगितले. 'आज मी शिवाजी महाराज यांचा रायगड किल्ला पाहून धन्य झाले' असे उद्गार रागिणी नायक यांनी यावेळी काढले. यावेळी शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे मिलिंद पाडगावकर, निखिल ढवळे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.




### संघटन सृजन अभियानाला प्रतिसाद

**पनवेल :** पनवेल शहरातील तथास्तु सभागृह येथे काँग्रेस पक्षाला उभारी देण्यासाठी संघटन सृजन अभियान आयोजित करण्यात आले आहे. या बैठकीत राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक, प्रदेश निरीक्षक अ‍ॅड. तौफिक मुलाणी, श्रीरंग बरगे, सुदाम पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी डॉ. नायक यांनी सांगितले की, राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मार्गदर्शनानुसार गावा-गावात जाऊन आम्ही विविध समाजातील लोकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न जाणून घेतले. समाजातील शेवटच्या व्यक्तीला न्याय देण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे. त्याप्रमाणे नवीन कार्यकारिणी जाहीर करणार असल्याचे सांगितले. यावेळी हेमराज म्हात्रे, चंद्रकला नायडू, हरेश केणी, लतीफ शेख, वैभव पाटील, अ‍ॅड. श्रुती म्हात्रे, शशिकांत बांदोडकर, डॉ. अमित दवे, अमित लोखंडे, सुधीर मोरे, राकेश जाधव आदी उपस्थित होते.

# अवकाळीचा शेतकऱ्यांना तडाखा

## माणगाव तालुक्यात जनजीवन विस्कळीत, शेतकऱ्यांचे कोट्यावधींचे नुकसान

**| माणगाव | प्रतिनिधी |**

**गेल्या काही दिवसापासून पुणे तसेच मराठवाडा भागात सुरू असलेल्या अवकाळी पावसाचे पडसाद आता कोकणातही उमटू लागले आहेत. रायगड जिल्हातील माणगाव तालुक्यात गुरुवारी ता. २ एप्रिल रोजी दुपारी अचानक झालेल्या अवकाळीच्या पावसाने जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते.**

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे हवामानातील वातावरणात मोठे बदल जाणवत होते. त्यातच अचानक झालेल्या पावसाच्या तडाख्यामुळे कांही काळ माणगावची बाजारपेठ ठप्प झाली. नागरिकांची तारांबळ उडाली, तर काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला होता. त्यामुळे शेतीला मोठा फटका बसला असून तालुक्यात सध्या कडधान्य पिकांची काढणी आणि मळणी सुरू आहे. वाल, मुग, पावटा, चवळी, हरभरा ही पिके शेतात किंवा मळणीत असतानाच पावसाने हजेरी लावल्याने मोठे नुकसान झाले आहे. तर काही शेतांमध्ये उभे असलेले कलिंगड पिकही धोक्यात आले आहे.



अवकाळी पावसामुळे आंबा-काजू बागायतदारांचे पुरते कंबरडे मोडले आहे. अवकाळीमुळे आंबा आणि काजू या फळपिकांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः आंब्याची मोठ्या प्रमाणात फळगळ होऊन बागायतदारांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. निसर्गाच्या लहरीतून कसेबसे सावरलेले फळपिक व कडधान्य पीकाला अवकाळीचा फटका होशील अशी शेतकऱ्यांची भीती खरी ठरली. गेल्या काही दिवसांपासून हवामानातील बदलांमुळे अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर त्या भीतीचे वास्तवात रूपांतर झाले असून, आधीच नैसर्गिक संकटांनी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी बागायतदारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन बिघडले असून नुकसान भरपाईची मागणी जोर धरत आहे. प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करून मदत देण्याची मागणी केली जात आहे.

### पुढील काही दिवस सतर्कतेचे

हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अवकाळी पावसाच्या वाढत्या घटनांकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहून चालणार नाही. हे बदलत्या हवामानाचे गंभीर संकेत आहेत. कोकणा सारख्या पारंपरिक दृष्ट्या स्थिर हवामान असलेल्या भागातही अशा अनियमित पावसाची पुनरावृत्ती होत असल्याने शेती व्यवस्थेचे नियोजन नव्याने करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्या बरोबरच दीर्घकालीन उपाययोजना पिक विमा, हवामान आधारित शेती सल्ला आणि साठवण सुविधा याकडे शासनाने लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

# नेरळमध्ये मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव

## स्वखर्चातून फवारणीसाठी पोतदार रस्त्यावर

**| कर्जत | प्रतिनिधी |**

नेरळमधील आरोग्याच्या दृष्टीने मच्छरांच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या मुख्य स्थितीकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे चित्र समोर येत आहे. असे असतानाच, नेरळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच असलेले केतन पोतदार यांनी नेरळ ग्रामपंचायत परिसरातील मच्छरांचे वाढत्या प्रादुर्भावाची समस्या संदर्भात सामाजिक भावनेतून एक पाऊल पुढे टाकत स्वखर्चातून फवारणीसाठी थेट रस्त्यावर उतरत सुरवात केली आहे. ज्या भागांमध्ये मच्छरांचा प्रादुर्भाव जास्त आसेल त्या भागातील नागरीकांनी फवारणीसाठी संर्पक करण्याचे आहवान देखील पोतदार यांनी केले आहे.



नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्न, घाणीचे साम्राज्य व ग्रामपंचायतीची घसरलेली आर्थिक परस्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाला धारेवर धरण्यासह आदी कामे सुरू आहेत.

मात्र, नेरळमधील मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव मच्छरांमुळे होणारे डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया यासारख्या आजारा होण्याचे निर्माण होत असलेली स्थिती आहे. वाढत्या मच्छरांच्या प्रादुर्भावामुळे डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया आशा आजाराची लागण होऊन नये व नागरिकांच्या आरोग्या संदर्भातील समस्याचे निवारण होण्यासाठी लवालवाडी, सेवालाल नगर खांडा, हेटकरआळी, टेपआळी, भिताडआळी, ब्राम्हणआळी आदी भागांमध्ये फवारणी मोहीम सुरू केली आहे.

### दीड कोटींची फसवणूक

**पनवेल :** शेअर्स ट्रेंडिंगमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून एक कोटी पन्नास हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमाविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राकेश कुर्मी हे नवीन पनवेल, सेक्टर सहा येथे राहत असून त्यांनी टेलिग्राम मध्ये जाहिरात लिंक पाहिली. त्यांनी लिंकवर क्लिक केले असता ते व्हाट्सअप ग्रुपला जॉईन झाले. यावेळी ग्रुपवर नफ्याबाबत माहिती दिली जात होती. यांनी पन्नास हजार रुपये डिपॉझिट केले आणि शेअर्समध्ये पैसे गुंतवणूक केल्याने त्यांना नफा होत होता. त्यामुळे त्यांनी अधिक पैशांचे त्यांनी एक कोटी पन्नास हजार रुपये भरल्यानंतर वेगवेगळे आयपीओ देण्यात आले



### संघटन सृजन अभियानात कार्यकर्त्यांशी चर्चा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने सुरू केलेल्या संघटन सृजन अभियानात पक्षाने नियुक्त केलेल्या जिल्ह्यातील प्रमुख निरिक्षकांनी बुधवारी मुरुड तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक गाठीभेटी घेऊन चर्चा केली.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निरिक्षक डॉ. रागिणी नायक, प्रदेश समन्वयक प्रदीप राव व मनिष गणोरे, महेंद्र घरत, प्रदेश मिलिंद पाडगावकर, राजा ठाकुर, अ‍ॅड. इस्माईल घोले, अस्लम हलडे आदी यावेळी उपस्थित होते. संघटन सृजनवर चर्चा करतांना संघटना मजबूत करुन तळागाळातील लोकांपर्यंत पक्षाचे काम पोहचवण्यासाठी तसेच तालुका व जिल्हा पातळीवरील संघटनेतील फेरबदल आदी बाबतीत त्यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा केली. दरम्यान नांदगाव येथे पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन अ‍ॅड. इस्माईल घोले यांच्या हस्ते करण्यात आले.

# विद्यार्थ्यांची कलाक्षेत्रात उज्ज्वल भरारी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव येथील सुधाकर नारायण शिरूरकर इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कला स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, मेहनतीचा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा हा गौरवशाली परिपाक मानला जात आहे.

कार्टून बनवणे, रेखांकन, रंगभरणे आणि हस्तलेखन अशा विविध प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा सिद्ध केली. या यशस्वी वाटचालीत आवटे सानिका दिनेश हिने कार्टून बनवणे स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावत स्मृतीचिन्ह मिळवले. तसेच सोना सरफराज खान आणि विहान दर्पण मोरे यांनी स्टार अवॉर्ड पटकावत सुवर्णपदक मिळवून चमक दाखवली. लहानग्या गटातही उल्लेखनीय कामगिरी करत मुजिब कमल मुलानी याने केजी पुरस्कार मिळवत सर्वांचे लक्ष वेधले. याशिवाय माहम अंतुले, अनुराज बारगे, गार्गी मोरे, शेरीन गुप्ता, नील उतेकर, रुही




महाडिक, आराध्या कायापक, जयदीप लिमकर, साई त्रिभूवन, श्रावणी चव्हाण, मायरा सकपाळ, स्वाती गुरव, मिहीका शिंदे, खुशी लिमकर, वर्धा काळे, खदिजा म. अथर शेख, रुनित साळुंके आदी विद्यार्थ्यांनी सुवर्णपदकांची कमाई केली. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक मनिषा मोरे, अनंत सावंत व शिक्षकवर्गांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा शैक्षणिक व सांस्कृतिक दर्जा अधिक उंचावला असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# वाघरे इंग्रजी माध्यम शाळेचे दैदिप्यमान यश

**| माणगाव | प्रतिनिधी |**

गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळा, माणगाव येथील विद्यार्थ्यांनी द ड्रिम आयोजित राष्ट्रीय स्तरावरील प्रिमियम विविध कला स्पर्धांमध्ये आपल्या सर्जनशीलतेचा ठसा उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, मेहनतीला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला मिळालेला हा सन्मान शाळेसाठी अभिमानास्पद ठरला आहे.




या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी रेखांकन, रंगकाम, कार्टून बनवणे, हस्तलेखन, तसेच क्राफ्ट मेकिंग अशा विविध कलाप्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पुरस्कार पटकावले. स्वरा उदय मोरे (इयत्ता ९वी) रेखांकन व रंगकाम या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावत स्मृतिचिन्ह मिळवले. स्वरा प्रदीप गायकवाड (इयत्ता ६वी) कार्टून बनवणे या प्रकारात स्टार अवॉर्ड मिळवत सुवर्णपदक प्राप्त केले. स्मित महेंद्र (इयत्ता ६वी) रंग भरणे या प्रकारात गोल्डन अवॉर्ड पटकावला. मृदा सुहास सावंत (इयत्ता ७वी) रंग भरणे स्पर्धेत गोल्डन अवॉर्ड मिळवला. तन्वी पोवार (इयत्ता ९वी) हस्तलेखनात गोल्डन अवॉर्ड मिळवत आपली सुंदर अक्षरकला सिद्ध केली. श्रावणी काटोलकर (इयत्ता ८वी) रंग भरणे या प्रकारात गोल्डन अवॉर्ड मिळवला. रोहित गोळे (इयत्ता ७वी) रंग भरणे स्पर्धेत गोल्डन अवॉर्ड पटकावला. मिताली जगदाळे (इयत्ता ६वी) हस्तलेखनात गोल्डन अवॉर्ड मिळवला. अनन्या तावडे (इयत्ता ९वी) क्राफ्ट मेकिंगमध्ये गोल्डन अवॉर्ड मिळवत उत्कृष्ट सर्जनशीलता दाखवली. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेचा नावलौकिक उंचावला असून पालक व शिक्षक वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### गुड फ्रायडे साजरा

**रेवदंडा :** कोर्लई माउंट कार्मेल चर्च येथे गुड फ्रायडे दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मोठया संख्येने ख्रिश्चन बांधव व भगिनी माउंट कार्मेल चर्च येथे उपस्थित होते. यावेळी फादरांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रार्थना, उपसास आणि येशूच्या वधस्तंभाच्या यातनांचे स्मरण केले जाते. कोर्लई येथे मोठया उत्साहात गुड फ्रायडे साजरा केला जातो. कोर्लईत ख्रिश्चन पाडयात सण म्हणून साजरा करण्यात येतो.

# 'डिजिटल शेती शाळेत सहभागी व्हा'

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपारिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजोवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' सुरू केले आहे. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील सर्व प्रकारच्या पिक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांच्यामार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे. या शेती शाळांचे लाइव्ह प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पानी फाऊंडेशन आणि उमेद च्या चॅनेन्नवर केलं जाणार आहे. या डिजीटल शेतीशाळेला जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

## महिलांनी प्रशासनाला विचारला जाब | कायदा-सुव्यवस्था कोलमडल्याचे चित्र

# श्रीवर्धनमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील गुरवआळी, पोतदारचाळ, धोंडगल्ली आणि साळीवाडा आदी परिसरात सध्या कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र दिसत असून चोरट्यांनी अक्षरशः मोकाट संचार सुरू केला आहे. नागरिकांच्या घरांवर डल्ला मारणे, मध्यरात्री संशयास्पद हालचाली करणे आणि उघडपणे दहशत निर्माण करणे या सर्व घटनांमुळेसंपूर्णशहरभीतीच्याछायेत जगत आहे. त्यात अधिक संतापजनक बाब म्हणजे, या सर्व प्रकारांवर पोलीस प्रशासनाकडून अपेक्षित ती ठोस आणि प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप उसळला आहे. चोर मोकाट, पोलीस निष्क्रिय अशी भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे.



या गंभीर परिस्थितीच्या निषेधार्थ परिसरातील महिला मंडळाने (दि.२) एप्रिल रोजी श्रीवर्धन पोलीस ठाण्यावर धडक देत आक्रमक पवित्रा घेतला. महिलांनी केवळ निवेदन देऊन थांबण्याऐवजी प्रशासनाला थेट जबाबदार धरत कठोर शब्दांत जाब विचारला.

महिला मंडळाच्या निवेदनानुसार, अवघ्या १५ दिवसांत तालुक्यात तीन ठिकाणी घरफोड्या होऊन चोरट्यांनी दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. मात्र, या गंभीर गुन्ह्यांचा अद्यापही उलगडा न होणे ही पोलीस यंत्रणेची मोठी अपयशाची कबुली असल्याचे नागरिकांचे स्पष्ट मत आहे.

दरम्यान, परिस्थिती दिवसेंदिवस अधिक धोकादायक होत चालली आहे. मध्यरात्री १ ते २ वाजण्याच्या सुमारास लोखंडी सळी हातात घेऊन फिरणारा संशयित इसम नागरिकांनी पाहिला. त्यानंतर १ एप्रिल रोजी पुन्हा २ ते ४ मुखवटेधारी इसम शस्त्रांसह परिसरात फिरताना दिसले. हे प्रकार केवळ संशयास्पद नसून उघडपणे गुन्हेगारीचा इशारा देणारे आहेत.

याहूनही भयानक म्हणजे, रात्री उशिरा घरांच्या दरवाजांवर जोरजोरात ठोके मारून नागरिकांना घाबरवण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक अक्षरशः भीतीच्या सावटाखाली जगत असून आम्ही स्वतःच्या घरातही सुरक्षित नाही, अशी हतबल भावना व्यक्त करत आहेत.

गेली कित्येक वर्षे शहरात पोलीस रात्री गस्त घालत असून, ठराविक ठिकाणी गस्त घालणाऱ्या कर्मचाऱ्यांची आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची तारीख व वेळेसह नोंद ठेवली जाते. त्यामुळे ज्या-ज्या वेळी अशा घरफोड्या आणि संशयास्पद घटना घडल्या, त्या त्या वेळी नेमके कोणते पोलीस अधिकारी आणि कर्मचारी गस्तीवर होते, याची सखोल चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करत तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी नागरिकांनी केली आहे.

महिलांनी थेट आरोप केला की, आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यानेच चोरट्यांचे मनोबल वाढले आहे. ही परिस्थिती प्रशासनाच्या ढिसाळ आणि निष्क्रिय कारभाराचे जिवंत उदाहरण आहे. यावेळी संतोष वेश्वीकर यांनीही संताप व्यक्त करत पोलिसांना थेट इशारा दिला. जर तात्काळ कठोर कारवाई झाली नाही, तर जनतेचा संताप रस्त्यावर उसळेल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी पोलीस प्रशासनावर असेल असा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनात ५० ते ६० महिलांची ठाम उपस्थिती पाहायला मिळाली. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे हा प्रश्न आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. श्रीवर्धनमध्ये गुन्हेगार मोकाट फिरत असताना पोलीस प्रशासन झोपेत आहे का? की गस्तीच्या नोंदी फक्त कागदोपत्रीच राहिल्या आहेत? आता तरी प्रशासन जागं होणार की एखाद्या मोठ्या अनर्थाची वाट पाहणार? अशा प्रश्नांचा भडीमार श्रीवर्धनकरांनी केला आहे.

## बंगालचा महाराष्ट्राला धडा

बंगालमध्ये येत्या २३ आणि २९ एप्रिलला विधानसभेसाठी मतदान होणार आहे. पण अजूनही तिथे मतदारयाद्यांचा घोळ संपलेला नाही. उलट सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर तो वाढलाच आहे. यानंतर महाराष्ट्रातही बंगालप्रमाणे मतदारयाद्यांची सखोल तपासणी व्हायची आहे. त्यामुळे बंगालमध्ये जे काही चालू आहे त्याकडे लक्ष ठेवणे व त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे. परवा बुधवारी रात्री मालडा जिल्ह्यात मतदारयाद्यांच्या गोंधळाचा फैसला करण्यासाठी नेमलेल्या तीन न्यायालयीन अधिकाऱ्यांना चिडलेल्या नागरिकांना घेराव घातला. या प्रकरणाने प्रचंड गदारोळ झाला असून ममता बॅनर्जी सरकारवर सर्व दोष टाकण्याचे प्रयत्न चालू आहेत. काल लगोलग सर्वोच्च न्यायालयात हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. न्यायमूर्ती संतप्त झाले. त्यांनी या प्रकाराची सीबीआय किंवा एनआयएमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले. हे करताना त्यांनी तोंडी आदेशामध्ये, राज्यातील कायदा व सुव्यवस्था संपलेली आहे असे शब्द वापरले. भाजपवाल्यांना प्रचारात वापरायला हे सोयिस्कर शब्द आहेत. अर्थात नंतर लेखी आदेशात हे शब्द वगळण्यात आले. पण व्हायचा तो दुरुपयोग होईलच. मुद्दा असा की, या सगळ्या गोंधळाला केंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि खुद्द सर्वोच्च न्यायालयाचे काही निर्णय जबाबदार आहेत. यावर पडदा टाकून ममता बॅनर्जी यांना बदनाम करण्यासाठीच जणू मोहिम राबवली जात आहे. दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयासारख्या आदरणीय संस्थांच्या निर्णयांचा व तेथे बोलल्या जाणाऱ्या शब्दांचा या मोहिमेत वापर करून घेतला जाणार आहे. बंगालमध्ये सुमारे २५ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. त्यातही काही भागांमध्ये मुस्लिमांची बहुसंख्या आहे. महाराष्ट्रातही असे अनेक मतदारसंघ आहेत. बंगालमध्ये तपासणीमध्ये लाखो लोकांना मतदारयादीतून बाहेर काढण्यात आले. त्यात बहुसंख्य मुस्लिम आहेत. हे पारंपरिक तृणमूल काँग्रेस, काँग्रेस किंवा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मतदार आहेत. त्यामुळे भाजपच्या फायद्यासाठी नेम धरून यांना वगळण्यात आल्याचा आरोप होतो आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. त्याने या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती इत्यादींच्या समित्या करून त्यांच्यामार्फत या वगळल्या गेलेल्या मतदारांच्या सुनावण्या करण्याचे आदेश दिले.

### टोलवाटोलवी

खरी मेख इथेच आहे. निवडणुकीचे मतदान जेमतेम वीस दिवसांवर आलेले असताना अजूनही या वगळल्या गेलेल्या मतदारांच्या सुनावण्या सुरूच झालेल्या नाहीत. ज्या मालडा जिल्ह्यात काल गोंधळ झाला तिथे सुमारे आठ लाख मतदारांची नावे वगळली गेली आहेत. न्यायालयीन आयोग येईल व आपली सुनावणी करील अशी वाट ते अनेक दिवसांपासून पाहत होते. पण त्यात विलंब होत होता. मालडामध्ये किमान हा चौकशी आयोग पोचला. इतर ठिकाणी तर या आयोगाचे काम सुरूच झालेले नाही. ते कधी होणार याबाबत कोणालाही पत्ता नाही. निवडणूक आयोगाकडे विचारणा केली असता तो हात वर करतो. हे न्यायालयाचे काम आहे असे सांगतो. राज्य सरकारचा तर संबंधच नाही. अशा स्थितीत ज्यांची नावे नाहीत त्यांनी जावे कोठे असा प्रश्न आहे. बंगालमध्ये मतदारयादीत नावे असणे वा नसणे हा अतिशय संवेदनशील विषय झाला आहे. कारण, राज्यात बेकायदा बांगलादेशी मोठ्या प्रमाणात घुसलेले आहेत असा भाजपचा प्रचार चालू आहे. कालच अमित शाह बंगालात होते. आता ते १५ दिवस बंगालमध्ये मुक्काम ठोकणार आहेत. बंगाल म्हणजे घुसखोरांचे मोठे आश्रयस्थान हाच त्यांच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा आहे. या प्रचारामुळे राज्यातील वातावरण गढूळ झाले आहे. हरेक मुस्लिमाबाबत संशय निर्माण झाला आहे. यामुळे भल्याभल्या व एरवी डोके ठिकाणावर असलेल्या हिंदूंनाही चारही बाजूला घुसखोर वाढले असल्याचे वाढू लागले आहे. भाजपला हेच हवे आहे. घुसखोर मुस्लिमांनी बंगाल ताब्यात घेतला आहे व हिंदूंवर अन्याय होतो आहे अशी हवा करायची व त्या आधारे निवडणूक जिंकायची हाच भाजपचा इरादा आहे. याच वातावरणात निवडणूक आयोगाने मतदारयादी तपासणी मोहिम हाती घेतली व त्यात लाखो मतदारांची नावे बाहेर काढली. आता आपण जन्मापासून इथेच राहतो आणि नागरिक आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी या लोकांची आहे. जे वेळेत हे करू शकणार नाहीत व मतदारयादीतून वगळलेलेच राहतील त्यांना उद्या भारतातूनही घालवून द्यायला कमी केले जाणार नाही.

### आयोगाचा पक्षपातीपणा

बांगलादेशींची घुसखोरी हा प्रश्न खरा आहे. पण त्याला हाताळण्याचा हा मार्ग नाही. बांगलादेशींची पडताळणी करणे व चौकशी, पुरावे सादर करणे इत्यादींना पुरेसा वेळ देणे हे गरजेचे आहे. शिवाय हे निवडणूक आयोगाचे काम नाही. आसाममध्ये ते अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या मार्गाने चालू आहे. तरीही ते काम आटोक्यात येत नाही. कोण मूळचे, कोण बाहेरून आलेले हा घोळ सहजी संपत नाही. यामुळेच आसाममध्ये सखोल मतदारयादी तपासणी नाही. वास्तविक बंगालबरोबर तिथेही निवडणुका होत आहेत. पण तिथे मात्र भाजपला सोईस्कर नसल्याने ही तपासणी टाळण्यात आलेली आहे. बंगालमध्ये तमाम विरोध आणि गोंधळ असतानाही ती रेटून नेण्यात आली. तुम्ही नागरिक आहात व इथलेच आहात हे सिध्द करण्यासाठी तुमच्या आईवडिलांच्या जन्मतारखा, त्यांची प्रमाणपत्रे मागण्यात आली. ती मिळवणे सोपे नाही. यातून झाले असे की, भल्याभल्या माणसांना मतदारयादीतून काढण्यात आले. अगदी कालपरवा, उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती असलेल्यांचे नाव मतदारयादीतून वगळल्याचे उघड झाले. त्यांनी याबाबत जाहीर तक्रार केली. देशासाठी सैनिक म्हणून लढलेले, सरकारी सेवा केलेले, मोठ्या पदांवर काम केलेले अशा अनेकांना यापूर्वी असा फटका बसला आहे. यातले बहुतांश लोक मुस्लिम आहेत. निवडणुकीच्या तोंडावर घाईघाईने मतदारयाद्यांच्या तपासणीचा घाट घातला गेला त्याला सर्वोच्च न्यायालयानेच रोखायला हवे होते. पण त्याने तसे केले नाही. निवडणूक आयोग पक्षपाती आहे हे वेळोवेळी दिसले आहेच. इथे तर ममता सरकारशी त्याचे वैर असल्यासारखे त्याचे वर्तन होते. हा वाद सर्वोच्च न्यायालयात गेल्यावर ममता बॅनर्जी यांनी स्वतः वकिलीची कोट चढवून युक्तिवाद केला. अखेर न्यायालयाने मतदारयाद्यांमधील घोळ निस्तरण्यासाठी न्यायालयीन अधिकाऱ्यांचे आयोग स्थापण्याचे जाहीर केले. पण त्याच वेळी निवडणुकीच्या तारखाही जाहीर झाल्या. ज्या मतदारांचे साक्षीपुरावे गेल्या सहा महिन्यात तपासले जाऊ शकलेले नाहीत त्यांच्याबाबतचा फैसला न्यायालयीन आयोग काही दिवसात कसा करणार हे कोडे होते. हे आयोग कुठे बसणार, काय काम करणार हेही स्पष्ट नव्हते व अजूनही नाही. त्यातच निवडणुकांची घोषणा झाल्यापासून निवडणूक आयोगाने दणादण वरिष्ठ पोलिस व प्रशासकीय अधिकारी बदलले आहेत. त्यामुळे राज्यातले प्रशासन आपल्या अखत्यारीत नाही अशी भूमिका ममतांनी घेतली आहे. ती समजण्यासारखी आहे. असे घोळ घालायचे आणि त्याचा सर्व दोष ममता सरकारवर टाकायचा हाच भाजपचा अजेंडा आहे. दुर्दैवाने निवडणूक आयोग व न्यायालयासारख्या यंत्रणाही त्यात वापरून घेतल्या जात आहेत.

विचार

# कोकणचा विकास साधणार कधी?

**सामान्यजनांच्या हिताच्या योजनांना विलंब होतो आणि बरेचदा अगदीच क्षुल्लक कारणांसाठी अनेक महत्वाचे प्रकल्प अडकून पडतात. अलिकडे या वास्तवाची जाणीव होण्यामागील कारण होते, कोकणच्या विकासाचे मागे पडलेले अनेक मुद्दे आणि त्याकडे गांभिर्याने बघितले न जाणे. या पार्श्वभूमीवर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बऱ्याच दिवसांनी कोकणच्या विकासावर आणि समस्यांवर चांगली चर्चा झाली. त्याचा हा वेध.**



डॉ. सुकृत खांडेकर

देशातल्या नानाविध प्रश्नांवर उत्तर शोधण्यासाठी आणि त्यांच्या निराकरणार्थ लक्षवेधी योजना आखण्यासाठी सत्ताधारी सातत्याने प्रयत्नशील असतात. मात्र, तरीही अनेक प्रश्न तडीस जात नाहीत. योजनांना विलंब होतो आणि बरेचदा अगदीच क्षुल्लक कारणांसाठी अनेक महत्वाचे प्रकल्प अडकून पडतात. असे होऊ नये म्हणून सत्ताधारी आणि विरोधकांनी दक्ष असणे आवश्यक असते. अलिकडे या वास्तवाची जाणीव होण्यामागील कारण होते, कोकणच्या विकासाचे मागे पडलेले अनेक मुद्दे आणि त्याकडे गांभिर्याने बघितले न जाणे. या पार्श्वभूमीवर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बऱ्याच दिवसांनी कोकणच्या विकासावर आणि समस्यांवर चांगली चर्चा झाली. कोकणातून निवडून आलेल्या सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी तळमळीने कोकणचे प्रश्न मांडून सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला.

यावेळी पक्षीय राजकारण आणि गटबाजीपलिकडे जाऊन कोकणवासियांच्याच्या हितासाठी आमदारांनी आपल्या मागण्या आणि सूचना तडफेने मांडल्या. कोकण रेल्वे, पर्यटन, आंबा, फणस, काजू, भातशेती, रोजगार-उद्योग अशा विविध प्रश्नांवर कोकणातील वास्तव या चर्चेत मांडले गेले. कोकण रेल्वेने रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग हे तिनही जिल्हे मुंबईच्या जवळ आले. पण कोकणवासीय आणि मुंबईतील चाकरमान्यांपेक्षा परराज्यातील लांब पल्ल्याच्या गाड्यांना कोकण रेल्वे झुकते माप देते. कोकणातील रेल्वे स्थानकांवर गाड्या थांबल्याच नाहीत तर कोकणात पर्यटक येतील तरी कसे, हा सावंतवाडीचे आमदार आणि माजी मंत्री दीपक केसरकर यांनी विचारलेला प्रश्न भेदक होता. सरकारमध्ये मुंबईसह कोकणचे नऊ-दहा मंत्री आहेत, तरी कोकणच्या विकासाला गती का येऊ नये? गुहागरचे आमदार आणि माजी मंत्री भास्कर जाधव यांनी विचारलेला प्रश्न सरकारवर प्रहार करणारा होता. कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण कधी करणार, हा मुंबईतील दिंडोशीचे आमदार आणि माजी महापौर सुनील प्रभू यांनी विचारलेला प्रश्न सरकारला आव्हान देणारा ठरला.

भास्कर जाधवांच्या भाषेत सांगायचे तर कोकण ही डॉलर भूमी आहे. जगभरात, विशेषतः आखाती देशांमध्ये निर्यात होणारा हापूस आंबा परकीय चलन म्हणजेच डॉलर मिळवून देतो. कोकणात विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने आकर्षित झाले तर त्यातूनही देशाला डॉलर्स मिळणार आहेत. मासे निर्यातीतूनही डॉलर्सची प्राप्ती आहे. मुख्यमंत्री असताना अ. र. अंतुले यांनी कोकणसाठी सोळा कलमी कार्यक्रम जाहीर केला होता. त्याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे. स्वामीनाथन समितीपासून भाई सावंत ते कद्रेकर- पेंडसे अशा अर्धा डझन समित्यांचे अहवाल विधिमंडळाच्या ग्रंथालयात पडून आहेत. सरकारने तत्वतः मान्यता दिली तरी पुढे काही घडले नाही. आता काळानुसार विकासाच्या संकल्पना आणि अपेक्षा बदलल्या आहेत याची जाणीव ठेऊन देवाभाऊंच्या सरकारने कोकणात विकासाच्या योजना राबवाव्यात, अशी अपेक्षा या प्रसंगी व्यक्त करण्यात आली. कोकण विकास महामंडळाची चार दशकापूर्वी आग्रही मागणी असायची. आता सरकार आणि लोकप्रतिनिधींना या मागणीचा विसर पडलेला दिसतोय. रत्नागिरी सिंधुदूर्ग विकासाच्या तीन हजार कोटी रुपयांच्या आराखड्याला केंद्रानेही मान्यता दिली होती. पण आजवर एक रूपयासुध्दा मिळालेला नाही, याची आठवण भास्कर जाधव यांनी करून दिली. रत्नागिरी विमानतळ कधी साकार होणार, अशीही विचारणा चर्चेप्रसंगी झाली.

सावंतवाडी रेल्वे टर्मिनस परिपूर्ण कधी होणार, असा आग्रही सवाल दीपक केसरकर यांनी केला. प्रवाशांसाठी सुविधा नाहीत, कोकण रेल्वेकडे निधी नाही. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी रेल्वे मंत्रालयासोबत बैठक घेऊन कोकण रेल्वेचे प्रश्न मार्गी लावले पाहिजेत. भूमिपूजनला बारा वर्षे झाली, पण सावंतवाडी रेल्वे टर्मिनस पूर्ण होत नाही, या दिरंगाईबद्दल कोणालाच काही वाटत नाही का? माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या काळात रेल्वे स्थानकांचे सुशोभिकरण झाले, पण स्थानकांवर प्रवाशांना आवश्यक असणाऱ्या सुविधा अपूर्ण आहेत. कोकणातील तीनही जिल्ह्यात सर्व रेल्वे गाड्यांना किमान दोन थांबे दिले पाहिजेत, अशी आग्रही मागणी केसरकरांनी केली. कोकणवासियांनी मोठा संघर्ष करून मिळवलेल्या दादर-सावंतवाडी पॅसेंजर गाडीने दादरचा स्लॉट गमावला आहे. मुंबई-कोकणातील हजारो प्रवाशांच्या नाकावर टिच्चून दादर-गोरखपूर विशेष गाडी आता कायमस्वरूपी करण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनीच भाजपाचे खासदार रवी किशन यांना पत्र पाठवून या गाडीमुळे उत्तर भारतीयांची मोठी सोय होईल, असे कळवले आहे. मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी हा मोठा धक्का आहे. कोरोनाकाळात दादर-रत्नागिरी पॅसेंजर 'झिरो टाइमटेबल' नावाखाली दिवा स्थानकापर्यंत मर्यादीत करण्यात आली. कोरोना संपल्यावर मुंबईतील लोकलसाठी ही गाडी दादरवरून सोडायला नकार देण्यात आला. मग उत्तर भारतीयांसाठी मुंबई-गोरखपूर एक्सप्रेस दादरवरून सोडणे रेल्वेला कसे शक्य झाले?

कोकण रेल्वेच्या गाड्यांना मुंबईत पार्किंग मिळत नाही, म्हणून कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलिनीकरण करा, असे सुनील प्रभू सांगत आहेत. कोकण रेल्वेमध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक म्हणजे २१ टक्के वाटा आहे. कर्नाटकचा वाटा १५ टक्के तर केरळचा सहा टक्के आहे. पण मंबईतील कोकणवासियांना कोकणात जाण्यासाठी आरक्षण मिळवताना मारामार होते, याकडेही सुनील प्रभुंनी लक्ष वेधले. कोकणवासियांसाठी १९९८ मध्ये कोकणकन्या ही गाडी कुर्ला येथून सुरू झाली. ही गाडी मुंबई किंवा दादर येथून सुरू करावी, या मागणीचे समर्थन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केले होते. तेव्हा रामविलास पासवान रेल्वेमंत्री होते. शिवसैनिकांनी मुंबईतून निघणारी हावडा एक्सप्रेस बंद पाडली, त्यानंतर दुसऱ्या दिवशी कोकणकन्या दादर येथून सुटू लागली, याची आठवण सुनील प्रभू यांनी करून दिली. मुंबई हा कोकणचाच भाग आहे. कोकणात मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग हे सहा जिल्हे आहेत. पण मुंबई, ठाणे, रायगडचा भाग आता मुंबई विकास प्राधिकरण विभागात असल्याने या चार जिल्ह्यांचे प्रश्न आणि विकास प्रकल्प हे तळ कोकणापेक्षा वेगळे आहेत. म्हणूनच रत्नागिरी आणि सिंधुदूर्गच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बॅरिस्टर अ. र. अंतुले मुख्यमंत्री असताना कोकणच्या विकासाला गती देणारे अनेक निर्णय झाले. अंतुले हे कोकणातल्या आंबेतचे होते. त्यांना कोकणाविषयी विशेष प्रेम होते. वेगवान निर्णय आणि वेगवान अंमलबजावणी हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य होते. मुख्यमंत्रीपदी असताना विलासराव देशमुख यांनीही कोकणचे प्रश्न सोडवण्यासाठी विशेष आत्मियता दाखवली होती. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कोकणवासियांना न्याय देण्यासाठी तत्परतेने पावले उचलावीत अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, उद्योग आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत, माहिती-तंत्रज्ञान आणि सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, रोजगार हमी आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, गृह, महसूल आणि ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, कौशल्य रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा हे सारे मुंबई कोकणातले मंत्री आहे. कोकणाच्या विकासाला गती देण्याची या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे या सर्व मंडळींनी एकत्र येऊन योजना आखणे, आखलेल्या योजनांना गती देणे, अडचणी सोडवत कोकणातील प्रलंबित प्रकल्प तडीस नेणे आदी कामांकडे साकल्याने लक्ष द्यायला हवे.

चर्चा आजची

# साहेब, हे वागणं बरं नव्हं!

राकेश लोहार

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेला रायगड किल्ला हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नाही, तर अखंड हिंदुस्थानासाठी प्रेरणास्थान आणि मराठी अस्मितेचे तेजस्वी प्रतीक आहे. इथे प्रत्येक दगडात इतिहास जिवंत आहे, प्रत्येक पायरीवर स्वाभिमान आणि संस्कार कोरलेले आहेत. अशा ठिकाणी जर कोणी बेजबाबदारपणे वागणार असेल, तर तो केवळ नियमभंग नाही; तो थेट महाराष्ट्राच्या स्वाभिमानावर घाव आहे.

नवनिर्वाचित जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या रायगड किल्ल्यावरील दौऱ्यादरम्यान कार्यकर्त्यांनी रायगडावर जो उघड-उघड धुडगूस घातला, तो प्रकार संतापजनकच नाही तर, लाजिरवाणा आहे. अशा पवित्र स्थळी नियमांची पायमल्ली करताना लाज कशी वाटली नाही? हात कसे सरसावले? कोणत्या अधिकाराने हे सगळं केलं? हा प्रश्न आता प्रत्येक शिवभक्त छाती ठोकून विचारतो आहे.आणि त्याहून मोठा प्रश्न पडतो; तो म्हणजे हे सगळं होत असताना नेतृत्व कुठे होतं? कार्यकर्ते बेफाम होतात, तेव्हा त्यांना लगाम घालणं हे, नेत्याचं कर्तव्य असतं. अध्यक्ष वाकडीकर साहेबांच्या समोर जर हा प्रकार होत होता, तर त्यांनी वेळीच आपल्या कार्यकर्त्यांना रोखणे गरजेचे होते. पण, नेमकं तिथेच ते अपयशी ठरले, याचे अतीव दुःख आहे. आपल्या नेत्याला पद मिळालं म्हणजे आपल्याला सर्वकाही करण्यास मोकळीक मिळाली, असा गैरसमज कार्यकर्त्यांना जर झाला असेल, तर तो धोकादायक आहे.

समाधीस्थळाजवळ शांतता राखण्यासाठी लावलेले फलक काढून टाकणे म्हणजे थेट त्या पवित्र स्थळाचा अपमान आहे. हे वर्तन म्हणजे 'आम्हाला नियम लागू नाहीत' असे तर नाही ना! मग सामान्य माणसाने काय शिकायचं? कायदा आणि नियम हे फक्त जनतेसाठीच आहेत का? अशा घटनांना वेळीच आवर घालणे गरजेचे आहे. नाही तर कोणीही उठेल,



आणि नियम मोडेल! ज्या कार्यकर्त्यांनी पाप केलेय, त्यांना शिक्षा होणे गरजेचेच आहे. अन्यथा, अशा बेजबाबदार वर्तनाला मूक संमती दिल्यासारखं होईल.

एकीकडे असे प्रकार उघडपणे घडत असताना, दुसरीकडे याच पवित्र भूमीत विकासाच्या नावाखाली अवैध माती उत्खनन सुरू आहे. टोलेजंग इमारती उभ्या राहात आहेत. हा प्रकार काही एका दिवसात घडलेला नाही. याला कोणाचा तरी पाठिंबा असतोच. मग हे सगळं कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? त्याच्या मुळापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. इथे सगळे अवैध काम सुरू असताना, प्रशासन गप्प का? डोळेझाक का? आणि या सगळ्याला आवर घालणार तरी कोण? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. पण, कारवाईचे काय? आणि कधी, कोणावर होणार, की माफिया मोकाटच राहणार?

डोंगराच्या डोंगर पोखरले जात असताना, निसर्गाची अक्षरशः हत्या होत असताना, प्रशासनाला काहीच दिसत नाही, ही बाब अधिकच संतापजनक आहे. हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर आपल्या ऐतिहासिक वारशाच्या अस्तित्वावरच घाला आहे. जर आज आपण गप्प बसलो, तर उद्या रायगड फक्त फोटोमध्ये उरेल, अशी भीती व्यक्त करावी लागते. हे चित्र अत्यंत भयावह आहे.

प्रशासनाची निष्क्रियता हीसुद्धा तितकीच जबाबदार आहे. नियम मोडणारे दोषी आहेतच, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारेही तितकेच दोषी आहेत. कायद्याची भीती उरली नाही, हीच या सगळ्या प्रकाराची मूळ कारणं आहेत. त्यामुळे आता फक्त कारवाई नाही, तर कठोर आणि उदाहरण घालून देणारी कारवाई होणे गरजेचे आहे.

या संपूर्ण प्रकाराने तमाम शिवभक्तांच्या भावना चिरडल्या गेल्या आहेत. सत्ता, पैसा, पद आणि खुर्ची मिळाली की माज चढतोच, ही भावना आता लोकांच्या मनात ठामपणे बसू लागली आहे. पण, हा माज जर महाराजांच्या पवित्र भूमीतच दिसू लागला, तर तो सहन केला जाणार नाही, हेही तितकंच स्पष्ट आहे. पोलिसांच्या उपस्थितीत नियमांची पायमल्ली होत असेल, तर हा केवळ नियमभंग नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवरचा प्रश्न आहे. कायदा सर्वांसाठी समान असतो, हे फक्त पुस्तकात राहिलंय का? हा प्रश्न आता थेट व्यवस्थेला विचारला जात आहे.

रायगडकर आणि शिवभक्त आता शांत बसणारे नाहीत. त्यामुळे ज्या कार्यकर्त्यांनी नियमभंग केला, त्यांच्यावर कारवाईही ठोस हवी. केवळ दिखाऊ कारवाई नव्हे, तर प्रत्यक्षात बदल दिसायला हवा. शेवटी एकच सांगावेसे वाटते, ते म्हणजे सत्ता आज आहे, उद्या नाही. पण रायगड, इतिहास आणि महाराज कायम आहेत. आणि त्या इतिहासासमोर प्रत्येकाला उत्तर द्यावंच लागणार. त्यामुळे पुन्हा एकदा ठामपणे सांगावेसे वाटतेय; साहेब, हे वागणं अजिबात खपवून घेतलं जाणार नाही!

लोकसंसद

### लाडक्या बहिणी ७१ लाख अपात्र

गेले सुमारे २० महिने लाडकी बहीण योजना सुरु आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात रुपये १५०० दरमहा जमा होत आहेत. या योजनेमुळे महायुतीचे सरकार सत्तेवर येऊ शकले होते. या योजनेच्या ज्या अटी होत्या त्यामध्ये कुटुंबातील कोणीही सरकारी नोकरीत नसणे, तसेच कुटुंबात चार चाकी वाहन नसणे ह्या होत्या. तथापि अनेक लाडक्या बहिणींनी हे सारे असतानाही अर्ज केले व गेले अनेक महिने पैसेही घेतले. या योजनेत अनेक अपात्र महिलांनी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खात्री करण्यासाठी इ केवायसी बंधनकारक केली होती. सरकारने केलेल्या पडताळणीत सरकारचे दरमहा १०६५ कोटी रुपये वाचणार आहेत. एप्रिल २०२६ पासून या अपात्र महिलांना दरमहा मिळणारे १५०० रुपये बंद केले जाणार आहेत ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. या अगोदर सुद्धा अनेक पुरुष कर्मचाऱ्यांनी तसेच नोकरी करणाऱ्या महिलांनी अर्ज करून दरमहा १५०० रुपये मिळविले होते सरकारने याची पडताळणी केल्यानांतर ही गोस्ट लक्षात आली होती वास्तविक ही योजना सुरु करताना सर्व अटी चेक करावयास हव्या होत्या. त्या व्यवस्थित चेक झाल्या नाहीत. अपात्र महिलांना गेल्या सुमारे २० महिने मानधन दिले गेले हे प्रश्न आता विरोधकांकडून विचारले जाण्याची शक्यता आहे दरम्यान इ केवायसी करताना महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. त्यांना एक संधी म्हणून ३० एप्रिल पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# प्रासादिक भाषाशैलीचे लेखक आनंद साधले

आत्माराम नीलकंठ ऊर्फ आनंद साधले यांचा जन्म ५ जुलै १९२० रोजी झाला. त्यांनी आपल्या जवळपास पंच्याहत्तर वर्षांच्या आयुष्यात साठ पुस्तकं लिहिली. 'आनंदध्वजाच्या कथा'मधून त्यांनी धीट भाषेत, पण प्रांजळपणे, शृंगाररसपूर्ण लिखाण केलं. महाभारताचा एका वेगळ्या पद्धतीनं परामर्श घेणारं 'हा जय नावाचा इतिहास आहे' हे त्यांचं पुस्तक गाजलं. 'आपल्या रोखठोक शैलीत त्यांनी महाभारतातल्या प्रमुख घटनांचं विश्लेषण केलं आहे.' मराठी आणि संस्कृत या दोन्ही विषयांमध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी प्राप्त केली. पोस्टखात्यात ३५ वर्षांची प्रदीर्घ सेवा करून त्यांनी मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. लेखनाकडे वेळ देता यावा म्हणून नोकरीत कायम रात्रपाळी घेतली होती. नंदिनी साधले हे त्यांच्या प्रथम पत्नीचे नाव. आयुष्याच्या उत्तरार्धात प्रथम पत्नीशी घटस्फोट घेऊन त्यांनी हैदराबाद येथील संस्कृत प्राध्यापक नलिनी पराडकर यांच्याशी विवाह केला.

'लढाई संपल्यावर' ही त्यांची पहिली कादंबरी. त्यांच्या ग्रंथसंपदेमध्ये सुमारे ६० पुस्तकांचा समावेश आहे. संस्कृतमधील कथा साहित्याचा अभ्यासपूर्ण ललित शैलीत परिचय करून देणारे लेखक म्हणून साधले यांना ओळखले जाते. साधले यांनी मुख्यत्वे संशोधनपर निबंध, ललित साहित्य, कथा साहित्य, अनुवाद आणि भाषांतर असे अनेक प्रकारात लेखन केले. त्यांच्या संशोधनात्मक लेखनात महाभारत आणि रामायण यांवरील साहित्य उद्बोधक आहे. महाभारत या ग्रंथाला अनुसरून अनेक लेखकांनी लेखन केले; पण साधले यांच्या 'हा जय नावाचा इतिहास आहे' या कादंबरीत त्यांनी युधिष्ठिराला खलनायक बनवल्यामुळे मोठी खळबळ माजली व त्यांना टीकेचे धनी व्हावे लागले. त्याकाळी कादंबरी बरेचदा मासिकातून क्रमशः प्रसिद्ध केली जात असे, पण त्यांच्या या कादंबरीला प्रकाशक मिळेना. या कादंबरीचे क्रमशः प्रकाशन करणे मराठीतील अनेक मासिकांनी नाकारले. अखेर 'दीपावली'ने त्यांच्या मासिक अंकांत ती प्रसिद्ध करायला सुरुवात केली. अभ्यासकांनी तिच्यावर टीकेची झोड उठवली, पण सामान्य वाचकांच्या पसंतीस उतरली व अक्षरशः या कादंबरीला डोक्यावर घेतले. त्यानंतर विरोधक हळूहळू थंड पडले.

त्यांचं 'मातीची चूल' हे आत्मचरित्रही स्पष्ट आणि रोखठोक विवेचनामुळे चर्चिलं गेलं. लहान मुलांसाठी त्यांनी 'इसापनीती' आणि 'हितोपदेश'सारखी पुस्तकं लिहिली. 'नरेंद्र : रुक्मिणी स्वयंवर' हे नाटकही त्यांच्या नावावर आहे. 'शाकुंतल', 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय', 'मालती माधव', 'वेणीसंहार', 'मृच्छकटिक', 'मुद्राराक्षस' अशा प्रसिद्ध संस्कृत नाटकांचा अनुवाद साधले यांनी कादंबरीरूपात केला. 'शकुंतला', 'मालविका', 'ऊर्वशी', 'मालती', 'द्रौपदी', 'वसंतसेना', 'चाणक्य' अशी नावे त्यांनी कादंबऱ्यांना दिली.

'कुट्टनीमतम', 'अमरुशतक', 'गीतगोविंद' या काव्याचा त्यांनी गद्यात अनुवाद केला. याशिवाय त्यांनी अनेक संस्कृत विषयांवर लेख लिहिले आणि त्यांचे संग्रह प्रसिद्ध झाले. अनुवादित आणि आधारित असे हे जे साहित्य साधले यांनी निर्माण केले, त्यात त्यांची भावमधुर कविवृत्ती, सौंदर्यग्रही प्रकृती आणि आपली संपूर्ण श्रीकळा घेऊन अवतरलेली भाषाशैली मोहवून टाकते.

त्यांची भाषा संस्कृतप्रचुर असली तरी प्रासादिक आहे. कोमल वर्णयुक्त असल्याने श्रुतिमधुर आहे. संस्कृतातील आशय स्पष्ट करण्याइतकी भावगर्भ आहे, रसार्द्र आहे. वाचकांवर ते संस्कृत, रसगंधी साहित्यफुलांचा नुसता सडा घालतात. संस्कृत साहित्याची ही सौंदर्यदालने मराठी वाचकांना उघडून दाखवण्याचे मोलाचे काम साधले यांनी केले आहे. अशा या थोर साहित्यिकाचे ४ एप्रिल १९९६ रोजी निधन झाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ एप्रिल
१)श्री.श्रीरंग जगन्नाथ ढोरे कल्याण ठाणे दि.४-४-१९४९
२)श्री.मुकूंद शिवराम गुंजाळ रेवस रोड, अलिबाग दि.४-४-१९४८
३)श्रीम.शैलजा विठोबा मुकादम अलिबाग, कोळीवाडा, दि.४-४-१९५६
४)श्री.संजय गोवर्धन बुटाला विद्यानगर, अलिबाग दि.४-४-१९६०

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**सुनंदा दत्तात्रय कुलकर्णी, अलिबाग**

# सायबर टोळीचा पर्दाफाश

## • भरघोस परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
शेअर मार्केट आणि आयपीओमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली सव्वा दोन कोटींची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा नवी मुंबई सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून धक्कादायक माहिती समोर आली आहे.



अटक करण्यात आलेल्यांपैकी दोन आरोपींनी यापूर्वी बँकॉक आणि म्यानमारमधील कुप्रसिद्ध सायबर फसवणूक कॉल सेंटर्समध्ये काम केले आहे. एका प्लेसमेंट आणि इंटर्नशिप देणाऱ्या कंपनीच्या मालकाला शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवण्यात आले होते. सायबर भामट्यांनी वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांच्याकडून दोन कोटी नऊ लाख ३० हजार ५३७ रुपये उकळण्यात आले. परतावा न मिळाल्याने फर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. तपासादरम्यान पोलिसांना सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एका संशयास्पद खात्याची माहिती मिळाली, जे आर्शिल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या नावाने नवी मुंबईत होते. तांत्रिक विश्लेषणाद्वारे पोलिसांनी तुर्भे परिसरातून सुशील भगवान जुवाटकर याला ताब्यात घेतले. त्याने हे खाते आपले साथीदार पंकज कपूर आणि निश्चल बरेयली यांच्या सांगण्यावरून उघडल्याची कबुली दिली.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सुशील भगवान जुवाटकर, पंकज राज कपूर आणि निश्चल टंकबीर बरेयली या तिघांना अटक केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी तत्परता दाखवत फिर्यादीचे ६२ लाख रुपये विविध बँक खात्यांमध्ये होल्ड करण्यात यश मिळवले.

### बँकॉक, म्यानमारमध्ये ट्रेनिंग

तपासात निष्पन्न झाले की, आरोपी पंकज कपूर आणि निश्चल बरेयली हे बँकॉक व म्यानमारमध्ये सायबर कॉल सेंटर चालवण्याचा अनुभव घेऊन आले होते आणि नवी मुंबईत नवीन कॉल सेंटर सुरू करण्याच्या तयारीत होते. पोलिसांनी त्यांच्याकडून ०६ मोबाईल फोन व ०२ लॅपटॉप, ०३ पासपोर्ट आणि ०३ पॉसमशीन, २४ विविध बँकांचे खाते उघडण्याचे किट्स, १२ बनावट शिक्के आणि ०२ हार्डडिस्क असा मुद्देमाल जप्त केला आहे.

## भिवंडीत 'आउटलेट मॉल ऑफ इंडिया'

### • महाराष्ट्रातील डिस्काउंट शॉपिंगला नवी दिशा

**चिरनेर :** भूमी वर्ल्ड महाराष्ट्रातील पहिला डेडिकेटेड आउटलेट-मॉल, आउटलेट मॉल ऑफ इंडिया सुरु करण्यासाठी सज्ज आहे. हा मॉल महाराष्ट्राच्या रिटेल क्षेत्रातील उत्क्रांतीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. यामुळे आता भिवंडीची ओळख केवळ एका औद्योगिक केंद्रापुरती मर्यादित न राहता, मुंबई महानगर प्रदेशातील एक वेगाने विकसित होणारे रिटेल, मनोरंजन आणि जीवनशैलीचे ठिकाण म्हणून भिवंडी नावारूपास येत असल्याचा हा एक महत्त्वपूर्ण संकेत आहे.

अत्याधुनिक रिटेलटेनमेंट हब (खरेदी आणि मनोरंजनाचे ठिकाण) म्हणून डिझाइन केलेल्या या मॉलमध्ये, १५० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सना असणार आहेत. ऑलवेज ऑन डिस्काउंट या स्वरूपात वर्षभर सवलती उपलब्ध असतील, ज्यामुळे ग्राहकांना प्रीमियम फॅशन आणि लाइफस्टाइल उत्पादने आकर्षक किमतीत खरेदी करण्याचा आनंद मिळवता येईल. अरमानी एक्सचेंज, सुपरड्राय, लॅकोस्टे, लिवाइज, एसिक्स, कॅल्विन क्लाइन, टॉमी हिलफिगर, जॅक अँड जोन्स, वेरो मोडा यासारखे आघाडीच्या ब्रँड्स या मॉलमध्ये दाखल होत आहेत.

## 'फार्मर आयडी'वर होणार खतांचे वितरण

### • शेतकऱ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक सेवा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
राज्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आता 'फार्मर आयडी'चा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

केंद्रीय कृषी मंत्री शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली फार्मर आयडीसह इतर विषयांवर ऑनलाईन बैठकीप्रसंगी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली. अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीचा वापर करून देशातील पहिला पायलट प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे खतांचे वितरण अधिक नियोजनबद्ध, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने होणार असून, शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट आणि योग्य पद्धतीने मिळणार आहे. तसेच बनावट व्यवहारांना आळा बसून प्रणाली अधिक विश्वासार्ह होणार आहे, अशी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली

दरम्यान, या बैठकीत महाराष्ट्रात अग्रीस्टॅक योजनेअंतर्गत सर्वाधिक प्रमाणात फार्मर आयडी तयार करण्यात आल्याबद्दल केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन केले. तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केवळ चार दिवसांत सर्वाधिक निधीचे वितरण करण्यात आल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

केंद्रीय मंत्री चौहान यांनी पुढील काळात सर्व योजनांमध्ये फार्मर आयडीचा वापर वाढविण्याच्या सूचना दिल्या असून, महाराष्ट्राचा हा उपक्रम इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



## सुधारक सन्मान पुरस्काराचे वितरण

नेरळ : कर्जत येथील हनुमान मंदिर हॉल येथे महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत प्रगती लोकसंचलित साधन केंद्र, नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत महावीर मित्र मंडळ प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सुधारक सन्मान पुरस्कार यांचे वाटप करण्यात आले. समाजामध्ये वावरत असताना अनेक समस्यांना जनतेला सामोरे जावे लागत आहे. त्या प्रत्येक समाजामध्ये प्रत्येक घटकातील अडचणींना मात करणाऱ्या २५ समाजसेवक यांना सुधारक सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. त्यात महिला सक्षमीकरण, शैक्षणिक क्षेत्रात, आरोग्य सेवा, पर्यावरण संरक्षण क्षेत्र, उद्योग धंदे क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरुष आणि महिलांना सुधारक सन्मान पुरस्कार देण्यात आले.

## 'महा-साधना सप्ताह'

**मुंबई :** भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे, हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत.

## 'रक्तदान शिबीर आयोजित करणार'

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरूडमध्ये अनेक रक्तदान शिबीर आयोजित करणार. या शिबिरामधून आपल्या छोट्याशा प्रयत्नाने जर एखाद्या कुटुंबाला आणि माणसाला मदत होत असेल, तर आपल्यासाठी फारच मोठी गोष्ट आहे, असे मत मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी व्यक्त केले. मुरूड महादेव कोळी समाज, महादेव कोळी समाज राजपुरी कोळीवाडा व डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वर्ष रक्तदान शिबीर आयोजित केले. यावेळी त्या बोलत होत्या.



यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील, जंजिरा मेडिकल असोसिएशन मुरुड अध्यक्ष संजय पाटील, डॉ.श्रीया पाटील, अंजली पाटील, नगरसेवक मनोज भगत, सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु, नगरसेवक ॲड.रुपेश पाटील, नरेंद्र गिदी, नरेंद्र घागरी, उल्हास मकु, शिवाजी थळे, शुभांगी थळे, गजानन पाटील, महेंद्र पाटील, डॉ. केतकी पाटील, संदिप पागे, महेंद्र मोहिते, डॉ.अमित बनकर, डॉ.राज कल्याणी, डॉ.मयुर कल्याणी, डॉ. हितेश जैन, डॉ.वसीम पेशमाम, चिंतामणी मकु, डॉ.दिपक गोसावी, डॉ.इप्सित पाटील, अभय पैर, नगरसेविका प्रिती चौलकर, नगरसेविका प्राजंली मकु, डॉ. कोकाटे, उप पोलीस निरीक्षक-अर्चना मोगरे, विजय गिर्दीसह मान्यवर रक्तदाते उपस्थित होते.

## तुलाडदेवी, धावीर उत्सवाला अलोट गर्दी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
चौल तुलाडदेवी येथील श्री धावीर उत्सव चैत्र पौर्णिमेला मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. या उत्सवानिमित्ताने लाट विधी मोठया श्रध्देने व भाविकतेने साजरा करण्यात आला.



चौल तुलाडदेवी नजीकच्या डोंगरात पायथ्याशी श्री धावीर मंदिर आहे. या मंदिरात चैत्र पौर्णिमेच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवात मोठया संख्येने पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती असते. चौल तुलाडदेवी नजीकचे हे मंदिर प्राचीन असल्याचे सांगितले जाते, शिवाय श्री धावीर मंदिराचे उत्सवाच्या दिवशी परंपरागत धार्मिक विधी पार पडतो. या विधीला लाट विधी म्हटले जाते. या मंदिरातील उत्सवाला लाट यात्रा सुद्धा संबोधले जाते. यावेळी मोठ्या संख्येने भाविक श्री धावीराचा दर्शनाचा लाभ घेतात.

या श्री धावीराच्या उत्सवाला मंदिरात अनेकाचे अंगात देव संचारतो, अंगात संचारलेला देवाने वैताच्या छड्डीने अंगावर मारून घेत असतो. मंदिराच्या बाजूलाच बगाड परंपरागत उभी आहे. या बगातीचा मानाची काठी चौलची भगत आळी तसेच वरंडेपाडा यांच्याकडे असतो. या बगाडाला बोकड अथवा कोंबडाचा मान म्हणून य बगाडाला बोकड व कोंबडा बांधून भक्तगण बगाडाला बसलेल्या देवाना पाचवेळा गोल गोल फिरवितात. यावेळी धावीर देव, महामरी तसेच चौल पंचक्रोशीतील २३ देवाधिकांना हा मान बगाडाच्या माध्यमातून पोहचविला जातो.

## नागोठण्यात हनुमान जन्मोत्सव साजरा

**नागोठणे :** नागोठणे शहरातील आंगर आळीतील, के.एम.जी. विभागातील तसेच नागोठणे परिसरातील सर्वच हनुमान मंदिरात जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त सर्वत्र पालखी सोहळे आयोजित करण्यात आले होते. नागोठण्यातील आंगर आळीतील हनुमान मंदिरातील जन्मोत्सव सोहळ्याची सुरुवात मंदिरात सकाळी ७ वाजता अभिषेक व पूजा करून करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ४ वाजता वाजत हा पालखी सोहळा सुरू करण्यात आला. त्यानंतर आंगर आळीत सर्वत्र ही पालखी फिरविण्यात आली. या पालखी सोहळ्यात ग्रामस्थांसह, अबाल वृद्ध, माहेरवाशिणी व तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.



**महालक्ष्मी सरस प्रदर्शनाला मुदतवाढ** | **सात दिवसात नऊ कोटींची उलाढाल**

# ग्रामीण महिलांच्या उद्योजकतेची मोठी झेप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये सुरू असलेल्या 'महालक्ष्मी सरस-२०२६' प्रदर्शनाचा सातवा दिवसही मोठया प्रतिसादाचा ठरला. अवघ्या सात दिवसांत या प्रदर्शनाने तब्बल नऊ कोटी रुपयांच्या उलाढालीचा टप्पा ओलांडून एक नवा इतिहास रचला आहे.

नवी मुंबईकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे 'महालक्ष्मी सरस-२०२६' प्रदर्शनाला मुदतवाढ देण्यात आली आहे. सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये सुरू असलेले हे प्रदर्शन आता ४ एप्रिलऐवजी ५ एप्रिलपर्यंत खुले राहणार असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केली.




नवी मुंबईकरांचा हा अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून, तसेच सहभागी महिलांच्या आग्रही मागणीचा मान राखून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रदर्शनाचा कालावधी एका दिवसाने वाढवण्याची घोषणा केली आहे.

महाराष्ट्राच्या चांद्यापासून ते बांदयापर्यंतच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला उद्योजिकांच्या कौशल्यपूर्ण उत्पादनाचा ४९० स्टॉल्सच्या माध्यमातून सुरू असलेली ही 'स्टार्टअप क्रांती' ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक उल्लेखनीय टप्पा ठरला आहे. अवघ्या सात दिवसांत सुमारे ९ कोटी रुपयांची विक्रमी उलाढाल करत या प्रदर्शनाने नवा उच्चांक गाठला आहे. ग्रामीण भागातील महिलांनी सादर केलेल्या उत्पादनांना नवी मुंबईकरांनी दिलेला भरघोस प्रतिसाद यामागे महत्त्वाचा घटक ठरला आहे.

ग्रामीण भागातील हस्तकला, सेंद्रिय उत्पादने, पारंपरिक वस्तूंना, खाद्यपदार्थ यांना ग्राहकांची मोठी पसंती मिळत असून, मुंबईसारख्या बाजारपेठेत मिळालेली ही पसंती ग्रामीण महिलांना प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

प्रदर्शनातील खाद्य विभागात दररोज प्रचंड गर्दी होत असून सकाळपासून रात्रीपर्यंत खरेदीचा उत्साह ओसंडून वाहत आहे. अनेक मान्यवर आणि सेलिब्रिटींनीही प्रदर्शनाला भेट देत सहभागी महिलांचे कौतुक केले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा हा उपक्रम व्यापक पातळीवर यशस्वी ठरत आहे.

नागरिकांची वाढती मागणी आणि महिलांचा उत्साह लक्षात घेऊन प्रदर्शनाची मुदत वाढवण्यात आल्याचे गोरे यांनी सांगितले. वाढीव कालावधीत अधिकाधिक नागरिकांनी भेट देऊन ग्रामीण महिलांच्या कष्टांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन उमेद अभियानामार्फत करण्यात आले आहे.

## निवडक



### हनुमान जयंतीचा पालखी सोहळा

**पाली /बेणसे :** सर्वत्र हनुमान जयंतीचा उत्सव धार्मिक व मंगलमय वातावरणात पार पडला. पेण तालुक्यातील धुळवड कोळीवाडा-झोतीरपाडा येथे पारंपरिक मानाचा पालखी सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. गावातील प्रत्येक घरामध्ये पालखीचे भक्तीभावाने पूजन करण्यात आले. फुलांनी सजवलेली पालखी, ढोल-ताशांचा गजर आणि ''जय हनुमान'' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. वाजत-गाजत निघालेल्या पालखी मिरवणुकीत लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भाविकांच्या श्रद्धा, एकोप्याची भावना आणि परंपरेचे जतन यांचे सुंदर दर्शन या सोहळ्यात घडले.

### वरदायनी देवीची यात्रा उत्साहात




**पाली :** राबगाव येथील वरदायनी देवीची यात्रा चैत्र शुद्ध पौणिमेच्या दिवशी मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली. दुपारी ४ वाजल्यापासून या यात्रेला सुरुवात झाली. यावेळी या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे राबगाव व गावांच्या असलेल्या चार वाड्यांमधून महादेवाच्या काठ्या नाचवत आणल्या जातात. ढोळ-ताशे व डिजेच्या तालावर या रंगीबेरंगि सजवलेल्या काठ्या तरुणाई तसेच काही जेष्ठ मंडळीदेखील मोठ्या हौसेने नाचवतात. या एक दिवसाच्या यात्रेमध्ये आजूबाजूच्या परिसरातील हजारो भाविक आपली उपस्थिती दाखवितात. यात्रेमध्ये मिठाईची दुकाने, लहान मुलांची खेळणी असलेली दुकाने, विविध खाद्याचे स्टॉल लागलेले असतात. यातून सर्व व्यावसायीकांची लाखो रुपयांची उलाढाल होते. यात्रा संपल्यानंतर वरदायनी देवीची पालखी मंदिरातून हरीनामाच्या जयघोषात निघून संपूर्ण गावात फिरते. या यात्रेत उंबरवाडी, आदिवासीवाडी, नंबरवाडी, गावडेवाडी, जांभूळमाळ आदि वाडीतील लोकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

### बाहे गावात हनुमान जन्मोत्सव साजरा



**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी दि.१ आणि २ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. रायगड भूषण डॉ.मारूती महाराज कोलाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बुधवारी (दि.१) सायंकाळी हरिपाठ, त्यानंतर किर्तन आणि महाप्रसाद देण्यात आला. रात्री ११ वाजता भव्य काठी मिरवणूक सोहळा पार पडला. तर गुरुवारी (दि.२) सकाळी ७ वाजता श्री हनुमान जन्म सोहळा व अभिषेक, सकाळी १० वा श्रीसत्यनारायणाची महापूजा, दुपारी १ वाजता पालखी सोहळा व रात्री महाप्रसाद आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी आपल्या हरि किर्तनरूपी सेवेप्रसंगी सुप्रसिद्ध किर्तनकार व समाजप्रबोधनकार डॉ.हरिदास महाराज पालवे शास्त्री यांनी हिंदू हा धर्म नाही, तर ती एक जीवन प्रणाली आहे. भारतासारखे राष्ट्र संपुर्ण जगामध्ये नाही. तर मातृभाषा हे आपले वैभवाचा ठेवा असून तो ठेवा आपण जतन करून ठेवला पाहिजे, अशाप्रकारचे प्रबोधनात्मक विचार व्यक्त केले.

### कामार्ले शाळेत स्मार्ट टीव्हीचे वितरण




**सोगाव :** विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमातून शिक्षण घेता यावे, या उद्देशाने सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे रायगड जिल्हा परिषद शाळा, कामार्ले येथे स्मार्ट टीव्हीचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम स्व. रमेश (दादा) बाळकृष्ण पाटील यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमासाठी साईल रमेश पाटील व समिहा साईल पाटील यांनी आर्थिक सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. कामार्ले गावातील रहिवाशी गणेश पाटील आणि शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्यामार्फत स्मार्ट टीव्हीची मागणी सक्षम एज्युकेशनकडे करण्यात आली होती.

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ

**मुंबई :** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बुधवारी (दि.१) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे. महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत करणे असा मुद्दा समाविष्ट आहे. यानुसार शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात येत आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना ८ ते ३४ वर्षे जुन्या आहेत. या योजनांमध्ये कालानुरूप बदल करणे आवश्यक असल्याने तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मध्ये दिव्यांगांना सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक लाभ देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रूपये (निवासी), ६०० रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रूपये (निवासी), ८०० रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा उत्साहात



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व व्याघ्रेश्वर या देवतांचा चैत्र पालखी सोहळा शुक्रवारी (दि.३) मधुकर पोवळे यांच्या हस्ते देवीचे मुखवटे विधिवतपणे पालखीत विराजमान केल्यानंतर जोगेश्वरी मंदिरातून मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने तसेच गोंधळ्यांच्या साथीने सुरु झाला. या पालखी सोहळ्यात देवीचे गोंधळी, जोगेश्वरी म्युझिकल कोळी ग्रुप, जखिणवाडी कराड येथील सह्याद्री प्रतिष्ठान दांडपट्टा पथक, श्री बल्लाळेश्वर पारंपरिक ढोल ताशा व ध्वज पथक पाली, हनुमान म्हाळसाकांत ब्रास बॅण्ड पथक, वरसोली तसेच वारकरी सांप्रदाय संत सेवा भजन मंडळ, नागोठणे सहभागी झाल्याने पालखी सोहळ्यात रंगत येत आणली.

या पालखी सोहळ्यात जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, भाई टके, किशोर जैन, सुप्रिया महाडिक, हरेष काळे, विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक, संजय महाडिक, सुमित काते, बाळासाहेब टके, संतोष कोळी, समृद्धी कोळी, अखलाक पानसरे, हरेश टके, सचिन कळसकर, राकेश टेमघरे, योगेश गायकवाड, चंद्रकांत ताडकर, संतोष चितळकर, विवेक देशपांडे, अनिल पवार, सह खजिनदार सतीश पाटील, संजय काकडे, प्रथमेश काळे, ग्रामपंचायतीचे सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, सचिन ठोंबरे, पुनम काळे, सुप्रिया काकडे, भाविक गिजे, अमृता महाडिक आदींसह उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि. सचिन कुलकर्णी व पोलिस कर्मचाऱ्यांनी नागोठणे पोलीस ठाण्यासमोर पालखीचे स्वागत करुन दर्शन घेतले.

या पालखी सोहळ्या निमित्ताने नागोठण्यातील परंतु नोकरी, व्यवसायानिमित्ताने गावाबाहेर असलेले चाकरमानी, ग्रामस्थ आणि माहेरवाशिणी गावात आवर्जून परतल्या आहेत. जोगेश्वरी मातेच्या या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने ग्रामस्थांना घरोघरी मातेचे दर्शन होणार असल्याने मातेच्या स्वागतासाठी सर्वत्र आकर्षक रांगोळी, सजावाटी, विद्युत रोषणाई, तसेच स्वागतकमानी उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण गावात एक आनंदाचे, उत्साहाचे व भक्तिमय वातावरण तयार झाले आहे.

हा पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

## पशुखाद्य दुकानाचे मिणमिणे यांच्या हस्ते उद्घाटन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्याम धील शिघ्रे तेलवडे मुख्य रस्त्यालगत शेतकरी वर्गाची गरज लक्षात घेऊन सौरभ सुनील पाडगे यांनी शेतकरी वर्गाला सुलभ दरात पशु खाद्य मिळावे यासाठी पशुखाद्य दुकान उघडण्यात आले आहे. या पशुखाद्य दुकानाचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक व सामाजिक कार्यात नेहमी सहभागी होणारे ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण मिणमीने यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. कार्यक्रमासाठी दिनेश मिणमीने, नागेश मेहेतर, जीविता मिणमीने, अहमद दायजी, अजीम कबले, रिजवान कारभारी, मनोज मिणमीने, विनायक पाडगे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी मिणमीने दुकान टाकल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

# जॅकी श्रॉफ ग्रामदैवताच्या दर्शनाला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जॅकी श्रॉफ यांनी माथेरानचे ग्रामदैवत असलेल्या पिसारनाथ महाराज यांच्याशी जोडलेली नाळ आपल्या व्यस्त वेळापत्रकात देखील तुटू दिलेली नाही. वर्षातून दोनदा माथेरानमध्ये येऊन ग्रामदैवत पिसारनाथ महाराजांचे दर्शन घेण्यावर त्यांचा कायम भर राहिला आहे. ३५ वर्षापूर्वी माथेरान येथे आल्यावर येथील पिसारनाथ महाराजांचे मंदिरात जाऊनदर्शनघेतले. त्यानंतरजॅकी श्रॉफची झालेली भरभराटीमुळे पुढे आपल्या प्रत्येक नवीन चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या आधी माथेरानमध्ये येऊन श्री पिसारनाथ महाराजांना अभिषेक घालूनच अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. त्यानंतर त्यांनी सुरू केलेला शिरस्ता आजही कायम असून भगवान शंकराचे या मंदिरात येऊन दर्शन घेण्याची जॅकीची परंपरा कायम आहे. श्रावण महिन्यात किमान एक दिवस कितीही गडबड असली तरी माथेरान भेटीवर येऊन पिसारनाथ महाराजांचे मंदिरात जाण्याचा त्यांचा कायम प्रयत्न राहिला आहे.

त्यात केवळ मंदिरात येऊन दर्शन घेण्याबरोबर आपले या प्रदीर्घ कालावधीत जोडलेले मित्र यांना भेटून त्यांच्याशी गप्पा मारण्याची जॅकी श्रॉफ यांची परंपरा कायम आहे.

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. बालकिशन अदुकिया-फ्लॅट क्र. बीसी-१०३, निर्वाणा अलाइव्ह सीएचएस लि., पडघावली गाव, जांभूळपाडा पोस्ट, ता. सुधागड, जि. रायगड - ४१० २०५ या जागेचे संयुक्त मालक व सभासद तसेचविभिन्न क्र. ६५१-६६० धारक प्रत्येकी रु. ५०.०० मूल्याच्या १० शेअर्सचा समावेश असलेल्या शेअर प्रमाणपत्र क्र. ६६ चे धारक यांचे इच्छापत्र न करता, दि.२९.०३.२०२३ रोजी मुंबईत निधन झाले आहे आणि शअरीमती ललिता देवी अदुकिया यांनी दिवंगत श्री. बालकिशन अदुकिया यांच्या वरील शेअर्सचे हस्तांतरण/संप्रेषणाकरिता अर्ज केला आहे. सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाचं शेअर्स व हितसंबंधांच्या हस्तांतरणासंदर्भात दावे वा हरकती असलेले वारस वा अन्य दावेदार किंवा दावेदार-हरकतदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीच्या आत सोसायटीच्या भांडवल/ मालमत्तेतील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधांच्या हस्तांतरणाकरिता त्यांचे दावे / हरकतीच्या पुष्ट्यर्थ असे दस्तावेज व अन्य पुराव्यांच्या प्रतींसमवेत दावे वा हरकती मागविण्यात येत आहेत. विहित कालावधीत कोणतेही दावे/हरकती प्राप्त न झाल्यास सोसायटीच्या उपविधीअंतर्गत विहित स्वरूपात सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधांसंदर्भात व्यवहार करण्यास सोसायटी मुक्त असेल.

सही/-
**ॲड. के. एम. यादव**
यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
शॉप नं. ४, श्री सिद्धीविनायक सीएचएस लि., स्टेशन रोड, विक्रोळी (प.), मुंबई - ४०० ०८३.
मोबा. -९९२०३६३४२९.
ठिकाण : रायगड दिनांक : ०४.०४.२०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे करंजघर, ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)श्री.मंगळ बबन बावधाने.<br>२)सौ. रेश्मा गंगाराम झोरे.<br>३)सौ.रसिका गंगाराम झोरे.<br>४)सौ.लखी गंगाराम झोरे.<br>५)श्री.भगवान गंगाराम झोरे. | ७ | १-८२-०० | ०-५० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणतीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- ०४/०४/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली,
ता. सुधागड, जि.रायगड.
मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खार पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती विद्यमान मालकांच्या मालकी हक्काच्या व ताबेकब्जात असून त्यांच्या सदर मिळकतींचे मालकी हक्कांची पडताळणी आम्ही करीत आहोत,

**मिळकतींचे वर्णन**

| अनु. क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | खार पेढांबे | ४ | ०-५७-४० | ७.८८ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| २. | खार पेढांबे | १५ | ०-१४-०० | १.८८ | श्री. श्रेयस किर्तीलाल दोशी |
| ३. | खार पेढांबे | १६ | ०-१४-८० | १.९९ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ४ | खार पेढांबे | १७ | ०-३४-२० | ४.६९ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ५. | खार पेढांबे | १९ | ०-३२-१० | ३.३१ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ६. | खार पेढांबे | ३५ | ०-३१-९० | ४.५० | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ७. | खार पेढांबे | ३६ | ०-३५-४० | ५.१९ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ८. | खार पेढांबे | ३७ | ०-३३-९० | ४.६९ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ९. | खार पेढांबे | ३८ | ०-४५-८० | ६.९५ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १०. | खार पेढांबे | ४३ | ०-४१-१० | ५.९४ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| ११. | खार पेढांबे | ४५ | ०-३६-१० | ५.१९ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १२. | खार पेढांबे | ४७ | ०-४६-५० | ६.३१ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १३. | खार पेढांबे | ७९ | ०-०९-४० | ०.२८ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १४. | खार पेढांबे | ८१ | ०-४४-८० | ३.३७ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १५. | खार पेढांबे | ९१ | ०-७२-५० | ८.६२ | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १६. | खार पेढांबे | ९२ | ०-७०-९० | ९.७६ | श्री.श्रेयस किर्तीलाल दोशी |
| १७. | खार पेढांबे | ९९ | ०-४७-०० | ६.०० | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १८. | खार पेढांबे | १०५ | ०-३७-७० | ५.५० | सौ. गिता श्रेयस दोशी |
| १९. | खार पेढांबे | २३० | ०-०८-१० | ०.४७ | सौ. गिता श्रेयस दोशी |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरले जाईल व तसा दाखला दिला जाईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०४/०४/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पिंगळस, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २५/१/ब | एकूण क्षेत्र १-७०-०० हे.आर | ०.७२ |

मौजे पाथरज, ता. कर्जत, जि.रायगड

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६३/२/२ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.१६ |

मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७४/३ | एकूण क्षेत्र १-७५-९० हे.आर | २.७४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-०४/०४/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

### जाहिर नोटीस

आमचे आशिल श्रीमती प्रतिभा जनार्दन बारस्कर, रा.चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून व दाखवलेल्या कागदपत्रांवरून तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की,

आमचे आशिल हे मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स.नं. ६३/१ब, भूखंड क्र.१ वर उभारलेल्या इमारतीमधील तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र.४ (ग्रामपंचायत घर क्र. ८४८/४) ज्याचे बांधीव क्षेत्रफळ ६७६ चौ. फुट आहे अशा सदनिकेचे मालक आहेत. सदरहु सदनिकेचे मुळ नोंदणीकृत ॲग्रीमेंट फॉर सेल दस्त जो दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात अनुक्रमांक अलब ६७३/२००१ कडे दिनांक २९.०३.२००१ रोजी नोंदवलेला आहे हा दस्त घेऊन दि.२४.०३.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता आमचे आशिलांचे जावई श्री. विवेक रोहीदास पाटील हे विद्यानगर ते अलिबाग असा प्रवास करतेवेळी सदरचा मुळ दस्त गहाळ झाल्याचे आढळुन आले. श्री. विवेक रोहीदास पाटील यांनी सदरचा दस्त गहाळ झाल्याबाबत अलिबाग पोलिस स्टेशनकडे दि. २६.०३.२०२६ रोजी माहिती दिली असुन तो हरवलेल्या मालमत्तेचे रजि. मधील क्र. ०२८९/२०२६ कडे त्याची रितसर नोंद दाखल करण्यात आलेली आहे.

वर नमुद मुळ ॲग्रीमेंट फॉर सेल हा मुळदस्त जर कोणास मिळाला असल्यास तो तात्काळ आमचे आशिलांस परत करावा. तसेच सदर दस्ताचा कोणीही कोणत्याही प्रकारे गैरवापर करू नये. जर सदरहु दस्ताचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केल्यास त्यास आमचे आशिल जबाबदार राहाणार नाहीत व अशा व्यक्तीचे विरूद्ध आमचे आशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०३.०४.२०२६
आशिलांची सही

सही/-
**ॲड. अमित महेश्वर देशमुख**
पत्ता वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चाणजे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३४४/४ | एकूण क्षेत्र ०-१४-४० हे.आर | १.३७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-०४/०४/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. गणेश शांताराम शिंदे रा. ३०८, वकील नगर, एरवडा पुणे २) श्री. राजेंद्र शांताराम शिंदे रा. ५०२ हाईट पार्क, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| वरसगांव ता. रोहा | ९२ | ०-९५-९०<br>पो.ख. ०-०९-४०<br>एकूण १-०५-३० | २२.७६ |

सदर वर नमूद केलेली मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
अलिबाग दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
तारीख ०३/०४/२०२६ पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे जांभुळपाडा, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १) श्री. गोविंद विठ्ठल दळवी | ३३/१ | ०-२०-०० | १-०८ |
| २) श्री. योगेश नथुराम दळवी | ३३/१ | ०-२०-०० | ०-६५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणतीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- ०४/०४/२०२६

खरेदीदारांतर्फे,
राठोड एण्ड एसोसिएट्स
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्रीमती. मयुरी अजय म्हात्रे रा. पहिला मजला, उदय ज्योत, बी.पी रोड, इंदिरा गांधी गार्डन जवळ, गोडदेव गाव, भाईंदर पूर्व - ४०११०५ यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| रमेश अनंत पाटील | ४६/८ | ०.२०.२०<br>पोट खराबा ०.०१.३०<br>एकुण क्षेत्र ०.२१.५० पैकी रस्त्याच्या वहिवाटी करीता दिलेले क्षेत्र १० मीटर लांबी X १६.२० मीटर रूंदी (अंदाजे ०.०१.६२ गुंठे क्षेत्र). | ०.२२ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

तारीख :- ०४/०४/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६९४८७८१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्री. रमेश अनंत पाटील रा. कोपर, पोस्ट-गव्हाण, ता. पनवेल, जि. ता.पनवेल,जि. रायगड ४१ ० २०६ यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मयुरी अजय म्हात्रे | ४६/५/अ | ०.१६.२०<br>पोट खराबा ०.००.८०<br>एकुण क्षेत्र ०.१७.०० पैकी रस्त्याच्या वहिवाटी करीता दिलेले क्षेत्र १० मीटर लांबी X १६.२० मीटर रूंदी (अंदाजे ०.०१.६२ गुंठे क्षेत्र). | २.६० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

तारीख :- ०४/०४/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को.ऑप.हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि.रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की

माझे अशिल मोतीराम बबन भाद्रिके मयत तर्फे वारस श्रीमती सिंधू मोतीराम भद्रिके, हर्षदा राकेश भद्रिके, केतन मोतीराम भद्रिके, रोहिणी सुरेश पवार, वैशाली विलास शिर्के, रुचिता प्रथमेश सकपाळ यांचा मा. वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, पनवेल येथे प्रतिवादी श्री. सुनीलकुमार रामस्वरूप सोनी यांचे विरुद्ध विशेष दिवाणी दावा क्र. १००/२०२२ हा दावा दाखल असून तो सध्या प्रलंबित आहे.

सदर दाव्यामध्ये मा. दिवाणी न्यायालयाने दिनांक १२/०१/२०२३ रोजीच्या आदेशान्वये निशानी ५ कडील प्रतिवादी विरुद्ध तूर्तातूर्त मनाई हुकुमा मागण्याकरिता दाखल अर्ज मंजूर केला आहे. सदर आदेशानुसार, दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी श्री. सुनीलकुमार रामस्वरूप सोनी आणि त्यांच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा कोणताही व्यवहार करण्यास, ती विकण्यास गहाण ठेवण्यास किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे त्रयस्थ हितसंबंध निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे. असे असूनही प्रतिवादी हे सदर मिळकतीबाबत बेकायदेशीरपणे व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे माझ्या अशिलांच्या निर्दर्शनास आले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने सदर दाव्यातील प्रतिवादींशी किंवा इतर कोणाशीही कोणताही खरेदी-विक्री किंवा अन्य व्यवहार करू नये.

मा. न्यायालयाच्या मनाई हुकुमाचे उल्लंघन करून केलेला कोणताही व्यवहार हा बेकायदेशीर, रद्दबातल ठरेल. तरी कोणी असा व्यवहार केल्यास, त्यास होणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांना व नुकसानीस तो स्वतः जबाबदार राहील.

**मिळकतीचे परिशिष्ट**

| अनु क्र. | गावाचे नाव | गट क्र. | एकूण क्षेत्र(हे. आर. पॉ) | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | वावर्ले (तालुका खालापूर) | १८९ | २-२२-०० | ०२-२५ |

स्थळ : कर्जत
दिनांक: /०३/२०२६

(स्वाक्षरी)
**ॲडव्होकेट चंद्रकांत महेश वैद्य**
(कर्जत, संपर्क क्र. ९९२३२८३९७९)
श्रीमती सिंधू मोतीराम भद्रिके, हर्षदा राकेश भद्रिके, केतन मोतीराम भद्रिके, रोहिणी सुरेश पवार, वैशाली विलास शिर्के, रुचिता प्रथमेश सकपाळ यांच्यातर्फे

**MAHANAGAR GAS LIMITED**
**CIN:** L40200MH1995PLC088133
1801-02, 18th Floor, A Wing, Parinee Crescenzo, C38 & C39, Block – G, Bandra Kurla Complex, Opp. MCA, Bandra East, Mumbai 400051, Maharashtra
MAHANAGAR GAS

**EMPANELMENT NOTICE FOR PNG DRIVE CONTRACTORS IMMEDIATELY REQUIRED**

Mahanagar Gas Limited (MGL) is engaged in the business of distribution of Piped Natural Gas (PNG) and Compressed Natural Gas (CNG) in Mumbai, Thane, Navi Mumbai, Raigad, Latur, Osmanabad, Ratnagiri, Chitradurgha and Davangere.

To overcome the ongoing LPG crisis in the country, MGL has ambitious plans to reach out to maximum number of households in its existing and new areas by providing PNG Connections inside the Kitchen with aim to replace LPG with PNG in domestic as well as commercial segments. To achieve this objective, MGL intends to onboard sound, capable and competent contractors having proven track record of safety for following category:

| Sr. No. | Category |
|---|---|
| 1 | Laying of Polyethylene (PE) Pipeline for Medium/ Low pressure network |
| 2 | Erection of GI pipeline (above ground) and associated activities required for Piped Natural Gas (PNG) Connection |
| 3 | Online PNG Connection in gasified building |

Contractors who have relevant experience of pipeline laying (Telecom, water, oil & gas etc.) / piping work in residential building / firefighting and have adequate resources readily available such as plumbers, labours, technicians etc. and who wish to work with MGL with immediate mobilization can Walk-In along with relevant credentials at the above mention addresses from 06th April 2026 to 15th April 2026 between 10:00 AM to 5:00 PM.

Manpower suppliers who can supply plumbers / technicians / Labours can also Walk-In along with their credentials for providing resources on contract basis.

For any queries, please contact: **erande.sanket@mahanagargas.com (8657975422)**; **asingh@mahanagargas.com (9324941163)**;

Sd/-
T.L Sharnagat
**Sr. Vice President (C&P)**

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने - नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक– सुहास माळी गाव– थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार –१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमध्ये दवाखान्यात कामाला नर्स/रिसेपशनिस्ट व ड्रायव्हर पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चर** ऑफिसमध्ये कॉम्प्युटर्सचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७०८२७८२९/९४२२०९४१५१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : कामात कामचुकारपणा नको. दुखापतीपासून सावध असावे. करमणुकीचा आनंद घ्याल.
- **वृषभ** : अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील. अपेक्षा पूर्ण होतील. वाहनांपासून सावध रहाणे गरजेचे.
- **मिथुन** : मानसिक संतुलन सांभाळा. घाईगडबडीत निर्णय घेऊ नका. संततीच्या प्रगतीचा काळ.
- **कर्क** : मनातील मरगळ झटकाल. नवा हुरूप, उत्साह निर्माण होईल. संततीच्या मागण्या वाढतील.
- **सिंह** : हाताखालील नोकर दगा देतील. उधारी वसुलीचा त्रास होईल, प्रवासाचा आनंद घ्याल.
- **कन्या** : भावंडांचे सहकार्य मिळेल. अचानक धनप्राप्तीचे योग. सत्संगाच्या अनुभवाने शांती लाभेल.
- **तूळ** : तुमच्याबद्दल गैरसमज पसरतील. विवाह ठरवताना काळजी घ्या. नवी कामे मिळतील.
- **वृश्चिक** : आश्वासने पूर्ण कराल. व्यवसायात वाढ होईल. संततीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नका.
- **धनु** : व्यवसायात अडचणी निर्माण होतील. अनिच्छेने भावंडांना मदत करावी लागेल. प्रकृती सांभाळा.
- **मकर** : गुणांची दखल घेतली जाईल. एकूण मिळकत वाढेल. खर्च आटोक्यात आणाल.
- **कुंभ** : घरगुती वादापासून दूर रहा. व्यसनी मित्रांपासून सावध. हातउसनी रक्कम देऊ नका.
- **मीन** : सुखाचा आस्वाद घ्याल. सहल,करमणुकीचा आनंद लुटाल. अपत्य क्रीडाविश्वात चकमेल.

## ४ एप्रिल — दिनविशेष

२०१४ : शक्ती मिल बलात्कारप्रकरणी तीन नराधमांना फाशी.
२०१६ : 'पनामा पेपर्स' प्रकरणी चौकशीसाठी गट स्थापन.
२०१७ : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा दोन कोटी पंधरा लाख शेतकऱ्यांचे एक लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय.
२०१८ : संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने जाहीर केलेल्या यादीत हाफिज सईद आणि दाऊद इब्राहिम यांच्या नावाचा समावेश.

## जपणूक... टिकवा नात्यातील ताजेपणा

नात्यांमध्ये ताजेपणा नसेल तर ते कोमेजून जाण्याची भीती असते. म्हणूनच प्रेमाची शिंपण आणि छोट्या छोट्या प्रयत्नांनी तुमचे नाते ताजे ठेवण्याचा प्रयत्न करा. अनेकदा नवविवाहित जोडप्यांना घर सांभाळण्यात, स्वयंपाक करण्यात किंवा घर–ऑफिसमध्ये संतुलन राखण्यात अडचणी येऊ शकतात. या अडचणी समजून घेऊन पतीने काही वेळा नाश्ता आणि जेवण तयार करण्यात मदत केली, घराची एकत्र काळजी घेतली तर पत्नीला धीर येईल आणि तिचा आत्मविश्वास बळावेल. दुसरीकडे, बायकोने दमलेल्या नवऱ्याला थोडी स्पेस दिल्यास तोदेखील स्वातंत्र्य संपल्याच्या कल्पनेने बिथरुन जाणार नाही.



पती–पत्नीमध्ये प्रश्न विचारण्यास किंवा कोणत्याही प्रकारची उत्सुकता व्यक्त करण्यास वाव नसेल तर नात्यात अडथळे येतील. अर्थात प्रश्न विचारणे म्हणजे आरोप करण्यासारखे नसावे. एकमेकांशी संवाद साधण्याचा आणि समजून घेण्याचा हा एक मार्ग आहे, जे लक्षात घ्यावे. न आवडणारे प्रश्न टाळणे हा उपाय नाही तर त्याची योग्य कारणे देऊन एकमेकांशी स्पष्टपणे बोला. नात्यात हलकीफुलकी मजा आणि भांडण चालूच राहिले पाहिजे. अर्थात विनोद दुखावणारा नसावा. थोडक्यात आपले नाते नेहमी ताजे आणि निरोगी ठेवण्यासाठी, एकमेकांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. तेव्हा तुम्ही जोडीदारासोबत नियमितपणे काही वेळ घालवण्याचा निर्धार करा. या सगळ्या प्रयत्नांचे परिणाम अत्यंत चांगले असतात हे विसरु नका.

## टेक फन — रोबोंच्या अजब दुनियेत

दोस्तांनो, जगभरातच रोबोंचा वापर खूप वाढला आहे. हे रोबो आपली बरीच कामं करतात. सुरक्षारक्षक म्हणून रोबो तैनात केले जातात. ते बँकेतही काम करतात. तुम्हाआम्हाला आकर्षित करणाऱ्या या रोबोंच्या अजब गजब दुनियेची सफर करू नया.

✻ भारतीय रेल्वेनेही आता स्मार्ट होत रोबोंची मदत घ्यायचं ठरवलं आहे. उस्ताद नावाचा हा रोबो ट्रेनच्या खालच्या भागाची तपासणी करेल. नागपूरच्या रेल्वे मंडळाने हा रोबो बनवून घेतला आहे. प्रवाशांना सुरक्षेच्या दृष्टीने या रोबोचं काम महत्त्वाचं ठरणार आहे.

✻ मुलांनो, देवळात गेल्यावर एखादा रोबो गुरूजी म्हणून समोर आला तर आश्चर्य वाटून घेऊ नका. धार्मिक कामं करण्यासाठी रोबो तयार केले जातात आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने त्यांना ही कामं शिकवली जाणार आहेत. त्यामुळे गुरूजींना वेळ नाही, हे कारण यापुढे ऐकावं लागणार नाही. (क्रमश:)

## ब्युटी टॉक — नखांच्या सौंदर्यासाठी...

मैत्रिणींनो, त्वचा, केस जपण्यावर आपला जास्त भर असतो. आपण त्वचेची अगदी नीट काळजी घेतो. केसांकडेही आपलं लक्ष असतं. मात्र हातापायांचं आणि त्यातही नखांचं सौंदर्य आपण टिकवून ठेवत नाही. नखांकडे तर आपलं दुर्लक्षच होतं. बळकट नखं हे बाह्यच नाही तर अंतर्गत सौंदर्याचं प्रतिक ठरतात. आपण निरोगी असल्याचं नखांमधून प्रतित होत असतं. पिवळी पडलेली, अर्धी तुटलेली नखं तुमचा लूक बिघडवून टाकतात. म्हणूनच नखांच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला हवं. लांब वाढलेल्या नखांवर लावलेलं नेलपॉलिश खूप सुंदर दिसतं. मात्र त्यासाठी नखं निरोगी असायला हवी. नखांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

✻ समारंभांच्या निमित्ताने नखं वाढवली जातात. अशा नखांवर नेल आर्ट शोभून दिसतं. नखं झटपट वाढवायची असतील तर लसूण वापरता येईल. ४–५ लसूण पाकळ्या सोलून घ्या. त्या नखांवर नियमित घासत राहा. लसणाचं तेल काढून ते नखांवर लावल्यानेही ती चांगली वाढतात. (क्रमश:)

## पंचांग

**शनिवार, ४ एप्रिल २०२६**
विश्वावसूनासंवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ. २ , चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : पूर्वा, योग : गंड,
सूर्योदय ६.३३, सूर्यास्त ६.५१

## फॉरवर्ड्स

**आँगन में होतीं तो हम गिरा भीं देतें ज़नाब...**


**कमबख़्त आदमीं ने दीवार दिल में ऊठा रक्खीं हैं...!**

## वेगळ्या वाटा

'पंतप्रधान स्कील इंडिया मिशन अंतर्गत' या क्षेत्रात स्वत:ची कंपनी सुरू करण्याची संधी दिली जाते. हे तज्ज्ञ विश्लेषण करून रक्तगटानुसार रक्ताची विभागणी करतात. रक्त सुरक्षित ठेवण्याची जबाबदारीही त्यांच्यावर असते. रक्तपेढी किंवा प्रयोगशाळेत अहवाल तयार करण्याचं कामही या तज्ज्ञांकडे असतं. या क्षेत्रात येण्यासाठी बारावीनंतर ब्लड बँक टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करता येतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात काम करू शकता. फार्मसी कंपन्यांच्या प्रयोगशाळांमध्येही यांची गरज असते.

## करिअरवाटा — वैद्यकीय शास्त्रातली वेगळी वाट

अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शास्त्र यांच्या एकत्रीकरणातून उदयाला आलेलं शास्त्र म्हणजे मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स. डॉक्टरी व्यवसायात काही प्रगत साधनं आणि उपकरणांची आवश्यकता असते. परंतु तंत्रज्ञानाचं ज्ञान नसल्यामुळे डॉक्टर्स अशी उपकरणं तयार करू शकत नाहीत. दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञान जाणणारे मात्र नवी साधनं विकसित करू शकतात. परंतु डॉक्टरांची नेमकी गरज काय, हे त्यांना कळू शकत नाही. या पार्श्वभूमीवर काही वर्षांपूर्वी एक नवीन शाखा विकसित करण्यात आली. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. मेडिकल इलेक्ट्रॉनिक्सचे शिक्षण घेणारे विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अशी साधनं विकसित करू शकतात. त्याचबरोबर कृत्रिम अवयव तयार करणं आणि ती बसवणं अशीही कामं करू शकतात. या शाखेमार्फत वैद्यकीय उपचार देणं, रुग्णांची देखभाल आणि त्यांच्या नोंदी व्यवस्थित ठेवणं ही कामं केली जातात. मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या विषयाचा अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांना याही क्षेत्रात नोकऱ्या मिळू शकतात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनीही या संधींबाबत विचार करायला हवा.



## खेचाखेची — काय पाहिजे?

**दुकानदार:** काय पाहिजे?

**गिऱ्हाईक:** मला ताकद पाहिजे, हिंमत पाहिजे, अक्कल पण पाहिजे!

**दुकानदार:** साहेबांना एक खंबा दे रे...

... आणि मुगदाळ पण दे पाच वाली!

## वेगळं काही

थायलंडमधल्या प्रसिद्ध फुकेत बेटांवर सेल्फी काढायला मज्जाव करण्यात आला आहे. इथे चुकून जरी सेल्फी काढण्याचा प्रयत्न झाला तर तुम्हाला मृत्यूदंडाची शिक्षाही होऊ शकते. फुकेत बेटांजवळ थायलंडचं आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. विमानतळ जवळ असल्याने ही विमानं बरीच खालून जातात. विमान जात असताना पर्यटक सेल्फी काढण्याची संधी साधतात. मात्र यामुळे विमान चालकाचं लक्ष विचलित होऊन अपघात होण्याचा धोका असल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे. या सेल्फी प्रकरणामुळे अनेकांचे जीव धोक्यात येऊ शकतात. पर्यटकांनी नियम मोडू नये, त्यांना धाक बसावा यासाठी मृत्यूदंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

## हेल्थ केअर — करुन घ्या या टेस्ट

आरोग्यविषयक धोके लक्षात घेता तिशीनंतर प्रत्येक महिलेने काही मेडिकल टेस्ट करून घ्यायला हव्या. कोणत्या आहेत या टेस्ट, जाणून घेऊ या.



✻ ब्लडप्रेशर टेस्ट– अचानक रक्तदाब वाढला किंवा कमी झाला तर शरीरावर विपरीत परिणाम होऊ शकतात. बीपी १२०/८० असणं सामान्य आहे. पण हाच रक्तदाब १४०/९० च्या आसपास असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ✻ थायरॉईड – पस्तिशीनंतर वजनामध्ये अचानक बदल जाणवत असेल तर हे थायरॉईड्चं लक्षणं असू शकतं. उदासिनता, ताण–तणावात झालेली वाढ हीदेखील थायरॉईडची लक्षणं असू शकतात. ✻ कोलेस्टेरॉल – ठराविक वयानंतर स्त्री आणि पुरुष दोघांनीही ही टेस्ट करून घेणं गरजेचं आहे. तिशीनंतर किंवा मेनॉपॉजच्या काळात वजनात वाढ झाल्याने महिलांच्या शरीरातील कोलेस्टेरॉलच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता असते. कोलेस्टेरॉलचं प्रमाण १३० पेक्षा जास्त असणं धोक्याचं ठरु शकतं. ✻ ब्रेस्ट कॅन्सर टेस्ट – बेस्ट कॅन्सरग्रस्तांचं वाढतं प्रमाण पाहता दर दोन वर्षांनी ब्रेस्ट कॅन्सरची टेस्ट म्हणजेच मेमोग्राफी करून घेणं गरजेचं ठरतं.

## सुडोकू ८७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | ४ | १ | ७ | | | |
| २ | | | ८ | | | | ४ | |
| ६ | | | ५ | | | ८ | | ७ |
| १ | | ९ | | | | | | |
| | ३ | | | ७ | | | १ | |
| | | | | | | २ | | ३ |
| ४ | | ३ | | | ९ | | | ६ |
| | २ | | | | ५ | | | ४ |
| | | | १ | ४ | ३ | ९ | | |

**टीप** -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८६चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ४ | ८ | २ | ५ | ३ | ७ | ९ |
| ५ | ७ | ९ | ४ | ६ | ३ | ८ | २ | १ |
| २ | ३ | ८ | ९ | १ | ७ | ६ | ५ | ४ |
| ९ | ४ | ६ | ३ | ७ | २ | १ | ८ | ५ |
| ८ | ५ | १ | ६ | ९ | ४ | २ | ३ | ७ |
| ३ | २ | ७ | १ | ५ | ८ | ४ | ९ | ६ |
| ४ | ८ | ५ | ७ | ३ | १ | ९ | ६ | २ |
| १ | ९ | २ | ५ | ८ | ६ | ७ | ४ | ३ |
| ७ | ६ | ३ | २ | ४ | ९ | ५ | १ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ८७

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ | | ■ | ५ | | ६ | ■ | ७ | |
| | ■ | ८ | | | ■ | | ■ | ९ | | ■ | १० | | | ■ |
| ११ | १२ | | ■ | १३ | १४ | | १५ | ■ | १६ | | | ■ | १७ | |
| ■ | | ■ | १८ | | | ■ | १९ | | | ■ | २० | | | ■ |
| २१ | | २२ | | ■ | २३ | २४ | | ■ | २५ | | | ■ | २६ | २७ |
| | ■ | | ■ | २८ | ■ | | ■ | २९ | | ■ | ३० | ३१ | | |
| ३२ | ३३ | | ३४ | | ३५ | ■ | ३६ | | ■ | ३७ | ■ | | ■ | |
| ३८ | | ■ | ३९ | | | ४० | | ■ | ४१ | | ४२ | | ■ | |
| | ■ | ४३ | | ■ | ४४ | | | | | ■ | | ■ | ४५ | |
| ■ | ४६ | | ■ | ४७ | | ■ | | ■ | ४८ | | | ४९ | | ■ |
| ५० | | ■ | ५१ | | | | ■ | ५२ | | ■ | ■ | ५३ | | ५४ |
| ■ | ५५ | | | ■ | | ■ | ५६ | | ■ | ५७ | ५८ | | ■ | |
| ५९ | | ■ | ६० | ६१ | | ६२ | | ■ | ६३ | | | ■ | ६४ | |
| | ■ | ६५ | ■ | | ■ | ६६ | | | | ■ | ६७ | | | ■ |
| ६८ | | | | | | ■ | | ■ | ६९ | | | ■ | ७० | |

**आडवे शब्द :–**
१) कावकाव करणारा पक्षी
३) दगलबाज
५) एक गळीत धान्य
७) आजच्या आधीचा दिवस
८) मदन
९) द्रव्य, पैसाअडका
१०) पत्र
११) लाट, झटका, हुक्की
१३) नमस्कार
१६) बाजेची सुती पट्टी
१७) बातमी
१८) मोठी जाड सतरंजी
१९) मऊ
२१) दिवाळीतील शोभेची वा आवाजाची दारू
२३) मारणे, चोपणे
२५) घोड्यावरून मारलेली चक्कर
२६) वल्लरी
२९) वाळवंट
३०) रमापती
३२) पालिकेतील लोकप्रतिनिधी
३६) अत्तराचा बोळा
३८) चुरमुरे, फरसाण यांचा एकत्रित चटकदार पदार्थ
३९) वतन मिळालेला
४१) सज्जनगडचे संत
४३) शपथ
४४) नवाकोरा
४५) हात
४६) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
४७) विविध
४८) पहाटेची गुलाबी निद्रा
५०) आरोप, संशय
५१) देवीचा महोत्सव
६२) उर्ध्वदिशा
६३) सुकुमार व सुंदर
६४) चरण
६६) सूट
६७) वागणूक
६८) माता पिता
६९) उत्तराधिकारी
७०)कान

**उभे शब्द :–**
१) एक प्रकारचे तलम वस्त्र
२) युद्ध
३) हत्तींचा राजा
४) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
५) जन्म–मृत्यू
६) किरकोळ सामान
७) ढवळाढवळ
१२) उपस्थित
१४) माया, प्रेम
१५) चिंतन
१८) जोडीतील एक सुगंधी नाजूक फूल, ✻✻ जुई
२१) आकाशाला भेदून जाणारा
२२) शिक्षक
२४) भीती
२७) संकटातून सोडविणारा, तारणारा
२८) नवऱ्याची दुसरी पत्नी
२९) चेहऱ्यावरील तेज
३१) मन, मनातील विचार
३३)मासा पकडण्याचे एक साधन
३४) सेवा करणारा
३५) अतिशय श्रीमंत मनुष्य
३६) काडीमोड
३७) यज्ञ
४०) दरवाजा
४१) रात्रभर
४२) लाकडी जिना
४३) स्तुती करणारा
४५) लबाडी, कारस्थान
४६) सुटकेचा मार्ग, पळून जाण्याची सोय
४७) होडी
४९) झुला
५१) पती
५२) छाती
५४) वर्तुळ
५६) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) एक कोल्हापुरी दागिना
५८) तृप्त न होणारी भूक
५९) शिकारीसाठी हेरलेला प्राणी
६१) खोदणे
६२) सेवक
६३) रात्रीचा पाऊस
६४) सरबत, पेय
६५) छोटे कुबड

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | र्म | भे | द | ■ | व | ■ | पा | व | स | ■ | स | दा | चा | री |
| न | ■ | क | र | ना | ही | त्या | ला | ड | र | ना | ही | ■ | क | ■ |
| स | व | ड | ■ | दा | ■ | ग | ■ | ■ | क | ट | ■ | पा | र | वा |
| ब | ळ | ■ | प | र | त | ■ | सु | च | णे | ■ | ह | ल | ■ | र्ता |
| दा | ■ | क | रा | ■ | ब | स | क | र | ■ | अ | मा | व | स | ■ |
| र | जा | चा | ग | ज | क | र | णे | ■ | पा | ग | ल | ■ | रो | ज |
| ■ | न | ट | ■ | मा | ■ | दा | ■ | वा | प | र | ■ | आ | ज | न्म |
| पा | व | ■ | म | त | दा | र | या | दी | ■ | ब | ख | र | ■ | जा |
| ■ | र | य | त | ■ | द | ■ | व | ■ | ह | त्ती | ■ | स | व | त |
| न | ■ | म | ■ | न | र | ■ | ना | ठा | ळ | ■ | स | पा | ट | ■ |
| म | दि | रा | ल | य | ■ | द | ल | ■ | ह | ■ | क | न | व | ट |
| स्का | ■ | ज | वा | न | म | र्द | ■ | वा | ळ | वं | ट | ■ | ट | च |
| र | सा | ■ | ज | ■ | स्त | ■ | क | स | णे | ■ | नि | म्मा | ■ | ट |
| ■ | मा | ला | मा | ल | ■ | पा | च | र | ■ | झो | क | ■ | स | ची |
| मा | न | व | ■ | ता | ले | वा | र | ■ | ट | प | ट | प | ■ | त |



# कलासक्त

**अभिनेता व दिग्दर्शक अनिल गवस यांचा ३० मार्च १९५९ रोजी जन्मदिन असल्याने तो मुंबईत साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा आढावा घेणे उचित ठरेल. त्यांचा अभिनेता ते दिग्दर्शक हा प्रवास खडतर होता. नाटकांतील भूमिकेचे वाचन, त्याचे चिंतन व नामवंत अभिनेत्यांच्या अभिनयाचे निरीक्षण, झोकून टाकण्याची वृत्ती, तेजस्वी स्मरणशक्ती, संहितेवर अभ्यास पूर्ण काम, मेहनत, आवाजाचा वापर व भूमिकेच्या अंतरंगात शिरण्याच्या वृत्तीमुळे त्यांना नाटकांत सातत्याने वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका करण्याची संधी मिळाली, व पाहता पाहता त्यांनी लोकप्रियता मिळवली. नाट्यक्षेत्रात त्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या प्रचंड मेहनतीचे फळ होते. त्यामुळे त्यांनी अभिनेता म्हणून आपले स्थान पक्के केले.**





## अभिनेता व दिग्दर्शक अनिल गवस

रंगबहार

**शरद कोरडे**


अनिल गवस यांचा जन्म ३० मार्चमध्ये मुंबईतील परळमधील चाळीत झाला. त्यांचे मूळ गाव सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी जवळील वाफोली असले तरी त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मुंबईत परळमध्ये झाले. या चाळींत वेगवेगळ्या जाती-जमातीचे लोक एकत्र येऊन सण साजरे करत व नाटकेही बसवित असत. वडील मुंबई महापालिकेतील बी.ई.एस.टी. मध्ये असल्याने त्यांना पुढे गोरेगाव येथील बी.ई.एस.टी. कॉलनीमध्ये निवासस्थान मिळाले. ही कॉलनी परळपेक्षा अधिक सेवा सुविधा असलेली होती. या कॉलनीच्या शेजारी माणिक नगर वसाहत होती. या वसाहतीत तडीपार झालेले गुंड राहत असत. दारूच्या भट्ट्या लावणे, दादागिरी, फसवणूक या मार्गाने ते कॉलनीतल्या लोकांवर दादागिरी करत असत. परळहून आलेली मंडळी यावेळी एकत्र आली आणि त्यांनी या गुंडांना वठणीवर आणले.


अनिल यांचे वडील बापू गवस यांचा आकस्मित मृत्यू त्यांच्या तरुण वयातच १९७६ मध्ये झाला. त्यावेळी अनिल हे सोळा वर्षाचे होते, त्यामुळे त्यांना महापालिकेत बेस्ट मध्ये अप्रेंटिसशिप म्हणून दोन वर्षाची नोकरी मिळाली. तेथे दीड वर्ष काम केल्यानंतर त्यांना विक्रोळी येथे १९८१ साली गोदरेज मध्ये नोकरी मिळाली, परंतु तेथे सांस्कृतिक विभाग नसल्यामुळे त्यांची घुसमट होऊ लागली, इतर ठिकाणी एकांकिका व नाटके करण्याचा प्रयत्न केला पण रजा न मिळाल्याने तो नाद सोडावा लागला. त्यांना परत महापालिकेत नोकरी मिळाली गोरेगाव येथील 'निनाद' या संस्थेत त्यांनी प्रवेश घेतला. तेथे नामवंत नाटककार व दिग्दर्शक विजय मोंडकर यांची भेट झाली व या संस्थेतर्फे त्यांना एकांकिका स्पर्धा व वेगवेगळ्या विषयांवरील नाटके करण्याची संधी मिळाली. सुभाष जाधव लिखित 'चक्रवाढ' ही एकांकिका बेस्ट मार्फत प्रथम अनिल गवस यांनी केली व ती एकांकिका स्पर्धेत प्रथम आली. त्यावेळी राजेंद्र शिरगावकर, अरुण नलावडे, चंद्रकांत मोरे आदी अभिनेते या एकांकिकेत होते. त्यानंतर जयंत पवार लिखित 'वंश' हे नाटक राज्य नाट्य स्पर्धेसाठी करण्यात आले. त्यात प्रदीप पाटील, हेमंत भालेकर, वसंत आंजर्लेकर, रमेश पंड्या आदी कलाकार होते. हे नाटक मंगेश कदम यांनी दिग्दर्शित केले होते. अनिल गवस यांनी केलेले हे पहिले नाटक. 'शो मस्ट गो ऑन', 'सात सोबत'व 'गुण्यागोविंदाने' या एकांकिका अनिल गवस यांनी केल्या. गंगाराम गवाणकर लिखित 'वस्त्रहरण' हे मच्छिंद्र कांबळी यांच्या भद्रकाली संस्थेने मालवणी नाटक म्हणून व्यावसायिक रंगभूमीवर आणले होते, त्याचे दिग्दर्शक रमेश रणदिवे हे बेस्ट मध्ये असल्याने त्यांनी अनिल गवस यांना एक राखीव अभिनेता म्हणून कोकण दौऱ्यावर नेले. या नाटकांत अनिल गवस यांनी धर्म, अर्जुन, राक्षस आदी कामे केली. दौऱ्यावर जो नट गैरहजर असे त्याचे काम अनिल गवस यांना देण्यात येई, त्यामुळे त्यांना सदैव दक्ष रहावे लागत असे व सर्वांचे संवाद पाठ करून ठेवावे लागत असत. या नाटकामुळे वेगवेगळ्या अडचणींना कसे सामोरे जावे व आयत्यावेळी भूमिका कशी निभावावी याचे प्रशिक्षण अनिल गवस यांना मिळावे. जयंत पवार लिखित 'अधांतर' हे नाटक १९९७ साली रंगभूमीवर आले. श्री चित्रलेखा या संस्थेने या नाटकाची निर्मिती केली होती. मंगेश कदम यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. मुंबईतील कापड गिरण्यांच्या ऐतिहासिक संपानंतर उद्‌ध्वस्त झालेली गिरणी कामगारांची कुटुंबे, असहाय्यपणे जगणारी आणि नाईलाजाने गुन्हेगारी जगतात ओढले गेलेली तरुण पिढी व बदलत गेलेले मुंबईचे सामाजिक व राजकीय रूप यांचा वेध घेणारे हे नाटक, ही मराठी कुटुंबाची एक शोकांतिका होती. या नाटकाचा पहिला प्रयोग ८ ऑगस्ट १९९७ ला झाला. या नाटकाला एकूण ४८ पुरस्कार मिळाले, त्यांतील १४ पुरस्कार हे नाट्य लेखनासाठी होते. या नाटकांत संजय नार्वेकर, भरत जाधव, अनिल गवस, लीना भागवत ,ज्योती सुभाष, भरत जाधव व राजन भिसे आदी कलाकार होते. या नाटकाचे सुमारे २०० प्रयोग अनिल गवस यांनी केले. त्यानंतर जयंत पवार यांनी 'काय डेंजर वारा सुटलाय', हे नाटक २०११ सालच्या दरम्यान रंगभूमीवर आणले. मुंबई महानगरातील जागतिकीकरणाच्या काळातील मध्यम वर्गीयांचे विस्थापन व असुरक्षितता मांडणारे होते . हे नाटक बिल्डर माफिया व भांडवलशाही व्यवस्थेमुळे सत्यविजय दाभाडे या सर्वसामान्य माणसाचे आयुष्य कसे उद्‌ध्वस्त करते, हे दर्शवणारे एक विदारक कथा सांगणारे नाटक होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे कडून सर्वोत्कृष्ट नाट्य लेखनाचे पारितोषिक या नाटकाचे लेखक जयंत पवार यांना मिळाले होते. या नाटकात अनिल गवस यांनी मध्यवर्ती भूमिका साकारली होती. त्यांच्यासोबत मृणाल चेंबूरकर, अक्षय शिंपी, संजय देशपांडे, सिद्धेश शेलार, अमृता मापुस्कर आदी कलाकार होते. या नाटकाचे दिग्दर्शन जयंत पवार यांनीच केले होते .जयंत पवार हे प्रसिद्ध साहित्यिक, नाट्य समीक्षक, एकांकिका व नाट्यलेखक तसेच कथा, वैचारिक व ललित लेख तसेच पत्रकार म्हणून ते महानगर, चंदेरी साप्ताहिक, लोकसत्ता व महाराष्ट्र टाइम्स मध्ये होते. २०१२ मध्ये त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार कथासंग्रहासाठी मिळाला होता, असे हे जयंत पवार अनिल गवस यांना मार्गदर्शक, गुरु तसेच मित्र म्हणूनही लाभले होते. त्यांच्या विविध नाटकांत विविध प्रकारच्या भूमिका करण्याची संधी त्यांना मिळाली. नाट्य क्षेत्रात यशस्वी होण्यात जयंत पवार यांचा मोठा वाटा असल्याचे ते कृतज्ञतेने म्हणतात. त्यानंतर अनिल गवस यांनी 'कीचक वध' 'आमचे नाव बाबुराव' 'सौदामिनी', सौ तारा सखाराम, 'जन्म सिद्ध', 'विच्छा माझी पुरी करा', 'मोरूची मावशी', 'पैशाचपैसा', 'रणांगण', 'वन रूम किचन', 'वडाची साल पिंपळाला', 'बापाचा बाप', 'प्यार मे कभी कभी', 'क्या फुल है हम', 'भैय्या हात पाय पसरी', 'काय डेंजर वारा सुटलाय', अशा नाटकांतून अनिल गवस यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या व रसिकांनी तसेच नाट्य समीक्षकांनी त्यांचे खुल्या दिल्याने कौतुक केले. अनिल गवस यांनी शैलेश राजे लिखित 'मायबोली', गंगाराम गव्हाणकर लिखित 'अरे बापरे', विजय तेंडुलकर लिखित 'पाहिजे जातीचे', सुरेश चिखले लिखित 'शंभुराजे', वामन तावडे लिखित 'तुम्ही आम्ही', व सुरेश चिखले लिखित 'प्रेम पुजारी' आदी नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. तसेच मानिनी, घरकुल, दामिनी, एका हाताची टाळी, सत्यमेव जयते, तिसरा डोळा, बंदिनी, अस्मिता, कलंकशोभा, मृण्मयी, समांतर, सांज सावल्या, हसण्यावारी नेऊ नका, अधुरी एक कहाणी, काटा रुते कुणाला, हा खेळ चारित्र्याचा, या सुखांनो या, हंसा चकटफू, असंभव, या गोजिरवाण्या घरात, चार दिवस सासूचे, श्रीयुत गंगाधर टिपरे, भाग्यविधाता, या कळत नकळत, सावित्री, उंच माझा झोका, राधा ही बावरी, आदी सुमारे ५५ दूरदर्शन मालिकेत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका केलेल्या आहेत. दूरदर्शन मालिकांचे निर्माते व दिग्दर्शक वीरेंद्र प्रधान यांनी त्यांच्या अनेक दूरदर्शन मालिकेंत अनिल गवस यांना वेगवेगळ्या भूमिकांतून उभे केले, त्यात वहिनीसाहेब, भाग्यलक्ष्मी, उंच माझा झोका, राधा ही बावरी, आदी मालिकांचा समावेश आहे. अनिल गवस यांनी 'स्वराज्य रक्षक संभाजी' या मालिकेतील हंबीरराव मोहिते यांची केलेली भूमिका खूप गाजली होती. मराठ्यांच्या गादीशी इमान राखणारा व संभाजीच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहणारा हंबीरराव साऱ्याच प्रेक्षकांच्या लक्षात राहिला.

अनिल गवस यांनी दूरदर्शन मालिकांसोबत काही मराठी व हिंदी चित्रपटांतूनही भूमिका केलेल्या आहेत, त्यात एस. एम. रंजन यांचे 'कोल्हाट्याचा पोर', केदार शिंदे यांचा 'अगबाई अरेच्चा' संदीप कश्यप यांचा 'साने गुरुजी', राजेंद्र बढे यांचा 'बेभान', मंगेश हाडवळे यांचा 'टिंग्या', संजय झणकर यांचा 'भाऊ माझा पाठीराखा', जय पुजारी यांचा 'मी नाही हो त्यातला', संजय सुरकर यांचा 'जगबुडी', शरण बिराजदार यांचा 'शेवग्याच्या शेंगा', सुनील माने यांचा 'कथा नाम्या गोंद्याची', अरुण नलावडे यांचा 'बाई माणूस', राम विजय परब यांचा 'दाह' तसेच संजय झा यांचा 'प्राण जाये पर शान ना जाये' या हिंदी चित्रपटांतही अनिल गवस यांनी काम केलेले आहे. तसेच मराठीतील दुसरा थ्री.डी. चित्रपट. (सन २०१३ मध्ये महेश कोठारे यांनी झपाटलेला- २ हा चित्रपट थ्री. डी. मध्ये केला होता.) त्यानंतर 'ध्यास' हा मंदार शिंदे यांनी निर्माण केलेला हा चित्रपट १४ सप्टेंबर २०१४ रोजी प्रदर्शित झाला होता. त्यांत अनिल गवस यांनी महत्त्वाची भूमिका केली होती. हा चित्रपट तीन वर्ष मेहनत घेऊन व थ्री. डी. इफेक्ट्सवर भर देऊन करण्यात आला होता. थ्रिलर फिल्म असलेल्या या चित्रपटात सुहास पळशीकर, मिताली शिंदे, संदेश जाधव, प्रशांत केतकर व अनिल गवस यांनी भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट विष्णुपंत छत्रे यांच्या सर्कस व्यवसायावर आधारित होता. सर्कसमध्ये काम करणाऱ्या कलाकारांचे आयुष्य, त्यांच्यावर येणारी संकटे, घडणारे अपघात व त्यांचा संघर्ष प्रभावीपणे मांडण्यात आला होता. या चित्रपटाचे संगीत लहू माधव व गीते मंदार चोळकर यांची होती. तसेच काही डॉक्युमेंटरीज मध्येही त्यांनी कामे केले आहेत, त्यात प्रवीण गांगुर्डे यांची 'डॉक्युमेंटरी ऑन वेस्टर्न रेल्वे' व महेंद्र कदम यांची 'फिल्म बाय एफ.डी. आय. ऑन एग्रीकल्चरल प्रॉब्लेम्स' या डॉक्युमेंटरी मध्येही अनिल गवस यांनी आपल्या अभिनयाने रंग भरलेले आहेत. ब्रिटिश ऑरेंज ड्रिंकची एक इंग्रजी जाहिरात गोव्यामध्ये चित्रित करण्यात आली होती, त्यात तीन दिवसाच्या चित्रीकरणात अनिल गवस यांनी भाग घेतला होता.ही जाहिरात आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रदर्शित करण्यात आली होती.

अनिल गवस यांचे नाट्य क्षेत्रातील आवडते दिग्दर्शक रमेश रणदिवे व विजय मोंडकर हे आहेत. त्यांना ते आपले नाट्य गुरु मानतात. त्यांचे आवडते नाटककार आहेत जयंत पवार. पुढील वर्षात त्यांचे नवीन नाटक दिग्दर्शित करून रंगभूमीवर आणण्याचा संकल्प अनिल गवस यांनी केलेला आहे आपण त्यांना शुभेच्छा देऊया! ●●

---





## सुवर्णयोगी नाटककार वसंत कानेटकर

**श्रीराम शेटये**

**वसंत कानेटकर म्हटले की त्यांच्या असंख्य कलाकृतींची आठवण येते. आपल्या निर्व्याज लेखणीने साकार केलेले अनेक नाट्यप्रयोग डोळ्यासमोर येतात. वेड्याचं घर उन्हात, रायगडाला जेव्हा जाग येते, अश्रूंची झाली फुले आणि जिथे गवतास भाले फुटतात यासारखी गाजलेली नाटक लिहिणारे लोकप्रिय मराठी नाटककार, लेखक, कादंबरीकार आणि विचारवंत वसंत शंकर कानेटकर यांचा जन्म २० मार्च १९२२ ला महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील, कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर या गावी झाला. प्रसिद्ध कवी शंकर केशव कानेटकर हे त्यांचे वडील. ते ''गिरीश'' या टोपणनावाने महाराष्ट्रात ओळखले जात. वसंतरावांच्या आई, उमा शंकर कानेटकर, ह्या बुधगाव संस्थानचे मुन्सफ गोविंद विनायक श्रीखंडे यांच्या कन्या होत. या दाम्पत्याला झालेल्या चार मुलांपैकी वसंत हे दुसरे अपत्य.**

वसंत कानेटकर यांचे सुरुवातीचे आयुष्य पुण्यात गेले. त्यांचे वडील, कवी गिरीश, हे रविकिरण मंडळाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. वडिलांच्या आणि रविकिरण मंडळातील इतर कवी यांच्या सहवासातून वसंत कानेटकरांना साहित्यात रस निर्माण झाला. कवी गिरीश हे महाराष्ट्रभर काव्यगायनासाठी जात. तेव्हा त्यांच्या कार्यक्रमात अनेक वेळा वसंतराव आणि त्यांची भावंडे सहभागी होत असत. याचा उपयोग त्यांच्या साहित्यिक जडणघडणीत झाला. ते लहानपणी नाटिका लिहीत आणि त्यांच्या बालमित्रांसोबत त्यांचे सादरीकरणही करीत. कानेटकरांनी १९४२-४३ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी संपादन केली. उच्चशिक्षण घेत असताना कानेटकरांना वि. स. खांडेकर आणि कन्नड साहित्यिक, आणि तत्कालीन विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य वि.कृ. गोकाक दोन ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांचे मार्गदर्शन लाभले. साहित्यिक श्री. के. क्षीरसागर यांचादेखील त्यांना या वेळेस सहवास लाभला. क्षीरसागरांकडून कानेटकरांना मराठी रंगभूमीबद्दलचे सखोल ज्ञान मिळाले आणि त्यांच्या सहवासातून कानेटकरांचा बौद्धिक दृष्टीकोनही रुंदावला.

१९४६ मध्ये कानेटकर नाशिकमधील गोखले एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या एच. पी. टी. आर्टस् कॉलेजमध्ये मराठी व इंग्रजीचे व्याख्याते म्हणून रुजू झाले. पुढे त्यांना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली आणि या संस्थेचे ते आजीव सदस्यदेखील झाले. शिकवत असतानाच त्यांनी लघुकथा लेखक आणि कादंबरीकार म्हणून आपली लेखन कारकीर्द सुरू केली. मनोहर आणि सत्यकथा यांसारख्या नियतकालिकांमधून त्यांनी लिहिलेल्या लघुकथा प्रसिद्ध झाल्या. १९५० ते १९५७ याकाळात त्यांच्या घर, पंख आणि पोरका या तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

१९५७ मध्ये कानेटकरांनी आपले पहिले नाटक वेड्याचे घर उन्हात लिहिले. हे नाटक भालबा केळकर यांनी दिग्दर्शित केले, तर पुण्यातील प्रोग्रेसिव्ह ड्रामाटिक असोसिएशनने त्याची निर्मिती केली. नाटकातील मध्यवर्ती भूमिका श्रीराम लागू यांनी निभावली होती. कालबाह्य रूढी-परंपरा आणि कर्तव्य यांच्या ओझ्याखाली दबलेल्या एका मनस्वी, कलासक्त, संपन्न व्यक्तिमत्त्वाची ही शोकांतिका. हे नाविन्यपूर्ण नाटक समीक्षकांना तर आवडलेच, पण व्यावसायिकदृष्ट्याही यशस्वी ठरले. याच्या यशानंतर कानेटकरांचे दुसरे मानवतेच्या भवितव्याबद्दल आणि अस्तित्वाबद्दल चिंतन करणारे कल्पनारम्य नाटक देवांचे मनोराज्य आले; मात्र या नाटकास तितकेसे व्यावसायिक यश मिळाले नाही. त्यांचे तिसरे नाटक प्रेमा, तुझा रंग कसा?, ही एक हलकी-फुलकी विनोदी, खेळकर सुखात्मिका होती. पुन्हा एकदा त्यांनी वेगळा विषय आणि शैली निवडली होती. या नाटकास अभूतपूर्व व्यावसायिक यश मिळाले व आजही ते त्यांच्या सर्वांत लोकप्रिय नाटकांपैकी एक म्हणून गणले जाते.

कानेटकरांनी रायगडाला जेव्हां जाग येते या ऐतिहासिक नाटकात छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्यातील पिता-पुत्राच्या संबंधांचे अंतरंग मांडले. या नाटकाच्या लेखनतयारीसाठी त्यांना दोन वर्षे लागली. त्यांनी स्वतः रायगड किल्ल्याला भेट दिली, इतिहासकार सेतुमाधवराव पगडी आणि शाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी चर्चा केल्या, ऐतिहासिक नोंदी वाचल्या. ऐतिहासिक मराठी भाषा अंगवळणी पडण्यासाठी प्राध्यापक म्हणून बखरदेखील शिकवायला घेतली. हे नाटक मराठी रंगभूमीवर एक मैलाचा दगड ठरले. या नाटकातील काशिनाथ घाणेकर यांची संभाजी महाराजांची भूमिका विशेष गाजली.

कानेटकरांचे पुढचे नाटक अश्रूंची झाली फुले हे त्यांचे सर्वांत यशस्वी नाटक. हे एक सामाजिक, भावनाप्रधान नाटक होते. या नाटकाची निर्मिती व दिग्दर्शन प्रभाकर पणशीकर यांनी केले, तसेच त्यांनी या नाटकात ''प्रा.विद्यानंद'' ही मुख्य भूमिकादेखील निभावली. चित्तरंजन कोल्हटकर यांची ''शंभू महादेव'' आणि काशिनाथ घाणेकर यांची ''लाल्या'' या भूमिका विशेष गाजल्या. हिंदी चित्रपट अभिनेते आणि निर्माते अशोककुमार यांनी या नाटकावर आधारित आंसू बन गये फूल हा हिंदी चित्रपट बनविला. या चित्रपटासाठी कानेटकरांना सर्वोत्कृष्ट कथेसाठीचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला (१९७१).

१९७३ मध्ये कानेटकरांनी अध्यापनातून स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि ते पूर्णवेळ व्यावसायिक नाटककार बनले. ५४ वर्षांच्या लेखन कारकीर्दीत त्यांनी ४२ तीन अंकी नाटके, ४ कादंबऱ्या आणि अनेक एकांकिका, लघुकथा, चिंतनपर लेख, चित्रपट आणि टीव्ही मालिकांसाठी पटकथा लिहिल्या. त्यांची अनेक नाटके हिंदी व गुजराती भाषांमध्ये रूपांतरित झालेली आहेत. कानेटकरांनी आपल्या ऐतिहासिक नाटकांमध्ये महापुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि संवेदनांचा शोध घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापासून ते छत्रपती संभाजी राजेंच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने महाराष्ट्रावर केलेली स्वारी या कालखंडावर आधारित पाच ऐतिहासिक नाटकांचे ''नाट्यपंचक'' त्यांनी साकारले. ही पाच नाटके म्हणजे रायगडाला जेव्हां जागे येते, इथे ओशाळला मृत्यू, तुझा तू वाढवी राजा, आकाशमिठी आणि जिथे गवतास भाले फुटतात ही होत. संगीत नाटकातदेखील त्यांनी क्रांती घडवून आणली. शेक्सपिअरच्या शोकांतिका, आधुनिक संवेदनशीलता आणि महाभारतातील पौराणिक कथा एकत्र करून त्यांनी संगीत मत्स्यगंधा हे नाटक लिहिले. लेकुरे उदंड जाली यामध्ये त्यांनी चौथी भिंत तोडली आणि नायकाला थेट प्रेक्षकांशी संवाद साधायला लावला. या नाटकात त्यांनी माय फेअर लेडी नाटकाप्रमाणे पद्य आणि गद्य गीतांच्या मिश्रणाचा अनोखा प्रयोग यशस्वी रित्या केला. त्यांच्या सर्व संगीत नाटकांसाठी पंडित जितेंद्र अभिषेकींनी उत्तम संगीत दिले.

महाराष्ट्रातील अनेक प्रख्यात व्यक्तींच्या आयुष्यावर कानेटकरांनी चरित्रनाटके लिहिली. या चरित्रनाटकांचे वर्णन कानेटकरांनी स्वतः ''कर्मयोगी शोकात्मिका'' असे केलेले आहे. हिमालयाची सावली (धोंडो केशव कर्वे), वादळ माणसाळतंय (बाबा आमटे), विषवृक्षाची छाया (इतिहासाचार्य वि. का. राजवाडे), कस्तुरीमृग (हिराबाई पेडणेकर) आणि तू तर चाफेकळी (बालकवी ठोंबरे) ही ती नाटके आहेत. त्यांच्या प्रेमा तुझा रंग कसा?, प्रेमाच्या गावा जावे, लेकुरे उदंड जाली, मदनबाधा, छू मंतर आणि सूर्याची पिल्ले इत्यादी सुखात्मिका अत्यंत लोकप्रिय ठरल्या. गगनभेदी या त्यांच्या प्रख्यात नाटकात त्यांनी एकाच नायकाच्या आयुष्यातील तीन वेगळ्या टप्प्यांमध्ये शेक्सपियरच्या हॅम्लेट, ऑथेल्लो आणि किंग लियर या तीन महान शोकांतिका एकत्र केल्या. सार्त्रच्या या पटकथेचे त्यांनी तेथे चल राणी या नावाखाली कादंबरीत रूपांतर केले.

वैयक्तिक आयुष्यात वसंत कानेटकरांचा सिंधूताई यांच्याशी विवाह झाला होता. (१९४२). या दांपत्यास चंद्रलेखा (कन्या) आणि प्रियदर्शन (पुत्र) ही दोन अपत्ये. वसंत कानेटकर यांच्या कलाकृतींना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. वेड्याचे घर उन्हात या त्यांच्या पहिल्या नाटकाने महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील बहुतांशी बक्षिसे जिंकली (१९५८). देवांचे मनोराज्य, प्रेमा, तुझा रंग कसा? आणि रायगडाला जेव्हां जाग येते यांना महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतील पहिले पारितोषिक मिळाले. संगीत नाटक अकादमीने रायगडाला जेव्हां जाग येते या नाटकाला ''बेस्ट इंडियन प्ले'' पुरस्काराने सन्मानित केले (१९६४). या पुरस्काराचा भाग म्हणून या नाटकाचे १४ भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले आणि आकाशवाणीच्या राष्ट्रीय कार्यक्रमात प्रसारण झाले. हे नाटक मुंबई विद्यापीठाच्या पदवीपूर्व कला अभ्यासक्रमातही सामील झाले आणि यामुळे अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वतःचे नाटक शिकवण्याचा मान कानेटकरांना मिळाला. १९७१ मध्ये ते कुर्ला, मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. १९७७ मध्ये त्यांना कस्तुरीमृग या नाटकासाठी सर्वोत्कृष्ट नाटक व सर्वोत्कृष्ट नाटककार असे कलादर्पण पुरस्कार मिळाले. त्यांना संगीत नाटक अकादमीने सर्व भारतीय भाषांमधील सर्वोत्कृष्ट नाटककार म्हणून गौरविले आहे (१९८४). ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली (१९८८). त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र गौरव (१९९०) आणि भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रंगभूमीच्या इतिहासात वसंत कानेटकर हे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. ●●



# बालांगण

## मास्कफोन आणि बरंच काही...

**सी**ईएस (कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स शो) हा जगातला इलेक्ट्रॉनिक्सचा सर्वात मोठा सोहळा मानला जातो. या शोमध्ये भन्नाट आणि भविष्याचा वेध घेणारी गॅजेट्स, उत्पादनं सादर केली जातात. अशाच काही गॅजेट्सवर नजर टाकू या.

✻ मास्क फक्त कोरोनासाठीच नाही तर प्रदूषणापासून बचावासाठीही घातला जातो. अशीच काही हायटेक मास्क



या कार्यक्रमाची शान ठरली. बिनाटोन मास्कफोन चांगलाच चर्चेत राहिला. हाँगकाँगच्या बिनाटोन कंपनीने हा मास्क तयार केला असून त्यात एन ९५ फिल्टर्स बसवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या मास्कमध्ये ईयर बड्स आणि मायक्रोफोनही आहे. यामुळे तुम्ही फोन घेऊ शकाल. हा मास्क ॲपला कनेक्ट करून वापरता येईल. तसंच एकदा चार्ज केल्यानंतर त्याचा १३ तास वापर करता येईल.



स्मार्ट टेक

✻ सॅमसंगने व्हॅक्युम क्लिनिंग रोबो सादर केला. जेटबोट ९० एआय प्लस असं या रोबोचं नाव असून तो एआय तंत्रज्ञानावर काम करतो. यातल्या रिडर आणि थ्रीडी सेंसर्समुळे रोबो घराचं मॅपिंग करू शकतो. यात एक कॅमेराही बसवण्यात आला आहे. हा रोबो ॲपला कनेक्ट होतो.

✻ जनरल मोटर्सने फ्लाईंग कार सादर केली. कॅडिलेक फ्लाईग कार या नावाने ती ओळखली जाते. ही स्वयंचलित कार असून उड्डाण करण्यासाठी चालकाची आवश्यकता नाही. अर्थात या गाडीतून फक्त एकच व्यक्ती प्रवास करू शकते.

## अशी ही आकाशगंगा

**सू**र्य हा अत्यंत प्रकाशमान तारा आहे. तारेतारकांच्या समूहाला आकाशगंगा असं म्हटलं जातं. आकाशात दिसणारे तारे आणि ग्रह मिल्की वे या आकाशगंगेचा भाग आहेत. अंतराळातल्या या आकाशगंगांची संख्या लाखोंच्या घरात आहे. पण उघड्या डोळ्यांनी आपण त्या पाहू  शकत नाही. अर्थात असं असलं तरी काही आकाशगंगा मात्र उघड्या डोळ्यांनी दिसू शकतात. एम ३१ किंवा द अँड्रोमेडा त्यापैकीच आहे. ही सर्वात प्रखर अशी आकाशगंगा आहे. एम ३१ पृथ्वीपासून जवळपास २.५ दशलक्ष प्रकाशवर्षं लांब आहे. म्हणजे या आकाशगंगेतल्या तारेतारकांचा प्रकाश पृथ्वीपर्यंत पोहोचायला २.५ दशलक्ष वर्षं लागतात. या आकाशगंगेत ४०० दशलक्ष तारे असण्याचा अंदाज आहे. एम ३१ आपल्या मिल्की वे या आकाशगंगेच्या तुलनेत आकाराने दुप्पट  आहे.




एम ३१ गोलाकार आहे. यात असंख्य तारेतारका, वायू आणि धूळ आहे. एम ३१ च्या दोन उपआकाशगंगाही आहेत. अल-सुफी या फारसी आकाशतज्ज्ञाने ‘छोटा ढग’ म्हणजे ‘लिटिल क्लाउड’ असं या आकाशगंगेचं वर्णन केलं आहे. निरभ्र आकाशात ती छोट्या आकाराच्या ढगासारखी दिसते. १६१२ मध्ये या आकाशगंगेचा शोध लावण्यात आला. आधी एम ३१ ला मिल्की वेचा भाग समजलं जात असे. पण १९२० मध्ये एडविन हबल या शास्त्रज्ञाने तिच्या वेगळ्या अस्तित्त्वाबद्दल सांगितलं. एम ३१ आणि मिल्की वे यांच्यातलं अंतर झपाट्याने कमी होत आहे. पाच लाख किलोमीटर प्रतितास एवढ्या वेगाने हे अंतर कमी होत आहे. त्यामुळे जवळपास तीन अब्ज वर्षांनंतर या दोन्ही आकाशगंगा एकमेकांवर आपटतील, असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.

नॉलेज अपडेट

## यू ट्यूब त्रास देतंय?

**ब**रेचदा चांगलं इंटरनेट कनेक्शन असूनही यू ट्यूबवरचे व्हिडिओ स्लो होतात. ही समस्या तुम्ही सोडवू शकता. काय करायचं मग? जाणून घेऊ.




यू ट्यूबचा बफरिंग टाईम कमी करण्यासाठी तुम्हाला काही गोष्टी कराव्या लागतील. कॅशे क्लिअर करण्यापासून व्हिडिओ क्वॉलिटी बदलण्यापर्यंत बरंच काही करावं लागेल. कॅशे डाटामुळे यू ट्यूब व्हिडिओची गती मंदावू शकते. हा प्रश्न सोडवण्यासाठी क्रोम ब्राउजर सुरू करा. यानंतर डाव्या बाजूला दिसणाऱ्या तीन रेषांवर क्लिक करा. मग हिस्ट्रीचा पर्याय दिसेल. त्यावर टॅप करा. मग क्लिअर ब्राउंजिंग डेटाची निवड करा. इथे तुम्हाला ब्राउजिंग डाटा क्लिअर करण्याचा पर्याय दिसेल. डाटा क्लिअर वर क्लिक केल्यानंतर कॅशेज निघून जातील आणि तुमचे यू ट्यूब व्हिडिओही सुरू राहतील.

स्मार्ट गॅजेट

कॅशे क्लिअर केल्यानंतरही व्हिडिओची गती कमी असेल तर व्हिडिओचा दर्जा बदलून बघा. यासाठी गियर आयकॉनवर क्लिक करा. इथे काही पर्याय दिसतील. त्यापैकी लोअर रिझोल्युशनवर क्लिक करा.  स्मार्टफोन, लॅपटॉप असो किंवा डेस्कटॉप, तुम्हाला सगळीकडे हा पर्याय दिसेल. एवढं केल्यावर तुम्ही बिनधास्त यू ट्यूब व्हिडिओचा आनंद घेऊ शकाल.

## भरती आणि ओहोटी


**स**मुद्रातील पाणी कधी किनाऱ्याकडे पुढे येते आणि कधी परत मागे जाते.या हालचालीला भरती आणि ओहोटी असे म्हणतात. ही एक नैसर्गिक आणि नियमित घडणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे मुख्य कारण म्हणजे चंद्राचा पृथ्वीवर होणारा परिणाम. चंद्र पृथ्वीच्या खूप जवळ असल्यामुळे त्याचे गुरुत्वाकर्षण पृथ्वीवरील पाण्याला स्वत:कडे खेचते. त्यामुळे समुद्राचे पाणी चंद्राच्या दिशेने थोडे फुगते आणि त्या भागात भरती येते. साधारणपणे दिवसातून दोन वेळा भरती आणि दोन वेळा ओहोटी येते. पृथ्वी सतत फिरत असल्यामुळे कोणता भाग चंद्रासमोर येतो ते बदलत राहते. त्यामुळे भरती-ओहोटीची जागा आणि वेळ सतत बदलत असते .चंद्राबरोबरच म्हणजे सूर्याचाही यात थोडा वाटा असतो. सूर्य खूप मोठा असला तरी तो पृथ्वीपासून खूप दूर आहे, त्यामुळे त्याचा परिणाम चंद्रापेक्षा कमी असतो. पण सूर्य, पृथ्वी आणि चंद्र एका सरळ रेषेत येतात, तेव्हा दोघांचे आकर्षण एकत्र आल्यामुळे खूप मोठी भरती येते. तसेच, सूर्य आणि चंद्र एकमेकांच्या काटकोनात असतात,तेव्हा त्यांचे आकर्षण कमी होते आणि भरती कमी होते. भरती-ओहोटीचा परिणाम फक्त समुद्रावरच नाही, तर किनाऱ्यावरील जीवनावरही होतो. अनेक मासे, खेकडे आणि इतर जलचर प्राणी या बदलांनुसार आपले जीवन जगतात. भरती-ओहोटी ही फक्त नैसर्गिक घटना नाही, तर माणूस तिचा उपयोगही करतो. सर्वात महत्त्वाचा उपयोग म्हणजे वीज निर्मिती. समुद्रात भरती आली की पाणी वर येते आणि ओहोटीला ते परत खाली जाते. या ये-जा करणाऱ्या पाण्याच्या जोरातून टर्बाईन फिरवून वीज तयार करता येते. याला भरती-ओहोटी ऊर्जा म्हणतात. काही देशांनी यावर आधारित प्रकल्पही सुरू केले आहेत. भरती ओहोटीचा उपयोग मासेमारीसाठीही होतो. मासेमारांना भरती-ओहोटीच्या वेळा माहिती असतात. भरतीच्या वेळी मासे किनाऱ्याजवळ येतात, त्यामुळे मासेमारी सोपी होते. भरतीच्या वेळी पाण्याची पातळी वाढते, त्यामुळे मोठी जहाजे बंदरात सहज येऊ शकतात. भरती-ओहोटीमुळे पाण्याची सतत हालचाल होते आणि समुद्र स्वच्छ राहण्यास मदत होते. भरती-ओहोटीच्या पाण्यात खूप शक्ती असते आणि माणसाने त्याचा उपयोग वीज, मासेमारी आणि वाहतूक यासाठी करून घेतला आहे. भरती आणि ओहोटी ही चंद्र, सूर्य आणि पृथ्वी यांच्या एकत्रित परिणामामुळे घडणारी एक सुंदर आणि नियमित नैसर्गिक घटना आहे.



रंजक विज्ञान


## रंग इंद्रधनुष्यातील

**इं**द्रधनुष्यातील रंग सूर्यप्रकाशातून येतात. आपल्याला सूर्यप्रकाश पांढरा दिसतो, पण प्रत्यक्षात तो अनेक रंगांनी बनलेला असतो. पावसाच्या थेंबांमधून सूर्यप्रकाश आत जातो तेव्हा एक खास प्रक्रिया घडते. पाण्याचा थेंब लहान काचेप्रमाणे काम करतो. प्रकाश थेंबात शिरताना वाकतो. याला प्रकाशाचे अपवर्तन म्हणतात. मग तो थेंबाच्या आत परावर्तित होतो आणि बाहेर पडताना पुन्हा वाकतो. या प्रक्रियेमुळे प्रकाश वेगवेगळ्या रंगांमध्ये विभागला जातो.



प्रत्येक रंगाचा वाकण्याचा कोन थोडा वेगळा असतो. त्यामुळे लाल, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, जांभळा असे रंग वेगवेगळ्या पट्ट्यांमध्ये दिसतात.म्हणूनच पावसानंतर सूर्यप्रकाश पडला की आकाशात सुंदर रंगांची कमान दिसते. त्यालाच इंद्रधनुष्य म्हणतात. इंद्रधनुष्य ही केवळ निसर्गाची जादू नाही तर त्यामागे विज्ञान आहे.

## तंत्रज्ञानाच्या साथीने...



**पु**ढच्या काळात तंत्रज्ञानाला पर्याय नाही. आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे (एआय) बरंच काही सोपं झालं आहे. ऑटोमेशन हा परवलीचा शब्द असणार आहे. या क्षेत्रात सुमारे ३.५ दशलक्ष नोकऱ्या उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अर्थात यासाठी तरूणांकडे काही कौशल्यं असणं गरजेचं आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तसंच तंत्रज्ञानाशी संबधित काही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते पूर्ण करून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करीअर करता येईल. हे अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध आहेत.

✻ यासंदर्भात मशीन लर्निंगचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

✻ स्टॅटिस्टिकल मशीन लर्निंग अभ्यासक्रमात इंटरमिडिएट स्टॅटिस्टिक्स आणि मशीन लर्निंगबाबत शिकवलं जातं. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे गणित, कॉम्प्युटर सायन्स आणि स्टॅटिस्टिक्सचं ज्ञान असणं गरजेचं असतं.

कोण होणार?

✻ इंट्रो टू आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धीमत्तेची  प्राथमिक माहिती दिली जाते.

✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर रोबोटिक्समध्ये रोबोटिक कारच्या प्रोग्रामिंगचं शिक्षण दिलं जातं.

✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अभ्यासक्रमात डाटा स्ट्रक्चर, गेम्स याबाबत माहिती दिली जाते.

## न्याहारी महत्त्वाची

**न्या**हारी करून घे, न्याहारी करून घे, असा तगादा  आई लावत असेल तर सकाळी उठल्यावर लगेच खायचं कशाला, असा प्रश्न तुम्हाला पडत असेल. शाळेत जाण्याची, ऑनलाईन वर्गांची गडबड सुरू असताना खात कुठे बसायचं, असंही तुमच्या मनात येत असेल. पण मित्रांनो, ब्रेकफास्ट किंवा न्याहारी शरीरासाठी अत्यंत गरजेची असते. न्याहारी म्हणजे शरीराचं इंधन... दिवसभर धावपळ आणि काम केल्यानंतर आपण झोपतो. पण झोपल्यानंतरही विविध अवयवांचं कार्य सुरुच असतं. यासाठी अन्नातून मिळणारी ऊर्जा वापरली जाते. झोपेमुळे साधारण आठ ते दहा तास आपल्या पोटात अन्न जात नाही. असं असताना सकाळी न्याहारी केल्याने शरीराला आवश्यक असणारी ऊर्जा मिळते आणि आपण ताजेतवाने होतो.

हेल्थ वेल्थ

न्याहारीला काय खावं?

सकाळी उठल्यानंतर काहीही न खाण्यापेक्षा काहीतरी खाल्लेलं चांगलं. पण न्याहारीला आरोग्यदायी पदार्थ खायला हवे. डेनट्स, बर्गर, पेस्ट्रीसारखे पदार्थ वरचेवर खाऊ नका. अशा पदार्थांमध्ये फॅट्स, साखर आणि कॅलरींचं प्रमाण बरंच जास्त असतं. तसंच यात पोषक घटकही नसतात. त्यामुळे शरीराला त्यांचा काहीही लाभ होत नाही. शिवाय डोनट्स खाल्ल्यानंतर पोट भरल्यासारखं वाटणार नाही. एकसारखी भूक लागेल. म्हणूनच अंडी, फ्रेंच टोस्ट, थिरडी, पोहे, उपमा, दूध आणि सिरियल्स, नाचणीसत्त्व, गव्हाचं सत्त्व, ओटमिल, फळं, दही, सुकामेवा, फळांचे रस असे पदार्थ न्याहारीला घ्यायला हवे. यासोबतच सँडविच, कडधान्य असे पदार्थही खाता येतील.



मुलांनो, लक्षात ठेवा, काहीही झालं तरी न्याहारी टाळू नका. कितीही घाई असली, उठायला उशीर झाला किंवा मित्रमंडळी खेळायला बोलवत असली तरी आधी न्याहारी करा आणि मगच बाहेर पडा.

## पक्षी खरेच बोलतात?

**पो**पट आणि काकाकुवा हे पक्षी आपल्या आजूबाजूचे आवाज सतत ऐकतात. त्यांच्याकडे आवाज लक्षात ठेवण्याची आणि परत काढण्याची खास क्षमता असते. आपण एखादा शब्द वारंवार बोलतो तेव्हा ते तो आवाज ओळखून तसाच उच्चार करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या घशातील आणि तोंडातील रचना अशी असते की ते वेगवेगळे आवाज तयार करू शकतात. म्हणून आपण त्यांच्याशी पुन्हापुन्हा बोलतो ते ऐकून नमस्कार किंवा काय करताय, असे शब्द म्हणतात. अर्थातच, त्यांना त्या शब्दांचा अर्थ समजत नाही. लियरबर्ड हा पक्षी तर कॅमेरा, गाडीचा हॉर्न, मोबाईलचा आवाज असे वेगवेगळे आवाजही अगदी तंतोतंत काढू शकतो. हे सगळे पक्षी खरे बोलत नाहीत, पण ते ऐकलेले आवाज लक्षात ठेवून त्याची नक्कल करतात. त्यामुळे आपल्याला ते माणसासारखे बोलतात असे वाटते.

## पेनचा शोध

**पू**र्वी लोक लिहिण्यासाठी मोरपिसासारखे पक्ष्यांचे पंख,काडी किंवा शाईत बुडवायची बांबूपासून बनवलेली लेखणी वापरत असत. त्यामुळे वारंवार शाईत बुडवावी लागत असे त्यामुळे लेखन हळू होत असे. हा वेळ वाचवण्यासाठी आणि लेखनाची गती वाढवण्यासाठी १८८८ साली जॉन जे लाऊड यांनी बॉलपॉइंट पेनचा पहिला प्रकार तयार केला. पण तो फारसा यशस्वी झाला नाही. नंतर १९३८ मध्ये लस्ज्लो बीरो यांनी सुधारित बॉलपेन तयार केले. या पेनच्या टोकाला एक छोटा गोल बॉल होता. पेन फिरवताना हा बॉल फिरतो आणि शाई कागदावर समान पसरते.

त्यामुळे लिहिणे खूप सोपे, स्वच्छ आणि जलद झाले. शाई सांडण्याची अडचणही कमी झाली.

आज आपण वापरत असलेले बॉलपेन हा या शोधाचा परिणाम आहे. त्यामुळे पेन हा आपल्या रोजच्या आयुष्यातील एक खूप उपयोगी शोध मानला जातो.

## साधे पण उपयोगी: जिप्सम

**जि**प्सम हे जमिनीच्या आत आढळणारे एक उपयुक्त खनिज आहे. त्याचा रंग साधारण पांढरा किंवा फिकट करडा असतो. काही वेळा तो थोडा गुलाबी किंवा पिवळसरही दिसतो. जिप्सम मऊ असल्यामुळे त्याची पूडही करता येते. हे खनिज समुद्राचे पाणी आटल्यावर तयार होते. म्हणून ते कोरड्या आणि उष्ण प्रदेशात जास्त आढळते. जिप्सममध्ये माती, वाळू, मीठ किंवा इतर खनिजांचे थोडे मिश्रण असते. त्यामुळे जमिनीतून काढल्यानंतर ते थोडे स्वच्छ किंवा शुद्ध करावे लागते. खाणीतून मोठे दगडासारखे तुकडे काढले जातात. त्यानंतर त्यांना मोडून छोटे केले जाते. या तुकड्यांमधील माती, दगडाचे कण किंवा इतर अशुद्ध घटक वेगळे केले जातात. काही ठिकाणी ते धुवूनही स्वच्छ केले जाते. घर बांधताना वापरल्या जाणाऱ्या सिमेंटमध्ये जिप्सम मिसळले जाते. त्यामुळे सिमेंट पटकन घट्ट होत नाही आणि बांधकाम नीट आणि मजबूत होते. भिंती गुळगुळीत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पांढऱ्या मसाल्यातही जिप्समचा उपयोग होतो. खडूचीही जिप्समपासून तयार केले जातात. काही जमिनी खूप घट्ट किंवा खारट असतात. अशा जमिनीत पिके नीट वाढत नाहीत. त्या जमिनीत जिप्सम टाकल्यास माती हलकी आणि भुसभुशीत होते. जिप्सममुळे पाण्याचा आणि हवेतल्या घटकांचा मातीमध्ये प्रवेश होतो. त्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. मूर्ती, खेळणी, सजावटीच्या वस्तू, भिंतीवर लावायची नक्षी अशा अनेक गोष्टी जिप्समपासून तयार करता येतात. जिप्समची पूड पाण्यात मिसळली की ती थोड्या वेळाने घट्ट होते. त्यामुळे साचे बनवणे आणि त्यात विविध आकार तयार करणे सोपे जाते. म्हणून कारागीर आणि कलाकार यांना जिप्सम खूप उपयोगी पडते.



खनिजांची माहिती

भारतामध्ये राजस्थान, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि तमिळनाडू या राज्यांत जिप्सम मिळते. जिप्सम दिसायला साधे असले तरी खूप उपयोगी खनिज आहे.

## नैसर्गिक घड्याळ

**आ**पल्याला झोप लागते कारण आपल्या शरीरात एक नैसर्गिक घड्याळ असते. दिवस संपत आला की मेंदू मेलाटोनिन नावाचे संप्रेरक तयार करतो. हे संप्रेरक वाढले की डोळे जड वाटतात, अंग सुस्त होते आणि आपल्याला झोप येते. मेंदूत ॲडेनोसिन नावाचे एक रसायन तयार होते. त्यामुळे झोपेची इच्छा निर्माण होते आणि वाढते. हे रसायन दिवसभर वाढत जाते. त्यामुळे रात्रीपर्यंत आपल्याला झोप येऊ लागते. दिवसभर काम केल्यामुळे शरीर थकते. मेंदूलाही विश्रांतीची गरज भासते. म्हणून आपण झोपतो. आपोआप जाग येते कारण सकाळी प्रकाश वाढतो. सूर्यप्रकाश डोळ्यात गेल्यावर मेंदूला संकेत मिळतो की उठायची वेळ झाली आहे. तेव्हा मेलाटोनिन कमी होते आणि शरीर पुन्हा ताजंतवाने होते. म्हणूनच झोप लागणे आणि जाग येणे हे आपल्या शरीराचे आपोआप चालणारे सुंदर आणि शहाणे नियोजन आहे.



## यांगत्से: चीनची जलराणी

**यां**गत्से ही आशियातील सर्वात लांब आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी नदी आहे. ती सुमारे ६३०० किलोमीटर लांब आहे. ही नदी चीनमधील सर्वात महत्वाची नदी मानली जाते. यांगत्से नदीचा उगम तिबेटजवळील उंच डोंगराळ प्रदेशात होतो. तेथून ती पूर्वेकडे वाहत अनेक प्रांतांमधून पुढे जाते आणि शेवटी चीनच्या पूर्व समुद्रात जाऊन मिळते. चीनमधील चोंगकिन, वूहान, शांघाय यासारखी अनेक महत्त्वाची शहरे यांगत्से नदीच्या काठावर वसलेली आहेत. या शहरांमुळे व्यापार,वाहतूक आणि उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. ऐतिहासिक दृष्ट्यादेखील या नदीला खूप महत्त्व आहे. प्राचीन काळापासून या नदीकाठच्या सुपीक जमिनीत शेती होत आली आहे. त्यामुळे येथे मोठी संस्कृती विकसित झाली.

गोष्टी नद्यांच्या

या नदीवर थ्री गॉर्जेस डॅम हे जगातील एक अतिशय मोठे धरण बांधले गेले आहे. या धरणातून मोठ्या प्रमाणावर वीज तयार केली जाते. यांगत्से नदीवर शिलुओदू आणि गेऊझोबा यासारखी अजूनही काही धरणे बांधली गेली आहेत. चीनच्या आर्थिक आणि सामजिक विकासात या नदीचा फार मोठा वाटा आहे. यांगत्से नदीतून मोठमोठ्या मालवाहू बोटी आणि जहाजे धान्य,कोळसा, लोखंड, यंत्रसामग्री आणि इतर सामान एका शहरातून दुसऱ्या शहरात नेतात. विशेषतः शांघाय बंदरापर्यंत देशांतर्गत वाहतूकही केली जाते. त्यामुळे व्यापार आणि उद्योगाला मोठी मदत होते.



या नदीत काही दुर्मीळ आणि खास प्राणी आढळतात. यांगत्सेफीनलेस पॉर्पोईज नावाचा एक छोटा गोड्या पाण्यात राहणारा डॉल्फिनसारखा दुर्मिळ प्राणी या नदीत आढळतो. हा डॉल्फिनसारखा सस्तन जलचर प्राणी आहे. आता तो खूप दुर्मीळ झाला आहे. चायनीज स्तर्जिओन हा अतिशय प्राचीन प्रकारचा एक मोठा मासा यांगत्से नदीत आढळतो. चायनीज स्तर्जिओन हा मासा लाखो वर्षांपासून पृथ्वीवर आहे, म्हणून त्याला जिवंत जीवाश्म असेही म्हणतात. पूर्वी या नदीत बेईजि नावाचा गोड्या पाण्यातील डॉल्फिनही आढळत होता. पण प्रदूषण आणि जास्त जलवाहतुकीमुळे तो आता जवळजवळ नामशेष झाला आहे. यांगत्से नदी ही चीनची जलराणी तर आहेच पण त्याचबरोबर ती चीनच्या इतिहास, संस्कृती, शेती आणि उद्योग यांना जीवन देणारी मोठी जीवनरेखा आहे.

विनायक दळवी

# गुणवंत क्रिकेटपटू काळच्या पडद्याआड

अनिल गुरव नावाच्या एका मुंबईच्या एका माजी गुणवंत क्रिकेटपटूचे नुकतच निधन झाले. श्रीकांत कांबळे यांचा फेसबुकवरील अनिल गुरव यांच्या बद्दल लिहिलेला लेख वाचला आणि त्याबाबत मी क्रिकेटमधील अनेकांशी बोललो. त्यावेळी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. १९८० च्या काळातला मैदान क्रिकेटमधील हा एक पॉप्युलर क्रिकेटपटू होता. अनिल गुरव हा गुणवत्ता ठासून भरलेला क्रिकेटपटू होता. शारदाश्रम आणि छबीलदास या दोन शाळा आणि त्यानंतर झुंजूनवाला महाविद्यालय, असा अनिलचा प्रवास होता. त्याला दोन मोठे क्रिकेट गुरु लाभले होते. आधी अण्णा वैद्य यांच्याकडे तो शिकायचा आणि त्यानंतर रमाकांत आचरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तो क्रिकेटचे धडे गिरवायचा. त्यानंतर तो सासानियन क्रिकेट क्लबला खेळायला लागला. १९ वर्षाखालील क्रिकेटमधील तो त्यावेळचा सर्वोत्तम खेळाडू होता त्याच्या खणखणीत ड्राईव्हची अजूनही चर्चा होते. त्याचे कट्स आणि हूक्स हे फटके पाहण्यासाठी त्यावेळचे सर्व नवोदित क्रिकेटपटू नेट्स भोवती घुटमळत असायचे. रमाकांत आचरेकर यांनी तर अनिलला, प्रत्येक नेटसमध्ये खेळायला न्यायची परंपरा त्यावेळी सुरू केली होती. ज्यामुळे इतरांना देखील तंत्रशुद्ध फलंदाजी कशी करावी हे कळावे यासाठी.



सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी हे दोघेजण देखील अनिलची फलंदाजी मनापासून पाहायचे. त्यातील काही गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करायचे. अनिलचा, सचिन देखील फॅन होता. असं म्हणतात सचिन वयाच्या १४ वर्षी पहिली रणजी मॅच खेळला तेव्हा त्याने अनिलकडे त्याच्या बॅटची मागणी केली होती. अनिलने आपली बॅट दिली आणि या बॅटने सेंचुरी मार, अशी शुभेच्छाही दिली. अनिलला सचिनने निराश केले नाही हे आपणा सर्वांना ठाऊकच आहे. कारण पदार्पणाच्या रणजी सामन्यात सचिनने शतक ठोकले. असा हा टॅलेंटेड क्रिकेटपटू मोठ क्रिकेट का खेळू शकला नाही? हे जाणून घेण्यासाठी अनिल ज्यांच्याशी संबंधित होता त्या क्रिकेटपटू प्रशिक्षक यांच्याशी मी बोललो त्यावेळी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे, दोन गोष्टींमुळे अनिल क्रिकेटपटू होऊ शकला नाही. अनिल हा रेड बॉल क्रिकेट उत्तम खेळायचा. मात्र, त्याकाळी टेनिस बॉल क्रिकेटचे पेव फुटले होते. टेनिस बॉल क्रिकेटमध्ये देखील अनिलची प्रचंड लोकप्रियता होती. अनिल रात्रीचे टेनिस क्रिकेट सामने खेळायचा आणि त्याचा त्याला अर्थार्जनासाठी उपयोग व्हायचा. टेनिस क्रिकेटमध्ये अनिलला त्या वेळचे क्रिकेटरसिक विवियन रिचर्ड्स म्हणायचे. एवढा तो लोकप्रिय होता आणि क्राउड पुलर होता. याच टेनिस बॉल क्रिकेट मुळे अनिलला रेड बॉल क्रिकेटमध्ये करिअर करता आले नाही. कारण त्याकाळी टेनिस बॉलने क्रिकेट खेळणाऱ्याला वेगळ्याच नजरेने पाहिलं जायचं. आज परिस्थिती खूपच बदलली आहे. रेड बॉल क्रिकेटच्या बरोबरीने मानमरातब, प्रतिष्ठा आणि पैसा मिळत आहे. अनिल क्रिकेट पासून दूर गेला त्याचा आणखी एक कारण होते. अनिलचा भाऊ अजित गुरव पोलिसांच्या वॉन्टेडच्या यादीत होता. दिसण्याचे साधर्म्य आणि सारखी शरीरयष्टी यामुळे पोलिसांचा त्रास अनिलला कायम व्हायचा. त्याला चौकशीसाठी वारंवार नेलं जायचं. घरातल्या व्यक्तींना देखील त्रास व्हायला लागला. अचानक घरच्यांनी निर्णय घेतला व ते मुंबई शहरापासून लांब दूरवर राहायला गेले. क्रिकेटच्या मुख्य प्रवाहापासून अनिल असा दूरवर लोटला गेला. क्रिकेटचा स्वप्न असं उध्वस्त होत होतं दुसरीकडे पोलिसांचा त्रास असह्य व्हायला लागला आणि कंटाळून अनिलने रेड बॉल क्रिकेटपासून स्वतःला लांब ठेवले. अनिल ससानियम क्रिकेट क्लब मधून खेळला. सासनियांचे लक्ष्मण चव्हाण म्हणत होते, अनिल अतिशय चपळ होता काटक होता. त्याचा ड्राईव्ह अप्रतिम होता. ड्राईव्ह हा त्याचा ट्रेडमार्क होता. अगदी विराट कोहली जसा ड्राईव्ह मारतो तसा जमिनीलगत आणि वेगवान फटका अनिल खेळायचा. तो वेळेप्रसंगी चांगली गोलंदाजीही करायचा. तो चपळ क्षेत्ररक्षकही होता. अचानक तो प्रॅक्टिसला कमी कमी यायला लागला. नंतर गायब झाला. कुठे गेला कोणास ठाऊक. परळ भागातून तो त्यावेळी कुठे गेला ते कळलंच नाही. लक्ष्मण चव्हाण म्हणतात उत्तम क्रिकेटची गुणवत्ता असूनही त्याच क्रिकेटपटू बनण्याच स्वप्न साकारलं नाही. गरिबी आणि अन्य मर्यादा व परिस्थिती याला कंटाळून त्याने त्याच्या आवडत्या क्रिकेट पासूनच काडीमोड घेतला. तो व्यसनाधीन झाला. मद्यधुंद अवस्थेत, त्याला त्याच्या गुरूंनी पाहिलं. ते देखील रागावले. हेच तुझ आणि आमचं स्वप्न होतं का? असं त्यांनी म्हटलं. अनिल त्यानंतर क्रिकेटपासून आणि क्रिकेटमधील सर्व मंडळींपासून दूर दूर होत गेला. १९८० च्या दशकातला मुंबईच्या मैदान क्रिकेटचा हा हिरो नुकताच देवाघरी गेला. सचिन आणि अनिल या दोघांच्याही भावाचं नाव अजितच होतं. नियतीने त्याला क्रिकेटची गुणवत्ता दिली, मात्र नशीब दिलं नाही. नियतीने त्याला भाऊ दिला जो अजित तेंडुलकरसारखा नव्हता. क्रिकेटने त्याला प्रती विवियन रिचर्ड्स हे नाव दिल. पण प्रेम, फेम आणि पैसा दिला नाही. लालबागच्या गणेश गल्लीचा तो टेनिस बॉल क्रिकेटचा स्टार होता. परळ लालबागमध्ये त्याच्या नावाचा दबदबा होता. मात्र नियतीने त्याच्या डोक्यावर यशाचा वरदहस्त पूर्णपणे ठेवला नाही. क्रिकेटपासून दूर जाणं अनिलला काही जमलं नाही. तो मैदानामध्ये बऱ्याच वेळा दिसायचा. मात्र, एकेकाळच्या क्रिकेटच्या मैदानावरील राजाची ती ओळख सध्याच्या पिढीला नव्हती. त्याच्या काळातील त्याचे समकालीन क्रिकेटपटू, त्याला पाहताच आदराने वाकायचे. अगदी सचिन तेंडुलकर देखील गर्दीतून त्याचा चेहरा दिसला तर स्वतहून पुढे जाऊन त्याची विचारपूस करायचा. क्रिकेटच्या गुणवत्तेला, एका उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या क्रिकेटने दिलेली ती खरी मानवंदना होती.

# रामराज प्रीमिअर लीगचे शानदार उद्घाटन

## || शेकापक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती || दिवस-रात्र स्पर्धेत १६ संघ भिडणार

| रायगड | प्रतिनिधी |

ग्रामस्थ व महिला मंडळ नांगरवाडी आयोजित रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोहन दत्तात्रेय धुमाळ पुरस्कृत रामराज विभाग प्रीमिअर लीगचे शुक्रवारी (दि. ३) सायंकाळी शेतकरी कामगार पक्षाचे रामराज विभागातील ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. सलग तीन दिवस ही स्पर्धा दिवस-रात्र खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत रामराज विभागातील १६ संघ आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न करणार आहेत. रामराज विभाग प्रीमिअर लीगचे हे चौथे पर्व आहे

रामराज प्रीमिअर लीग या क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव करण्यात आला. या स्पर्धेसाठी २७२ खेळाडूंनी आपली नोंदणी केली होती. त्यापैकी २२४ खेळाडूंची लिलावामध्ये वर्णी लागली. विशेष म्हणजे, या स्पर्धेत खेळणारे सर्व खेळाडू रामराज परिसरातील आहेत.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक १,२५,००० आणि चषक, द्वितीय क्रमांक ७०,००० आणि चषक, तृतीय क्रमांक ४०,००० आणि चषक, तसेच चतुर्थ क्रमांक ४०,००० आणि चषक अशी बक्षिसे असणार आहेत. प्रत्येक सामन्यातील सामनावीर ठरणाऱ्या खेळाडूला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक खेळाडूला सायकल आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. संपूर्ण स्पर्धेत आपली छाप सोडून मालिकावीर ठरणाऱ्या खेळाडूला दुचाकी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

यावेळी व्यासपीठावर रामराज विभागातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नंदकुमार गावडे, अशोक खोत, रामचंद्र धुमाळ, सुनील धुमाळ, महादेव पाटील, भरत तांडेल, जनार्दन गावडे, राजू गावडे, संतोष गावडे, विनायक धुमाळ, महादेव धुमाळ, नारायण झावरे, गिरीश झावरे, शाम पाटील, महेंद्र भोईर, हेमंत भोनकर, रमेश पाटील, उमाकांत पाटील, प्रवीण शेळके, रामचंद्र पाटील, ॲड. महेश शिंदे, अनंत झावरे, घनश्याम शेळके, संतोष झावरे, सुहास गावडे, चंद्रकांत बामणे, प्रदीप शेळके, गजानन पालकर, रमेश बाणे, नारायण झावरे, संदीप झावरे, राजेंद्र बामणे, सत्यन पवार, रमेश धुमाळ, महेश झावरे, विकास झावरे, गणेश धुमाळ, मानसी धुमाळ, सुविधा धुमाळ आदी उपस्थित होते. वेदांत कंटक, इम्रान बुखारी, निशांत पाटील, प्रितेश पाटील हे क्रिकेट स्पर्धेचे समालोचन करण्यासाठी उपस्थित होते.



### सुनील धुमाळांचा सत्कार

नांगरवाडी गावातील शिक्षक सुनील धुमाळ प्रदीर्घ शिक्षक सेवेतून निवृत्त झाल्याने त्यांचा सेवापूर्ती सोहळा रामराज विभाग प्रीमिअर लीगच्या व्यासपीठावर साजरा करण्यात आला. मोहन धुमाळ आणि महादेव पाटील यांच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षक सुनील धुमाळ यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.



# सनरायझर्स हैदराबादचा केकेआरवर विजय

| नवी मुंबई | वृत्तसंस्था |

सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२६ मधील दुसऱ्या सामन्यात अखेरीस विजयाचं खातं उघडलं आहे. हैदराबादने ईडन गार्डन्सच्या मैदानावर केकेआरचा तब्बल ६५ धावांनी दारूण पराभव केला आहे. सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या २२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरचा संपूर्ण संघ १६१ धावांवर सर्वबाद झाला.



सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या २२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरूवात दणक्यात झाली. फिन एलनने पहिल्याच षटकात २५ धावा कुटत संघाला वादळी सुरूवात करून दिली. यानंतर पुढच्याच षटकात हर्ष दुबेने आपल्या गोलंदाजीवर त्याला झेलबाद करत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. एलन ७ चेंडूत २८ धावा करत बाद जाला. तर कर्णधार रहाणे ८ धावा करत माघारी परतला. तर अंगक्रिश रघुवंशीने पुन्हा एकदा संघाचा डाव सावरला. रघुवंशीने २९ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ५२ धावा केल्या आणि सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावलं. तर उपकर्णधार रिंकू सिंहने ३५ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला. केकेआरकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. यानंतर इशान मलिंगा आणि नितीश रेड्डी या दोघांनी २-२ विकेट्स घेतल्या. तर हर्ष दुबेने फिन एलनला बाद करत संघाला सर्वात मोठी विकेट रिळवून दिली. कोलकाता नाईट रायडर्स संघाने नाणेफेक जिंकत सनरायझर्स हैदराबाद संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि हैदराबादने २२६ धावांचा डोंगर उभारला. ट्रॅव्हिस हेड व अभिषेक शर्माच्या जोडीने संघाला वादळी सुरूवात करून दिली. दोघांनी पॉवरप्लेमध्येच ८२ धावा कुटल्या. हेड ४६ धावा तर अभिषेक शर्मा ४८ धावा करत बाद झाले, त्यामुळे दोघांचही अर्धशतक हुकलं.

यानंतर इशान १४ धावांवर, अनिकेत वर्मा १ धाव करत बाद झाले. हेनरिक क्लासेनने ३५ चेंडूत ४ चौकार व १ षटकाराच्या मदतीने ५२ धावांची खेळी केली. तर नितीश रेड्डीने ३९ धावांचं योगदान दिलं. यानंतर हर्ष दुबेने २ चौकार लगावत संघाला संघाला २२६ धावांचा आकडा गाठून दिला.

# पलाशचा सलग सहावा विजय

| मुंबई | प्रतिनिधी |

जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या पलाश मापारा याने आपली विजयी घोडदौड कायम राखताना तिसऱ्या अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धेत एकहाती आघाडी मिळविली. पलाशने सर्वाधिक ५ गुणांसह महत्त्वपूर्ण आघाडी घेत आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर दडपण आणले.

पेडर रोड येथील मुंबई चेस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत काळ्या मोहऱ्यांनी खेळताना पलाशने अप्रतिम चाली रचल्या. त्याने शांतपणे खेळताना पुनित डोडिया (४ गुण) याचा पराभव केला. सलग चार सामने जिंकलेल्या पुनितच्या मोहिमेला यामुळे जबर धक्का बसला.

श्रीराम म्हसाणे, प्रतीक यादनिक, यशराज राठी, एजीएम



## ● अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धा

राजवीर नहर आणि श्रेयांश सोमैया हे पाच खेळाडू प्रत्येकी ४.५ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहेत. दुसऱ्या पटावर यशराज राठी आणि प्रतीक यादनिक यांच्यातील सामना बरोबरीत सुटला. श्रेयांश आणि राजवीर नाहर यांनी काळ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रभावी विजय मिळवले. श्रेयांशने तिसऱ्या पटावर अहान कटरूका (३.५ गुण) याचा पराभव केला.

# इंग्लंड क्रिकेट बोर्डावर गंभीर आरोप

## ● स्पर्धेत मानकांनुसार दिव्यांग खेळाडू नाहीत

## ● होतकरू खेळाडूंवर होतोय परिणाम

| लंडन | वृत्तसंस्था |

इंग्लंड क्रिकेट बोर्डवर असा आरोप आहे की, ते त्यांच्या सर्वोच्च देशांतर्गत स्पर्धा डिसेबिलिटी प्रीमियर लीगमध्ये अशा खेळाडूंना खेळण्याची परवानगी देत आहेत, जे ठरलेल्या मानकांनुसार दिव्यांग नाहीत.

जय चरण आणि ॲलेक्स जर्विस यांसारख्या इंग्लंडच्या माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या पालकांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, लीगमध्ये त्यांच्या मुलांची जागा अशा खेळाडूंनी घेतली आहे, जे ईसीबीच्या लर्निंग डिसेबिलिटी (एलडी) म्हणजेच शिकण्याच्या अक्षमतेच्या वैद्यकीय निकषांची पूर्तता करत नाहीत. एका पालकांच्या अंदाजानुसार, अलीकडील ड्राफ्टमध्ये निवडलेल्या ६४ पैकी १२ खेळाडू कोणत्याही दिव्यांगत्वाशिवाय आहेत. नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर या श्रेणीत खेळण्यासाठी खेळाडूचा आयक्यू ७५ किंवा त्यापेक्षा कमी असावा.

असा आरोप आहे की ईसीबीने लीगमध्ये अशा अनेक खेळाडूंना समाविष्ट केले आहे, जे या कठोर निकषांवर खरे उतरत नाहीत. यापैकी अनेक तर मुख्य प्रवाहातील व्यावसायिक क्रिकेट खेळतात.या गोंधळाचा थेट परिणाम होतकरू खेळाडूंवर होत आहे. लीगच्या इतिहासात सर्वोत्तम बॉलिंग सरासरी आणि स्ट्राइक रेट असलेले जय चरण आणि एक दशकापासून खेळणारे ॲलेक्स जर्विस यांना केवळ मड्रिंक्स कॅरियरफ (पाणी पाजणारे) या भूमिकेपर्यंत मर्यादित ठेवण्यात आले. निराश होऊन जयने स्पर्धाच सोडून दिली. यॉर्कशायर डिसेबिलिटी संघाचे व्यवस्थापक ओवेन जर्विस यांचे म्हणणे आहे की, चुकीच्या पद्धतीने एलडी श्रेणीत ठेवलेले नवीन खेळाडूच सर्व फलंदाजी आणि गोलंदाजी करत आहेत. मूळ खेळाडूंना केवळ क्षेत्ररक्षण करण्यासाठी सोडून दिले आहे, ज्यामुळे त्यांचे मनोधैर्य खचत आहे. ईसीबीचे डिसेबिलिटी क्रिकेट व्यवस्थापक रिचर्ड हिल यांनीही एका ईमेलमध्ये मान्य केले होते की, हाय-फंक्शनिंग खेळाडूंच्या लीगमध्ये येण्यामुळे आव्हाने वाढत आहेत.

## डुसेनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई :** दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज रासी व्हॅन डर डुसेनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. रॅसी व्हॅन डर डुसेन या वर्षीच्या आयपीएलमध्ये खेळत नसला तरी, या लीगशी त्याचा मोठा संबंध आहे. दक्षिण आफ्रिकन क्रिकेट बोर्डाने अलीकडेच आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंची नवीन करार यादीमधून रॅसी व्हॅन डर डुसेनला वगळले आहे. रॅसी व्हॅन डर डुसेनने सोशल मीडियावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. दक्षिण आफ्रिकेसाठी खेळण्याचा त्याला अभिमान वाटतो, असे त्याने व्यक्त केले.

## राज्यस्तरीय गडारोहण स्पर्धेत

# मुरुड-मजगावचा समीर माळी प्रथम

| कोर्लई | प्रतिनिधी |

महाड येथील श्रीशिवाजी रायगड स्मारक मंडळ स्थानिक उत्सव समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्य स्तरीय गडारोहण स्पर्धा-२०२६ स्पर्धेत मुरुडच्या पुरुष गटात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान मुरुड विभागाचे ध्वजधारी धारकरी मजगांव येथील समीर नरेश माळी यांनी प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

श्रीशिवाजी रायगड स्मारक मंडळ स्थानिक उत्सव समिती, महाड आयोजित राज्यस्तरीय गडारोहण स्पर्धेत पुरुष खुला गट यात पहिला क्रमांक पटकावल्या बद्दल छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीदिनी रायगडावर नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात खासदार डॉ. सुधांशु त्रिवेदी यांच्या हस्ते समीर नरेश माळी यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.



# नवी मुंबईतील स्टेडियमची प्रेक्षकसंख्या एक लाखाची

## ● एमसीए अध्यक्ष अजिंक्य नाईक यांची माहिती

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईसह राज्यातील दवणवळण आणि प्रवासासाठी केंद्रस्थानी असलेल्या नवी मुंबई विमानतळाजवळ लवकरच एक लाख क्षमतेचे नवे क्रिकेट स्टेडियम उभारण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुंबई क्रिकेट संघटना हे सीमोल्लंघन करणार आहे.

महाराष्ट्रात वानखेडे स्टेडियम, पुण्यात गहुंजे येथे तर नागपूरमध्ये जामठा येथे क्रिकेट स्टेडियम आहेत. वानखेडे तर ऐतिहासिक स्टेडियमम ध्ये गणले जाते; पण प्रेक्षकसंख्येवर मर्यादा आहेत. जास्तीत जास्त प्रेक्षकांना थेट सामने पाहण्याची संधी मिळावी म्हणून हे नवे स्टेडियम नवी मुंबईत तयार करण्यात येणार आहे.



हे केवळ स्टेडियम असणार नाही तर त्यामध्ये बंदिस्त अकादमी, खेळाडू पुनर्वसन प्रक्रिया केंद्र यांचाही समावेश असणार आहे. तसेच स्थानिक सामने होण्यासाठी आणि दोन मैदाने असणार आहेत, असा मोठा परिसर असेल, अशी माहिती मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी दिली.



# अर्णवची ऐतिहासिक जलयात्रा

उरण : अर्णव पाटील याने करंजा ते अटल सेतू असे तब्बल २४ किलोमीटरचे समुद्री अंतर यशस्वीरित्या पार केले आहे. त्याच्या जलयात्रेच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल उरण तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे. अर्णवने समुद्रात तब्बल सात तास, दहा मिनिटे, वीस सेकंद पोहत हा ऐतिहासिक विक्रम केला आहे. अणर्व हा रोटरी इंग्लिश मिडियम स्कूलचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी असून आहे. परीक्षा असताना देखील त्याने हे करंजा ते अटल सेतू २४ किलोमीटर अंतर पोहून यशस्वीरित्या पार केले. त्याला जलप्रवासाचे मार्गदर्शन संतोष पाटील, जयेश पाटील, राज पाटील, साई पाटील यांनी केले आहे. जल यात्रेसाठी प्रोत्साहन देणारा कल्पेश कोळी यांनी विशेष परिश्रम घेऊन महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

चार सुवर्णपदकांची केली कमाई | माणगावच्या नावाचा राज्यभरात डंका

# मयूर बांगाराची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी दमदार झेप

| माणगाव | प्रतिनिधी |

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर यशाची शिखरे गाठणाऱ्या मयूर बांगारा या होतकरू खेळाडूने फिल्ड आर्चरी क्रीडा प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत माणगावचे नाव राज्यभर उज्वल केले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २९ व ३० मार्च २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या फिल्ड आर्चरी (कंपाउंड राउंड) राज्यस्तरीय स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी मयूर बांगारा याने उत्कृष्ट कामगिरी करत वैयक्तीक गटात ४ सुवर्णपदके आणि सांघिक गटात १ रौप्यपदक मिळवून एकूण ५ पदकांची कमाई केली. या दैदिप्यमान यशाच्या बळावर मयूरची राष्ट्रीय स्तरावरील फिल्ड आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली असून, हा माणगावसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. ग्रामीण भागातून येऊन राष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या या खेळाडूने अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.



मयूरच्या यशामागे प्रा. डॉ. रावळे, वाढवळ तसेच विशेष मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक बाळू ढेबे यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच मयूरने हे यश गाठले.

मयूरच्या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड, माजी आ.अनिकेत तटकरे, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ तसेच नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी मयूरचे विशेष कौतुक केले. याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक व प्राचार्य आर. एच. पाटील, उपमुख्याध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य बिरादार, पर्यवेक्षक मिलिंद सोनावणे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही मयूरवर अभिनंदनाचा वर्षाव केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)